
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १९ फेब्रुवारी २०२३



# शिवजन्मोत्सव: अखंड प्रेरणादायी सोहळा!

आधुनिक केसरी

ज्या राजाचे नाव सरळ वाचले असता रोमरोमांत प्रचंड उर्जा संचारते आणि हेच नाव उलट जरी वाचले तरी ते नाव सरळ "जिवाशी" येऊन भिडते! सामान्य माणसाच्या हृदयात स्थान निर्माण करणारा आणि सामन्यांची जीवापाड काळजी घेणारा जगातील एकमेवाद्वितीय लोकराजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज! तपस्वीता, तेजस्विता आणि तत्परता या तारुण्याच्या तेजोमय विशेषणांनी वलयांकित नाव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज! आज्ञाधारक सुपुत्र, सामान्य रयतेचे छत्र म्हणजे शिवाजी महाराज! धैर्यवान, शोर्यवान, कीर्तिवंत, कार्यकुशलतेचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे केवळ आणि केवळ शिवाजी राजेच! अखंड विश्वाच्या इतिहासांत अत्यंत कमी वयात मोठे स्वप्न उराशी बाळगून स्वतःचे कोणतेही भक्कम सैन्यबळ नसतांना एवढेमोठे स्वराज्य उभारणारा एकमेव तरुण राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज! शत्रूंच्या गोटात स्वतः घुसून शत्रूला नामोहरम करणारा, वेळप्रसंगी शत्रूचे पोट फाडणारा असा आमचा एकमेवाद्वितीय शूरवीर शिवछत्रपती! शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या मुलांना एकत्र करून आपल्या जीवाला जीव देणारी सामान्य माणसं असामान्य कर्तृत्वाने घडवणारा महान सम्राट म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज!


साधारणतः १५-१६ वर्षाचा युवक एका असीम ध्येयाने झपाटला. आई-वडिलांकडून आपल्या पूर्वजांचा इतिहास जाणून घेतला. आईने आपल्या मुलाला जीवन किती खडतर आहे? आपल्या मुलाने काय करायला हवे? त्याचे लक्ष काय असायला हवे? आपले मित्र कोण आणि शत्रू कोण? याची समज आणि मूलगामी संस्कार करून बाल शिवबाचे चरित्र घडवले! आपल्यावरील संस्काराचे ऋण फेडण्याचे कार्य अत्यंत कमी वयात करायला प्रारंभ केला. कमी वयात बाल शिवबांना मातोश्रींनी आपल्या घरातील सर्व गोष्टींची जाण करून दिली. त्यांचे ध्येय्य त्यांना ठरवायला संधी निर्माण केलीं. याचा परिणाम असा झाला की; लहान वयातच त्यांना शुचित्वं त्यागिता शौर्यं सामान्यं सुखदुःखयोः। दाक्षिण्यं चानुरक्तिश्च सत्यता च सुहृद्गुणाः ॥ या प्रमाणे शुचित्व, त्याग, शौर्य, सामान्य लोकांचे सुख-दुःखे, दक्षता, प्रेम, सत्य आदि सद्गुण अंगी लावून घेतले. कमी वयात महाराजांचे चरित्र आणि चारित्र्य घडले. त्यांच्यासमोरील अनेक प्रसंगांनी त्यांना दूरदर्शी बनवले. जेमतेम सोळा वर्षे वयाचे असतांना महाराजांनी मोठ्या हिकमतीने आणि शौर्याने तोरणा गड घेतला आणि स्वराज्याचे तोरण बांधले. त्यानंतर महाराजांची घोडदौड थांबलीच नाही. दऱ्या-खोऱ्यातील अठरापगड जातीतीतील शूर, लढवय्ये, निधड्या छातीच्या तरुणांचे संघटन उभे केले. जीवाला जीव देणारी माणसं उभी केली. लढायला तयार झाली. यवनांच्या दडपशाहीने सामान्य रयत त्रस्त झाली होती. शेतातील धान्य आणि घरातील माय-माऊलीची इज्जत असुरक्षित होती. सामान्य माणूस भयभीत झाला होता. ही सगळी परिस्थती महाराजांनी जवळून पहिली. लोकांचे अश्रू पुसण्याचे आणि त्यांच्यात आत्मबल निर्माण करण्याचे महत्कार्य महाराजांनी केले. आपल्या माणसाचे आपले स्वराज्य उभे रहावे अशी रयतेची इच्छा महाराजांनी पूर्ण करण्याचे ठरवले. त्यासाठी अनेकावर अनेक मोठमोठ्या संकटांना त्यांना सामोरे जावे लागले. पन्हाळगडाचा वेढा, अफझलखान प्रसंग, आग्रा येथील बंदिवास अशा एक ना अनेक घटनांनी महाराजांचे जीवन तावून सुलाखून निघाले. अनेकवेळा महाराजांना शत्रूचे बलाबल पाहून तह करावे लागेल. वाटाघाटी करणे भाग पडले, प्रसंगी माघार घ्यावी लागली मात्र आपल्या ध्येय्यापासून महाराज तसूभरही विचलित झाले नाहीत. काळ मोठा खडतर होता. कडेकोट वर्णव्यवस्था असतांना राज्याभिषेक करण्याचे धाडस महाराजांच्या अंगी आले याचे कारण म्हणजे महाराजांच्या पाठीशी असलेले सर्वसामान्य लोकांचे भक्कम पाठबळ! महाराजांनी मोठे संकल्प केले आणि त्या संकल्पांना सिद्धीस नेण्यासाठी अहोरात्र परिश्रम केले. या कार्यात जीवाला जीव देणारी माणसे महाराजांसोबत उभी राहिली. जीवा महाला, तानाजी मालुसरे, शिवा काशीद, बाजीप्रभू देशपांडे, नेताजी पालकर, यसाजी कंक आदि नरवीर तरुणांनी महाराजांच्या जीवाला जीव देऊन स्वराज्य उभे करायला तयार केले.


आज सगळीकडे शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या जल्लोषात संपन्न होत आहे! छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वसामान्य माणसांचे मानदंड आहेत. त्यांच्या महान जीवनाचा आदर्श आपल्यासमोर उभा आहे. देशाला आज या सर्वच महापुरुषांच्या कार्य-कर्तृत्वाची नितांत गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि त्यांची "प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते" ही शिवमुद्रा सर्वकाही कथन करते. याच अनुषंगाने महाराजांचा पोवाडा लिहितांना महात्मा ज्योतीराव फुले लिहितात, भिडस्त भारी ।साबडा घरीं ॥ प्रिय मधुरी ।भाषण करी ॥ मोठा विचारी ।वर्चड करी ॥ झटून भारी ।कल्याण करी ॥ आपासोयरीं। ठेवी पदरीं ॥ लाडावरी । रागावे भारी ॥ हे वजनदार वर्णन एकूण आणि वाचून आज आपण सावध व्हावे आणि महाराजांचा दैदिप्यमान इतिहास आपल्या जीवनी उतरवावा लागेल.

आज तरुणाई सगळीकडे शिवाजी महाराजांचा जयघोष करत आहे, ही मोठीं आनंदाची बाब आहे! असे असले तरी वर्तमान मोठा खडतर दिसतोय. तमाम तरुणाईला व्यसनाने विळखा घातला आहे. नुकुताच मिसरूड फुटलेला तरुण दारू पितोय, गुटखा खात आहे. तो मोबाईलच्या आहारी गेलाय. मुलींच्या तुलनेत मुले जास्तच वाया गेले आहेत. मुलींचे यशस्वी होण्याचे प्रमाण मुलांपेक्षा अधिक आहे. उद्याचे होणारे देशाचे नागरिक जर आज असे अनियंत्रितपणे वागायला-जगायला लागले तर उद्या देश कुणाच्या हातात जाईल? ही खूप मोठी धोक्याची सुचना आहे. तेंव्हा, आपण वेळीच सावध व्हायची वेळ येऊन ठेपली आहे. सगळीकडे शिवजयंतीचा सोहळा संपन्न होतांना तरुणाई जर आवाक्याबाहेर जाऊन वर्तन करायला लागली तर देशाचे काय होणार? वेळ अजून गेली नाही. इथल्या पालकांनी जागे होऊन आपल्या मुलांवर नियंत्रण ठेवावे लागेल. या पिढीवर मूलगामी संस्कार करावे लागतील. असे झाले तरच शिवजयंती सोहळा साजरे करणे योग्य राहील. तेंव्हा, चला तरुणानो, पालकांनो, सावध होऊन शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करुया. महाराजांचे धैर्य, शौर्य, राजनीतिज्ञ, कर्तव्यदक्ष, मातृ-पितृभक्त, रयतेचा राजा, शीलवंत, कीर्तिवंत, प्रज्ञावंत, गुणवंत हे सगळे महाराजांचे गुण आपल्या अंगी ठसवावे लागतील. असे झाल्यास खऱ्या अर्थाने हा शिवजन्मोत्सव सोहळा आनंददायी, प्रेरणादायी, सफल होईल, अन्यथा आणखी एक कार्यक्रम, बस्स! जय हिंद! जय शिवराय!



प्रा.डॉ. विठ्ठल खंडूजी जायभाये
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र) मो. 9158064068
(टीप: लेखक हे व्याख्याता, शिवचरित्रकार, कवी, कीर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## स्वामी कृपा

आधुनिक केसरी

याची परिणीती रेश्माला त्रास देण्यात होऊ लागली. मुळात सोशिक असलेली रेश्मा चकार शब्द न काढता हे सगळे सहन करत होती. कारण नितीनला मुंबईला चांगली नोकरी नव्हती. घर नव्हते. पण एकदा त्याच्या आईनेच नितीनला घरी बोलावून घेतले आणि हिला तुझ्या सोबत काही करून मुंबईला घेऊन जा असे सांगितले.

नितीनने रेश्माची समजूत घातली. मी घर बघेपर्यंत इथे थांब. घर मिळाले की लगेच मी येऊन तुला घेऊन जाईन असे सांगितले. आणि लवकरच त्याला मुंबईच्या एका उपनगरात एक वन रम किचन भाड्याने मिळाले. तो गावी येऊन रेश्माला घेऊन निघाला. निघताना सासूने फारसे सामान घेऊ दिले नाही. देव्हाऱ्यातील अन्नपूर्णेची मूर्ती आणि स्वामी समर्थांची प्रतिमा तिने रेश्माच्या हातात ठेवल्या. स्वाभिमानी आणि समाधानी असलेल्या रेश्माने त्यांचा आनंदाने स्वीकार केला आणि दोघेही मुंबईला आली . हळूहळू त्यांची घडी बसू लागली. पण मुंबईला असलेली महागाई आणि नितीनला असलेला कमी पगार यामुळे दोघांची ओढाताण होऊ लागली. घर चालवणे कठीण होऊ लागले. एक दिवस रेश्मा नितीनला म्हणाली, ' अहो, मी सुद्धा काही काम करून आपल्या संसाराला हातभार लावावा असे म्हणते. ' नितीन म्हणाला, ' हरकत नाही. पण तू काय काम करणार ? इकडे तुला चांगली नोकरी मिळेल याची खात्री नाही. मी इंजिनिअर असूनही कमी पगारावर काम करतो आहे. ' रेश्मा म्हणाली, ' तुम्ही नेहमी म्हणता ना, की तुझ्या हाताला चव आहे म्हणून. मग मी स्वयंपाकाच्या ऑर्डरी घेत जाईन. लोकांच्या मागणीप्रमाणे त्यांना हवे ते पदार्थ बनवून देईन. आणि एकदा नाव झाले की हळूहळू कामे मिळत जातील. '





# आनंदी पहाट

## बालपण आणि बालमन जपावे

आधुनिक केसरी

मी आणि माझं, आपण आणि आपलं ह्या वैचारीकतेमुळे कुटुंबातील सदस्यांनी आपल्या स्वतः भोवती जणू लक्ष्मणरेषा आखून घेतल्याप्रमाणे वर्तन आणि विचार अंगीकारल्याचं दिसत आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सामाजिकदृष्ट्या आपणच आपलं अधःपतन तर करत नाहीत ना ? हा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. आपलं नातं इतकं संकुचित ठेवण्याची कदाचित अनेकविध करणेही असतील. ती कारणे प्रत्येकाची भिन्न देखील असतील. पण निर्माण होणाऱ्या

दुराव्याला जबाबदार कोण ? ह्याचा बालमनावर काय आणि किती खोलवर परिणाम होऊ शकतो हे आपण समजू शकणार का ? आणि कधी ? अर्थात प्राप्त परिस्थितीचा विचार करून ह्यावर योग्य मार्ग काढणं महत्वाचं आहे. सुयोग्य पर्याय निवडून बालमनाला सांभाळणे आवश्यक असतं. लहानपणातलं आपलं निष्पाप बालमन सतत उत्साही असायचं. अगदी शाळेतले दिवस असतील, अभ्यास न केल्यामुळे घरच्यांचा खाल्लेला ओरडा असेल, अथवा मोठ्या भावंडाबरोबर झालेलं भांडण असेल; तरीही त्याचा कोणताही खोलवर परिणाम अंतर्मनावर फारसा होत नसे. भांडणे झाली तरीही काही वेळातच पुन्हा एकत्र येऊन खेळणे सुरु व्हायचं. पुन्हा आनंदी वातारवणात उरलेला दिवस मावळायचा. एकत्र असणं अथवा येणं हेच खरं तर त्या आनंद निर्मितीच्या मागचं कारण असायचं. हल्लीच्या व्हर्च्युअल जगात संवाद आणि सहवास दोन्हीही इतिहासजमा होत चाललं आहे. संवाद होतो म्हणा तसा, पण व्हर्च्युअल पद्धतीने, प्रत्यक्ष भेटून अथवा फोनवर बोलून नाही, तर व्हॉटस् ॲपद्वारे; त्यामुळे सहवासाचा तर प्रश्नच येत नाही.

# वलय असावच...

आधुनिक केसरी

शांत स्थिर पाण्यात छोटासा जरी खडा टाकला तरी किती सुंदर वलय तयार होतात. तसेच आपल्याभोवती चांगल्या विचारांचे, चांगल्या लोकांचे वलय असावे. ज्या वलयामुळे आपल्या आयुष्याला सुंदर वळण लागेल .आयुष्य वळणा वळणांचे जरूर असावे. पण त्या प्रत्येक वळणावरती एक चांगला अनुभव आपल्या सोबत असावा. तो चांगला अनुभव आपल्या सोबत येण्यासाठी आपल्याला ध्येयवादी ,मेहनती ,प्रामाणिक आणि सुस्वाभावी असणे गरजेचे आहे. नाहीतर काही लोक कायम काटेरी शॉल पांघरून असतात. त्यांच्या जवळून जरी गेलं तरी आपल्याला काटे टोचल्याची जाणीव होते. इतके ते काटे तीक्ष्ण विषारी असतात. आणि जिभेवर साखरे ऐवजी हे लोक कारले ठेवतात. कायम कडू बोलणं किंवा काटेरी शब्द. असे लोक आयुष्यात भेटू नये आणि भेटलेच तर आपण गुलाब होऊन त्यांच्यासमोर जावं. गुलाब जसा काट्यांसोबत राहूनसुद्धा फुलतो व लोकांना हवाहवासा वाटतो. गुलाबाचे एक वलय आहे. त्याच्याभोवती त्याची सुंदरता व त्याचा सुगंध. तसेच वलय आपल्या भोवती असावे. माणुसकीचे, प्रेमाचे, समाजसेवेचे ,संस्काराचे, विचारांचे, आपुलकीचे, जिव्हाळ्याचे, शौर्याचे, कणखरतेचे ,सहनशीलतेचे, मेहनतीचे, ध्येयाचे, जबाबदारीचे, कृतज्ञतेचे, सुखाचे आणि दुःखाचे सुद्धा. हे वलय जर आपल्या भोवती असेल तर आपल्या मुलांवर कुठल्याही केंद्रातून संस्कार करण्याची गरज नाही. आपोआप सुसंस्कार मुलांवर होत राहतात. आपल्या प्रगतीत अडचण ठरणाऱ्या लोकांपासून वेळीच दूर व्हा. वाईट संगतीचा परिणाम आयुष्य उध्वस्त करतो. मुलं खूप गोड असतात. त्यांचं बालवण हरवू न देता आपण त्यांच्या सोबत त्यांच्या बालपणांचा आनंद घेऊ. लेकराचे बालपणीचे काही क्षण डोळ्यात, हृदयात साठवून ठेवू. कधी आपणही लहान होऊन त्यांचे जीवन फुलवू. प्रेमाचे वलय सतत त्यांच्याभोवती निर्माण करू....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-62

# गौतम बुद्धांची एक कथा


आधुनिक केसरी

बुद्ध हे मनोविजयी होते हे सर्वज्ञात आहे. ते नेहमी शांत, सस्मित, आणि प्रसन्न असत. त्यांच्या सहवासात येणारया लोकांनाही या प्रसन्नतेचा लाभ होत असे. पण काही लोक असेही होते की त्यांना गौतमांना मिळणारा सन्मान सहन होत नसे. त्यांचा अगदी जळफळाट होत असे. असाच एक माणूस एकदा गौतमांना रागवावयास भाग पाडायचेच, त्यांचा अपमान करायचाच, फजिती करायचीच असे ठरवून त्यांच्या प्रवचनाच्या ठिकाणी आला. प्रचंड जनसमुदाय जमला होता. तथागत शांतपणे त्या समुदायाला मार्गदर्शन करत होते. तेंव्हा हा माणूस तेथे पोचला आणि सर्वांसमोर त्याने गौतमांना न भूतो न भविष्यति अश्या शिव्या दिल्या. जमलेले लोक अस्वस्थ झाले, संतापलेही. पण तथागत शान्त होते. त्यांच्या चेहरयावरील स्मित जरासुद्धा ढळले नव्हते. तो माणूस बराच वेळ अद्वातद्वा शिव्याशाप देत होता. बरयाच वेळाने तो थकून थांबला व डोळे तारवटून गौतमांकडे पहात राहिला. तथागतांनी स्मितहास्य केले व शान्त स्वरात ते बोलले, “मी तुला एक प्रश्न विचारू काय?” “विचारा” तो गुरगुरला. “जर तुला कोणी एखादी वस्तू भेट दिली आणि ती भेट स्वीकारण्यास तू नकार दिलास तर त्या भेटीवर मालकी कुणाची?” “मालकी?” “हां, ती भेटवस्तू कोणाकडे राहील?” “इतकही कळत नाही? सोपं आहे, ती वस्तू त्या देणारयाकडे राहील” तो माणूस म्हणाला. “अगदी बरोबर!” तथागत स्मित करीत म्हणाले, “मग जर मी तुझे हे शिव्याशाप स्वीकारण्यास नकार दिला तर ते कोणाकडे रहातील?” तो माणूस सुन्न झाला आणि तथागतांच्या चरणी लागला. तात्पर्य : जगात कोण आपल्याला काय बोलेल यावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही. पण त्यांच्या स्तुतिशापांचा स्वीकार करणे न करणे हे पुर्णपणे आपल्याच हाती असते. आपण स्वताचा अपमान करून घ्यायचा म्हटला तर तो घोर अपमान होऊ शकतो अन्यथा ते असतात केवळ शब्दांचे बुडबुडे!

# नाम घेतल्याने आपले अवगुण कळून येतील

आधुनिक केसरी

जगातली अनेक साधने जरी पाहिली तरी त्या सर्व साधनांची पहिली पायरी ही, की मनुष्याला त्याचे अवगुण दिसू लागणे. जसजसे साधन वाढत जाईल तसतसे आपल्यातले अवगुण प्रखररूपाने दिसू लागतात, आणि त्या अवगुणांचा पुढे डोंगरच वाटू लागतो, “हे परमेश्वरा ! इतक्या अवगुणांनी मी भरलेला असताना, तुझे दर्शन व्हावे अशी मी कशी अपेक्षा करू ? एवढ्या पर्वतप्राय अवगुणांच्या राशीतून मला तुझे दर्शन होईल हे कालयत्री तरी शक्य आहे का ?” असे वाटू लागते. साधन करण्यापूर्वी, रागीट माणूस कधी त्या रागाची खंत बाळगत नाही; किंबहुना, तो अवगुण आहे हे मुळी त्याला पटतच नाही. तो म्हणतो, “व्यवहारात असा दरारा पाहिजेच; त्याशिवाय कसे चालेल ?” एक साधक मला म्हणाला की, “अलीकडे मला फार राग येऊ लागला आहे.” वास्तविक, तो राग आताच येऊ लागला असे नसून पूर्वीपासूनच त्याच्याजवळ होता, परंतु साधन करू लागल्यापासून त्याला जाणीव होऊ लागली आहे, किंवा क्रोध वाईट आहे हे आता त्याला कळू लागले आहे, इतकेच ! एक लग्नाचा मुलगा होता. त्याने बऱ्याच मुली पाहिल्या, पण एकही त्याच्या मनास येईना. त्याचे आईवडील कंटाळून त्याला म्हणाले, “तुला मुलगी पसंत पडू दे, मग आम्ही पुढचे काय ते ठरवू.” ते काही मुलगी पाहायला बरोबर जात नसत. त्या मुलाची मोठी बहीण होती तीच त्याच्याबरोबर जात असे. एका ठिकाणाहून मुलगी पाहून आल्यावर मोठ्या बहिणीने त्याला विचारले, “कशी वाटली रे तुला ?” त्यावर तो म्हणाल, “नाही बुवा आपल्याला पसंत.” मोठी बहीण चाणाक्ष होती; तिने फक्त त्याच्या तोंडासमोर आरसा धरला आणि विचारले, “या प्रतिबिंबापुढे कशी काय वाटते ?” तेव्हा स्वतःचे आणि मुलीचे रूप त्याच्या ध्यानी आले, आणि तो म्हणाला, “पुष्कळ बरी आहे.” सारांश, जिथपर्यंत आपल्याला स्वतःचे खरे दर्शन होऊ शकत नाही, तिथपर्यंत दुसऱ्यांचे अवगुणच आपल्याला दिसतात. आपल्याला दुसऱ्याचे जे काही अवगुण दिसतात, त्यांचे बीज आपल्यातच आहे, हे माणसाने ठाम ओळखले पाहिजे. तेव्हा, दुसऱ्याचे अवगुण पाहण्याची वृत्ती आपण प्रथम टाकून दिली पाहिजे. दुसऱ्याचे अवगुण पाहणे हा साधा नेहमीचा व्यवहार आहे, तो परमार्थ नव्हे. खरा परमार्थी जो असतो तो सतत आत्मपरीक्षण करीत असतो. त्याला दुसऱ्याचे अवगुण दिसतच नाहीत; त्याला आपल्याच अवगुणांचे इतके दर्शन होते की, त्या मानाने इतर सर्वजण त्याला परमेश्वररूपच भासतात; आणि हाच खरा परमार्थ. **आजचे बोधवचन आहे - आत्मपरीक्षा करून स्वतःमधील अवगुणांच्या बीजाचे उच्चाटन करणे हे एक मोठे साधन आहे; आणि हे साधण्यास नामस्मरणासारखे दुसरे साधन नाही. श्रीराम समर्थ**



# निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


**मी रोज देवाला प्रार्थना करतो, हे देवा , मला ज्ञान थोडे कमी दिलेस तरी चालेल पण तुझी भक्ती मात्र खूप खूप दे. भक्तीचा झरा अप्रतिहत वाहू दे.**

**श्रद्धेविना मानवी जीवन वनवत् होते.**
**श्रद्धेसह मानव वनातही सुंदर जीवन जगतो.**
**हे भारतीय ऋषी संस्कृती शिकवते. ते तू ग्रहण कर.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**माया दुखमय क्षणिक है, यह अनित्य संसार ।**
**मोह महा आवर्त्त है, तीन लोक विस्तार ।।०५।। (स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय)**
**०४/०६/०५**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
मायाकृत हा अनित्य संसार दुःखमय, क्षणिक आहे तसेच त्रैलोक्याचा विस्तार हा मोहाचे महा आवर्त्त ( भोवरा/चक्र ) आहे



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

# बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

समाधानी रहाण्यासाठीनिर्वासनेची गरज असते. समरसता साधली तर मी पणा जवळ येत नाही. समाधानी माणसाचे आणखी एक रहस्य आहे ते असे की,साधना तर चालू आहे पण तिच्यात मी पणा नाही'मी साधना करतो ही भावनाच नाही, अशा निर्लोभी पणाने जो साधना करतो त्याचे समाधान कित्येक पटीने जास्त असते. अशी माणंसे धन्य होतं. साधनेमध्ये वाढ होत गेली की मी पणा क्षीण होत जातो देहबुद्धीला कमी महत्त्व दिले जाते. "मी साधना करत नाही, तो परमात्मा माझ्या कडून करवून घेतो मी फक्त निमित्तमात्र आहे" अशी जेव्हा भावना वाढीस लागते तेव्हा तुमची साधना परिपक्व अवस्थेत आहे. तो स्वस्वरूपाशी तदाकार होऊन रहातो. ऊद्या दासनवमी आहे समर्थाचे विचार आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्यक्षात रूजवूया ख-या अर्थानी "दासबोधाचे" आजन्म विद्यार्थी होऊ या.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**तुका म्हणे देवा । त्यांची केली पावे सेवा ॥३॥**
**माझिया मीपणा । जाला यावरी उगाणा ॥१॥**
**भोगी त्यागी पांडुरंग । त्यानें वसविलें अंग ॥ध्रु.॥**
**टाळिलें निमित्त । फार थोडें घात हित ॥२॥**
**यावें कामावरी । तुका म्हणे नाहीं उरी ॥३॥**
**सकळ चिंतामणी शरीर । जरी जाय अहंकार आशा समूळ ॥**
**निंदा हिंसा नाहीं कपट देहबुद्धि । निर्मळ स्फटिक जैसा ॥१॥**
**मोक्षाचें तीर्थ न लगे वाराणसी । येती तयापासीं अवघीं जनें॥**
**तीर्थांसी तीर्थ जाला तो चि एक । मोक्ष तेणें दर्शनें ॥ध्रु.॥**
**मन शुद्ध तया काय करिसी माळा । मंडित सकळा भूषणांसी ॥**
**हरिच्या गुणें गर्जताती सदा । आनंद तया मानसीं ॥२॥**
**तन मन धन दिलें पुरुषोत्तमा । आशा नाहीं कवणाची ॥**
**तुका म्हणे तो परिसाहूनि आगळा । काय महिमा वर्णूं त्याची ॥३॥**

रविवार, १९ फेब्रुवारी २०२३
किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१७६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक





● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 18 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-176 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-18 ● PRICE-5




# रमेश बैस महाराष्ट्राचे २० वे राज्यपाल

## मराठीतून शपथ घेत राज्यपाल रमेश बैस यांनी स्वीकारला पदभार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महाराष्ट्राचे नवे राज्यपाल रमेश बैस यांनी आज राज्यपालपदाची शपथ घेतली. राजभवनातील दरबार हॉलमध्ये शपथविधीचा सोहळा पार पडला. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती संजय व्ही. गंगापूरवाला यांनी बैस यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी राजभवनाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.**



रमेश बैस यांनी महाराष्ट्राचे 20 वे राज्यपाल म्हणून आज पदभार स्वीकारला. रमेश बैस यांनी मराठीतून राज्यपालपदाची शपथ घेतली. महाराष्ट्राच्या जनतेच्या सेवेला आणि कल्याणाला मी वाहून घेईन, अशी प्रतिज्ञा रमेश बैस यांनी घेतली. भगत सिंह कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर झाल्यानंतर रमेश बैस यांची राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली होती. रमेश बैस यांचा जन्म जन्म 2 ऑगस्ट 1947 मध्ये मध्य प्रदेशातील रायपूरमध्ये झाला आहे. आता ते रायपूर छत्तीसगडमध्ये आहे. रमेश बैस यांची जुलै 2021 मध्ये झारखंडचे राज्यपाल म्हणून नियुक्त करण्यात आले होते. याआधी जुलै 2019 ते 2021 पर्यंत त्रिपुराचे राज्यपाल म्हणून त्यांनी काम पाहिले. रमेश बैस यांनी नगरपालिकेतून आपल्या राजकीय करिअरला सुरुवात केली होती. 1978 मध्ये ते सर्वप्रथम नगरपालिकेत निवडून आले होते. त्यानंतर 1980 ते 84 मध्ये मध्यप्रदेश विधानसभेचे सदस्य होते. पण 1985 मध्ये त्यांना पराभवाचा धक्का बसला होता. त्यानंतर 1989 मध्ये रायपूर येथील लोकसभा निवडणुकीत त्यांनी विजय मिळवला होता. ते रायपूर लोकसभा मतदारसंघातून सलग सात वेळा खासदार राहिले आहेत. रमेश बैस यांनी केंद्रातही राज्यमंत्रीपद भूषवले आहे. 1999 मध्ये अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात बैस यांनी केंद्रीय पर्यावरण आणि वन राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) म्हणून काम केले होते.




## दक्षिण अफ्रिकेतून भारतात आले १२ चित्ते

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** ग्वाल्हेर या ठिकाणी १२ आणखी चित्ते पोहचले आहेत. दक्षिण अफ्रिकेतून आणण्यात आलेले हे पाहुणे आता भारतात वास्तव्य करणार आहेत. या चित्त्यांना भारतीय वायुसेनेच्या गॅलेक्सी ग्लोबमास्टर सी १७ या विशेष विमानातून भारतातल्या ग्वाल्हेर या ठिकाणी आणण्यात आलं आहे. विशिष्ट बॉक्समधून हे चित्ते भारतात आणले गेले आहेत. या १२ चित्त्यांना मध्य प्रदेशातील कूनो नॅशनल पार्कमध्ये ठेवण्यात येणार आहे. याआधीही चित्ते भारतात आणले आहेत. भारतातली चित्त्यांची संख्या वाढावी या अनुषंगाने दक्षिण अफ्रिका आणि भारत यांच्यात एक करार झाला होता. याआधी ८ चित्ते भारतात आणले गेले आहेत. १९५२ मध्ये भारतातून चित्ता नामशेष झाल्याचे घोषित करण्यात आले. मध्य प्रदेशातील जंगलात सोडण्यात आलेले चित्ते नामिबियातील आहेत. त्यांना या वर्षांच्या सुरुवातीला स्वाक्षरी केलेल्या सामंजस्य कराराखाली आणण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज कुनो नॅशनल पार्कमध्ये आठ चित्ते सोडले आहेत. कुनो नॅशनल पार्कमध्ये पंतप्रधानांच्या हस्तो चित्ता सोडणे हा भारतातील वन्यजीव आणि त्यांच्या अधिवासाचे पुनरुज्जीवन आणि वैविध्य आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा एक भाग असल्याचे, निवेदनात म्हटले आहे.



# ठाकरेंनी 'शिवसेनेचा' वारसदाराचा हक्क गमावला!



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**हिंदुरहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रात प्रथम मुबंईत मराठी माणसांचे हक्क व हिंदुत्वासाठी शिवसेना संघटना व राजकीय पक्ष स्थापन केला.ठाकरे यांचे एका आदेशावरून रस्त्यावर उतरणारे, स्वत: च्या घरादाराची राखरांगोळी करणारे,जीवाचे पर्वा न करणारे असे मावळे निर्माण केले. मुंबईत व महाराष्ट्रात शिवसेने पक्ष गावपातळीपर्यंत नेला.पण नंतर शिवसेना आपल्या मालकीची, वारसदार असल्याचा दावा पूत्र उध्दवजी ठाकरे यांनी केला खरा!पण त्यांना शिवसेना व चिन्ह वारसाहक्कानुसार मिळाले नाही.ठाकरे कुटुंबाला मोठा हदराच बसला आहे.**

निवडणुक आयोगाने 'शिवसेना" व "धनुष्यबाण' चिन्ह हे दोन्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला देण्याचा निर्णय दिला.देशात प्रादेशिक पक्षात एका कुंटुबाची मक्तेदारी वाढत चालली आहे. या आयोगाच्या या निर्णयाने देशातील प्रादेशिक पक्षात एकाच कुंटुबाची जी मक्तेदारी वाढत चालली त्याला चपराक बसला आहे.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरु झाली होती. तेंव्हा १९५९ मध्ये आचार्य अत्रे यांनी मराठी दैनिकात मुख्य मथळा दिला होता.तो म्हणजे "अत्रे यांची हाक महाराष्ट्रात शिवसेना उभारा"असा मुख्य मथळा होता. बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रात स्थापना १९ जून १९६४ मध्ये शिवसेनेची केली.प्रारंभी ही मराठी माणसाला न्याय उद्देशाने ही संघटना उभारली गेली. शिवसेनेने १९६८ मध्ये मुबंई महापालिकेची निवडणूक लढविली व पहिले महापौर डॉ. हेमचंद्र गुप्ते झाले.त्यानंतर १९६९ मध्ये शिवसेना राजकारणात उतरली. १९८९ मध्ये लोकसभेची निवडणूक निवडणुकीत लढविल्या गेली.यात सेनेचे चार खासदार निवडून आल्याने पक्षाचा कोटापूर्ण झाला.तेंव्हा ठाकरे यांनी श्री प्रभूरामचंद्राचे 'धनष्यबाण' म्हणून या चिन्हाचा स्वीकार केला.या धनुष्यबाणाची प्रतिकृती ठाकरे कुटुंबाने देवघरात ठेवलेली आहे. शिवसेनेने सुमारे २२ वेळा विविध राजकीय पक्षाशी मैत्री केली. १९८३ मध्ये रिपाई गवई गटाशी, तसेच १९७४ मध्ये कॉंग्रेसचे रामराव आदिक यांची पाठिंबा दिला. १९७५ मध्ये ठाकरे यांनी आणीबाणीचे शिस्तपर्व समर्थन केले. १९७७ मध्ये कॉंग्रेस मैत्री केली. १९७९ मध्ये मुस्लिम लिग दोस्ती करून बनातवाला यांचे सोबत सभा घेतली. २०११ मध्ये आठवले बरोबर मैत्री करून राज्यात भीमशक्ती व शिवशक्तीचा प्रयोग केला. कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रपतीपदाचे उमेदवार श्रीमती प्रतिभा पाटील व प्रणब मुखर्जी यांनी ठाकरे यांनी भाजपाचा विरोध घेऊन पाठिंबा दिला.ठाकरे यांची ठाकरी भाषामुळे लोक प्रभावित होत असत. निवडणूक काळात त्यांच्या सभेला लाखोची गर्दी जमावयाची पण ही गर्दी मतात परिवर्तन होत नव्हती.ठाकरे व शिवसेनेसाठी प्राण देणारी तरूणांची मोठी फळी तयार झालेली होती. त्यावेळी आनंद दिघे, एकनाथ शिंदे,सदा सरवणकर, नारायण राणे राणे,मनोहर जोशी, छगन भुजबळ,या सारखे नेतृत्व तयार झाले होते.

राज्यात सामन्य कार्यकर्ते, ओ. बी,सी.व राजकीय वारसदार नसलेल्या तरूणांना पक्षाची उमेदवारी देऊन आमदार,मंत्री केले.राज्यात ठाकरे यांचा प्रचंड दरारा.तितकाच आदरही होता.राष्ट्रीय पातळीवरचे भाजपाचे बडे नेते 'मातोश्रीवर' त्यांना भेटावयाला जात असत.ठाकरे यांनी दिलेला शब्द कधी माघार घेतलेला नाही.बाळासाहेबांच्या हयातीत शिवसेनेत बंडाचे भूकंप झाले!यात मोठे नेते नारायण राणे, सेनेचा ढाण्या वाघ नावाजलेले छगन भूजबळ आणि परिवारातील ठाकरे तोफ म्हणजे राज ठाकरे यांनी शिवसेनेची साथ सोडली. शिवसेनाला खिंडार व बुरूजही पडले पण बाळासाहेबांनी सेनेचे किल्ला साबीत ठेवला. शिवसेना व भाजपाने निवडणुक १९९० लढविली. यात कॉंग्रेस पक्षाने सर्वाधिक जागा १४१ जागा जिंकल्या तर शिवसेनेला ५२ तर भाजपाला ४२ जागेवर यश मिळविले.या काळात कॉंग्रेसचे शरद पवार सुधाकरराव नाईक पुन्हा शरद पवार मुख्यमंत्री झाले.तेंव्हा पवार केंद्रातून परत महाराष्ट्राच्या राजकारणात आले.शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९९५ ला हिंदुत्वाच्या मुद्दावर भाजपा व शिवसेनेची युती केली. देशातील भ्रष्ट कॉंग्रेसला गाडले पाहिजे.इतकेच नव्हे महाराष्ट्र विधान सभेवरच नव्हे देशाच्या लोकसभेवर भगवा फडकला गेला पाहिजे,असे म्हंटले होते.पण शिवसेना सत्तेसाठी कॉंग्रेस पक्षाची कधीचमैत्री करणार नाही,नाही तर शिवसेनेचे दुकान बंद करेन,असे म्हंटलेले त्यांचे भाषणाचे व्हिडीओ आहेत.१९९५ च्या निवडणूक भजपा व शिवसेने लढली व त्याचा मतदारांनी या पक्षाला साथ दिली.यावेळी शिवसेनेचे ७३ तर भाजपाने६५ जागा मिळविल्या. कॉंग्रेसने सर्वाधिक जागा ८० जागा पण बहुमत न मिळाल्याने शिवसेना व भाजपाने सत्ता स्थापन केली,तेंव्हा ज्या पक्षाच्या अधिक जागा त्याचा मुख्यमंत्री व दुसर्‍याला उपमुख्यमंत्री हा फार्मूला ठरलेला होता,त्यामुळे तेंव्हा सत्ता स्थापनेसाठी भाजपाने विरोध केला





नाही.शिवसेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री गोपिनाथ मुंढे झाले.भाजपा मदतीने अखेर बाळासाहेबांचे विधानसभेवर भगवा ध्वज फडविण्याचे स्वप्न साकार झाले.त्यानंतर केंद्रात १९९६ भाजपा सरकार आले.अटलबिहारी वाजपेयी हे पंतप्रधान झाले.पण ते बहूमत सिध्द न करता सोळा दिवसच सत्तेवर राहिले नाही. भाजपाला सोळा दिवसात सत्ता सोडावी लागली त्यानंतर केंद्रात अनेक पंतप्रधान आले,पण स्थीर सरकार देता आले नाही.१९९८ मध्ये केंद्रात पुन्हा भाजपा सरकार व वाजपेयी पंतप्रधान झाले. भाजपाचे ६ वर्षे ६४ दिवस सरकार सत्तेत राहिले.२०१२ मध्ये बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाले. शिवसेनेचे सूत्रे बाळासाहेब ठाकरे यांच्या हातात आली.भाजपा व शिवसेना केंद्रात आणि महाराष्ट्रात सत्तेसाठी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाची २०१४ पर्यंत वाट पहावी लागली.२०१४ मध्ये भाजपा व सेनेत जागेवर वाटपावरून वाद झाला. केवळ एकासाठी शिवसेनेने युती मोडली व सेनेने स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेसची आघाडी होऊ



शकली नाही.या पक्षानेही स्वतंत्रपणे निवडणूक लढविली.तेंव्हा भाजपाने सर्वाधिक १२२ तर ६३ जागा जिंकल्या.तेंव्हा केंद्रातील मंत्रिपदासाठी महाराष्ट्रात भाजपाला सत्तेसाठी पाठिंबा देण्यासाठी ठाकरे हे रूसन बसले होते.महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत२०१९ च्या निवडणुकीत अमित शहा,देंवेंद्र फडणवीस व ठाकरे यांचेत चर्चा झाली.ठाकरे यांनी मोदींच्या नावावर विधानसभा निवडणूक लढविली.यात भाजपाने १०५ व शिवसेना ५६ जागेवर विजय मिळविला होता. निवडणुकीचे निकाल लागत असतानाच ठाकरे यांनी युतीतून पाय काढण्यास सुरूवात केली. महाराष्ट्राच्या राजकारणात ठाकरे य कुटुंबातील व्यक्तींनी मुख्यमंत्री अथवा मंत्रिपद कधी मागितले नाही.ते 'किंगमकर" म्हणूनच राहिले,पण उध्दव ठाकरे यांचे शिवसेनेचे सूत्रे आल्यापासून सत्तेची नवीन डाव खेळला.शिवसेनेचे मुख्यमंत्री करण्याची वचन भाजपाचे शहा यांनी दिले होते,तेंव्हा ठाकरे हें मुख्यमंत्री पदासाठी रूसून बसले.इतकेच नव्हे, दुसरीकडे प्रवक्ते संजय राऊत व शरद पवार हे सत्तेचे दुसरी गणित जुळवित होते.यातून ठाकरे यांनी भाजपा नेत्यांचा संवाद करणेच सोडले.२०१९ च्या निवडणूक प्रचारात ठाकरे यांनी शिवसेनेच्या मुख्यमंत्रीपदाचा दावा,अथवा उल्लेख केलेला नव्हता,ही वस्तुस्थिती होती. ठाकरे त्यांनी अचानकपणे पवित्रा घेतला. त्यांनी हट्टवादी मागणी करू लागले.इकडे राऊत व नेते शरद पवारांच्या निवासस्थानी बैठक होत होती.अखेर याच दोघांनी शिवसेना !कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा आघाडी करून सत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला.पवार यांनी एका दगडात भाजपा व शिवसेनेलाही मारले.यातून त्यांनी भाजपाला महाराष्ट्रात सत्तेपासून तोडले व शिवसेनेला युती संपुष्टात आणण्याचा डावपेच खेळला.यामुळे भविष्यात हिंदुत्वाच्या मतात विभागणी होऊन राष्ट्रवादी कॉंग्रेसला फायदा होऊ शकतो असे ते गणित आहे.या दोघांनी ठाकरे यांना कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रसबरोबर आघाडी करण्यासाठी राजी केले.पवारांनी कॉंग्रस पक्षापुढे सेनेशी बरोबर आघाडी करण्याचा प्रस्ताव ठेवला होता.ठाकरे यांनी शिवसेना कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेसची बरोबर सत्तेसाठी आघाडी करण्याचा निर्णय पक्ष पातळीवर अथवा आमदारांना विश्वासासात घेवून घेतलेला नव्हता.पवारांनी ठाकरे यांना मुख्यमंत्री होण्याचा कानमंत्र दिला होता हे ठाकरे यांनी स्वतः सांगितलेले आहे.राऊत यांनी 'अभी नही तो कभी नाही'असे म्हणत उध्दव ठाकरे मुख्यमत्रीपदाच्या घोड्यावर बसविले. ठाकरे स्वतः तयार झालेच त्यांनी आपला मुलगा आदित्यला कॅबीनेट दर्जाचे मंत्रीपद दिले.या सरकारचे महत्वाची खाती राष्ट्रवादी कॉंग्रेसने घेतली.यात सरकारमध्ये शिवसेनेचे मुंख्यमत्री ठाकरे हे म्हणजे केवळ 'कुंकुवाचा धनी' म्हणून राहिले होते.राज्य सरकारचे निर्णय व निधी वाटप हे राष्ट्रवादी पक्षाचे नेते घेत होते.बाप व पूत्र सत्ता भोगत होते, दुसरीकडे शिवसेना आमदारांची कोंडी होत होती.त्यांची अडवणूक होत होती. शिवसेनेचे उढे भविष्य काय?असा प्रश्न आमदारांना भडसावत होता. मदारांची गर्‍हाणे तक्रारी करत होते, पण ते मातोश्रीपर्यंत आवाज जात नव्हता. स्वतः ठाकरे सत्तेत इतके धूंद झाले की,त्यांनी शिवसेनाच्या आमदाराच्या तक्रारीकडे,नाराजीकडे दुर्लक्ष केले.त्यामुळे पक्षात अंर्तगत नाराजी वाढत गेली.त्या असंतोषाचा अचानक स्फोट झाला. शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी बंड केले!ते एकटे नाहीत त्यांनी सोबत चाळीस आमदाराला गोहाटी नेले.याला भाजपाची साथ होती,हे लपून राहिले नाही.त्यावेळसही आमदारांनी केवळ ठाकरे यांनी कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रस पक्षाची आघाडीचे नाते तोडावे, अशी मागणी केली होती,इकडे राऊत हे रोज शिवसेनेच्या आमदारांना शिव्या,धमक्या,अपशब्द वापरून "आगीत तेल ओतत' राहिले.त्यामुळे शिवसेनेतील दरी वाढत गेली.शरद पवारांनी २०१९मध्ये सकाळच्या पवार व फडणवीस यांचे शपथविधीच्या सोहळा उधळून लावला होता.तेंव्हा शरद पवारांनी अतिशय





सांमजस्याने व सावधपणे भूमिका घेतली.पक्षाचे नेते अजित पवारसह आमदारांना परत पक्षात आणले. त्यांचे विरोधात शिस्तभंगाची कारवाई केली नाही.उलट स्वतच्या पक्षाला गद्दार म्हंटले जाऊ लागले. पन्नास खोके सरकार ओके असे घोषणा देऊन शिवसेना आमदार, खासदारांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला. कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेसची तीच इच्छा होती. ठाकरे यांनी शिवसेना पक्षापेक्षा सत्तेला प्राधान्य दिले. पण ठाकरे मार्ग काढण्याची भूमिका न घेतली नाही ते हट्टाला,सूडाला पेटले!खर तर! त्यांना गुहाटीला जाऊन आमदारांना भेटून मार्ग काढता आला असता यात किमान शिवसेना पक्ष वाचविता आला असता.ते शिवसेनेचे किंगमेकर राहिले असते.पण पक्षातील आमदाराकडे जाऊन समजविणे यात त्यांना कमीपणा वाटला असावा! त्यांची भूमिका पक्षाला संकटात आणणारी होती.हे शेंबड्या पोराले कळत होते. ठाकरेंना चाळीस आमदार,खासदार साथ सोडल्यानंतर पक्ष बुडतोय?याची थोडीशीही चिंता वाटलेली नाही.ठाकरे हे शकुनीमामा' राऊतच्या नादाला लागले. यात शरद पवार व संजय राऊत यांनी ठाकरे यांचा 'राजकीय गेम' केला.शेवटी आज उध्दव ठाकरेंना शिवसेना व धनुष्यबाण चिन्ह हे दोन्ही गमावण्याची वेळ आली. केंदिय निवडणूक आयोगाने ७८ पानाचा निर्णय दिला आहे.त्यात आयोगाने १९७२ च्या सादिकअली प्रकरणातील पक्ष संघटना विधिमंडळ व संसदीय पक्षातील बहुमताचा आधार घेतला.यात ५५ पैकी ४० विधिमंडळ सदस्य व १८ पैकी १३ खासदाराचा पाठिंबा असल्याचा शिंदे गटाचा दावा मान्य केला आहे.तसेच २०१८ मध्ये पक्षाच्या घटनेत बदल केले ते लोकशाहीशी सुसंगत नाही.ते आयोगाला कळविण्यात आले नाहीत.सेनेत पक्षांर्गत लोकशाही नाही,असे म्हणत ठाकरे गटाचा बहुमताचा दावा फेटाळला. या निकालानंतर उध्दव ठाकरे यांनी मोदी व भाजपावर आगपाखड केली. भारताच्या अमृत महोत्सवात मोदींनी लोकशाही संपल्याचे सांगून बेबंदशाही सुरु झाल्याचे लाल किल्ल्यावरून जाहीर करावे.भाजपाचे कायद्यामंत्री न्यायसंस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहेत. शिंदे तर शिवसेनेचा नेता पक्ष,चिन्ह चोरले आहे. पैश्यांनी आमदार,खासदार विकत घेऊन घेतात येतात.देशातील न्याय संस्थेवर भाजपाची माणसे असून हा दबाबतून हा निर्णय घेतला गेला. सा गंभीर आरोप त्यांनी केला.यात निवडणुक आयुक्ताची नियुक्ती करणे, आश्चर्यकारक आहे. आयुक्ताची नियुक्त करताना विरोधी पक्षाचा सहभाग असला पाहिजे.असे म्हणाले आहेत. निवडणुक आयोग,तपास यंत्रणा गुलाम असल्यासारखे वागत आहेत,असा आरोप राऊतांनी केला. मुख्यमंत्री शिंदे व भाजपाचे नेते फडणवीस यांनी लोकशाहीत बहुमताला महत्व असून हा लोकशाहीचा विजय असल्याचा प्रतिक्रिया दिली आहे. राज्यात शिंदे गटाने फटाक्याची आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा केला. देशात कॉंग्रेस १९६९,आणि १९७५ मध्ये दोनवेळेस फुटली.दोन्ही पक्षाचे चिन्ह गोठवले गेले. कॉंग्रेस पक्षाचे बारा पक्ष आहेत.तर जनता दलाचे नावाचे अनेक तुकडे झाले आहेत.२०१७ मध्ये उत्तरप्रदेशात समाजवादी पक्षात नेताजी मुलामसिंह व पूत्र अखिलेश यादव यांच्यात वाद झाला होता. यातून अखिलेश यांनी आयोगाकडे बहुमताचे दावा व पुरावे दिले होते. त्याआधारे आयोगाने समाजवादी पक्ष व सायकल चिन्ह बहाल केले आहे.महाराष्ट्रात ठाकरे यांचे राजकीय हट्टामुळे, म्हणतात ना! 'तेलही गेल तूपही गेल' हाती धुपटणे आल'अशी अवस्था झाली आहे. ठाकरे कुटुंब आयोगाच्या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात जाईल. पण पुढे काय? पैसा मिळेल संपत्तीमिळेल,पण अगदा नाव गेल ते मिळत नाही. असे बाळासाहेब म्हणाले होते.आता ठाकरे "शिवसेना' मिळेल पण त्यापुढे दुसरे नाव जोडावे लागेल.देशातील २०२४ मध्ये निवडणुकीत नवीन पक्ष व चिन्ह घेऊन निवडणुकीत सामोरे जावे लागेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# स्वराज्याचे सु - राज्यात रुपांतर करणारे : छत्रपती शिवाजी महाराज



प्रा.डॉ.सखाराम वाघमारे
संपर्क क्र. ९६२३२२८५७५

आधुनिक केसरी

**19 फेब्रुवारी, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर करणारा रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती. इ.स.१६०० च्या आसपासचा काळ, या काळात देशात व महाराष्ट्रात सर्वत्र अराजकता माजली होती. लढाया आणि कत्तली यांनी तर उच्छाद मांडला होता. हजारो लोकांना गुलाम बनविणे, मंदिरांचा विध्वंस करणे, स्त्रियांना भ्रष्ट करणे, जिझीया नावाचा जुलमी कर जबरदस्तीने वसूल केला जात होता. यातच दुष्काळाचे तांडवनृत्य सुरू होते. सगळीकडे अनिश्चितता आणि अराजकता माजली होती. अशातच ( विश्वसनीय साधनांच्या आधारे व इतिहास संशोधक आणि महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या तिथीनुसार ) फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ म्हणजे १९ फेब्रुवारी १६३० रोजी मराठवाड्यातील वतनदार भोसले घराण्यातील मालोजींचे पुत्र शहाजीराजे व सिंदखेडच्या जाधव घराण्यातील कन्या जिजाऊ या दाम्पत्याच्या पोटी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात शिवनेरी किल्ल्यावर झाला.**

पुरातन दंतकथेनुसार जिजाबाईंनी 'शिवाई देवी' ला आपल्याला एक बलवान पुत्र व्हावा अशी इच्छा मागितली होती. त्यानुसार शिवाई देवीच्या नावावरून शिवाजी हे नाव ठेवण्यात आले असावे असे मानले जाते. शहाजीराजे त्याकाळी सरदार म्हणून कार्यरत होते. त्यामुळे पित्याचे मार्गदर्शन व खंबीर साथ, कठोर शिस्तीचा गुरु आणि माता जिजाऊंच्या संस्कारातून "मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा" हा मिळालेला मंत्र आणि साधू-संतांकडून धर्म व राष्ट्रभावना जागृत करण्याची मिळालेली शिकवण सोबत ठेऊन महाराष्ट्रातील बहुजन मराठा मावळ्यांच्या सहकार्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.

दादोजी कोंडदेवांच्या मृत्यू नंतर स्वराज्याची संपूर्ण जबाबदारी शिवाजी महाराजांवर येऊन ठेपली होती. त्यामुळे अशातच आपल्या वडिलांकडून मिळालेल्या 2000 सैनिकांच्या छोट्या तुकडी पासून ते एक लाख सैनिकांचे लष्कर शिवाजी महाराजांनी उभे केले. किनारी व अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक नव्या किल्ल्यांची उभारणी केली. सुसंघटित प्रशासकीय यंत्रणा, शिस्तबद्ध लष्कर, आश्चर्यजनक वेगवान हालचाली, बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्चीकरण करणारे नेमके हल्ले व गनिमी काव्याच्या तंत्राचा योग्य वेळी वापर करून छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रागतिक अशा हिंदवी स्वराज्याची यशस्वी पणे उभारणी केली. राज्यकारभारात मराठी भाषेच्या वापराला प्रोत्साहन दिले. महाराजांना स्वभाषेचा अभिमान होता. त्यांनी रघुनाथ पंडिताकरवी राज्य व्यवहार कोश ची निर्मिती केली. अरबी, फारसी भाषेच्या गुलामगिरीतुन मराठी भाषेची सुटका करण्यासाठी अटोकाट प्रयत्न केले.

तत्कालीन परिस्थितीत हिंदवी स्वराज्यात सर्व जाती, धर्म, पंथाची प्रजा आहे. त्या सर्वांचे आपण छत्रपती आहोत हे शिवाजी महाराज जाणून होते. त्यांनी आपल्या राज्यात आपापल्या जाती, धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य दिले होते. इस्लामी व ख्रिश्चन पूजास्थळांना तर इनामे दिली होती. केळोशीच्या बाबा याकुत या मुस्लिम धर्म गुरु चा आशीर्वाद मागतांना त्याचा धर्म कोणता असा विचारही मनाला शिऊ दिला नाही. शासकीय नोकऱ्या देताना कधी संकुचितपणा दाखवला नाही. स्वराज्यात नुरबेग हा पहिला मुस्लिम पायदळाचा प्रमुख होता. इब्राहीम खान, दौलत खान ह्या मुस्लीम व्यक्ती तर आरमाराच्या प्रमुख होत्या. एवढेच काय महाराजांच्या आयुष्यातील सर्वात कठीण प्रसंग म्हणजे आग्रा कैद. याप्रसंगी तर मदारी मेहतर महाराजांसोबत शेवटच्या क्षणापर्यंत होते तर अफजल खान भेटी वेळी जिवा महालाने आपल्या प्राणांची बाजी लावत शिवाजी महाराजांना सुखरूप बाहेर आणले होते. यावरून हिंदवी स्वराज्य हे एका कोण्या जाती, धर्म, पंथाचे नाही तर डोळस प्रासंगिक विचाराच्या सर्व जाती-धर्मांचे होते हे यावरून लक्षात येते. महाराजांची मुलकी, न्याय व प्रशासन व्यवस्था अत्यंत बळकट होती. एखाद्याच्या हातून गुन्हा किंवा फितुरी झालीच तर गुन्हेगारांना पोत्यात बांधून रायगडाच्या टकमक टोकावरून ६००० फूट खोल दरीत ढकलून दिले जात असत. युद्धनीती, कुट नीतीमध्ये तर महाराजांचा हात पकडण त्या काळात कुणालाही शक्य नव्हते. एक परकिय इतिहासकार म्हणतो "कुटनीतीमध्ये महाराजांच्या करंगळीत जितकं होतं तितकं



औरंगजेबाच्या पूर्ण शरीरात नव्हतं". आदिलशाहीच्या तावडीतून शहाजी राजांच्या सुटकेसाठी केलेले राजकारण, जयसिंगांसी झालेल्या तहानंतर एकाच किल्ल्याला विविध नावे देऊन २१ ऐवजी प्रत्यक्षात १७ किल्ले देण्याचे राजकारण, अफजलखानाला मैदानी प्रदेश सोडून प्रतापगडाच्या पायथ्याशी दूर्गम, जंगली, पर्वतीय प्रदेशात आणण्याची केली गेलेली कूटनीती, आग्र्याहून सुटका करून घेण्यासाठी आजारी पडण्याचे केलेले नटक, औरंगजेबाने कर लागू केल्यावर तुमच्यावर इतके दारिद्र्य आले आहे का ? अशा आशयाचे त्याला हीणवण्यासाठी लिहिलेले पत्र ही महाराजांच्या कुशल बुद्धिमत्तेची ओळख करून देणारी काही उत्तम उदाहरणे आहेत. जनतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका असे सांगणारे शिवाजी महाराज शेती सुधारणांच्या बाबतीत अग्रणी होते. नापीक जमीन, उपजाऊ जमीन, पीक, गावकरी आणि शेतकरी यांना संपूर्ण संरक्षण देणारे, उत्तम आणि शास्त्रशुद्ध जमिनीची मोजणी करणारे, संकटकाळात किंवा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी शेतकऱ्यांना शेतसारा माफ, कर माफ, कर्ज माफ करून आगाऊ मदत देणारे होते. एवढंच काय तर महाराजांनी परस्त्रीला मातेसमान मानीत साडी चोळीची बोळवण करीत. कोणत्याही जाती धर्माच्या स्त्रिला धक्काही न लावण्याचे सक्त आदेश दिले होते. यावरुन छत्रपती शिवाजी महाराजांचे उत्तम प्रशासन, राज्यकारभाराचे कौशल्य, सर्वधर्मसमभाव, अष्टप्रधान मंडळ, बळकट चलन व्यवस्था व गुणवत्ता या सर्वातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविधांगी गुणांचे दर्शन घडते. स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करतांना अशा या रयतेचा वाली असलेले, थोर राजे छत्रपती शिवाजी महाराज दि.३ एप्रिल १६८० रोजी स्वर्गवासी झाले. अशा राजा विना पोरकी असलेली जनता आजही आपल्या राजाच्या शोधात आहे. आपल्या या राजाचे वरील गुण घेऊन महाराष्ट्रीयन व भारतीय समाज विकासाची वाटचाल करत आहे...करत राहील.. आज देशात व राज्यात विविध समस्या आहेत, जयंतीच्या निमित्ताने त्या समस्या सोडविण्यासाठी सत्ताधारी व राजकारण्यांनी आणि समाजातील प्रत्येक घटकाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या या वरील विचारांचा अंगिकार करायला हवा. बुध्दी कौशल्यांचा वापर करून राज्य व राष्ट्र निर्माणात योगदान द्यायला हवे. आपल्या ह्याच कामातून आपण छत्रपती शिवाजी महाराजांना केलेले अभिवादन जनतेच्या कायम स्मरणात राहील. त्यांच्या या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांना कोटी कोटी प्रणाम...

# युगपुरुषाच्या युगप्रवर्तक कार्याचे स्मरण : छत्रपती शिवराय



डॉ. ज्योती रा.रामोड
संपर्क क्र. 9673774269

आधुनिक केसरी

**" देव्हाऱ्यात असणारे देव कुठेजन्माला येतात ते ठाऊक नाही पण देव्हाऱ्यातल्या देवांना सुरक्षित ठेवणारा माझा देव शिवराय येथे जन्मला " एक व्यक्ती स्वतःच्या आत्मविश्वासातून किती असामान्य आणि परिवर्तनवादी कार्य करू शकते याची अनेक उदाहरणे इतिहास अजराअमर आहेत. त्यातील एक मूर्तीमंत उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांची संघर्षमय कारकीर्द होय. आजही केवळ महाराजांच्या नामस्मरणाने प्रत्येकाच्या शरीरात आणि मनात नवचेतना निर्माण होते. तर त्या काळात महाराजांच्या एका शब्दावर बलिदान देणारे हजारो मावळे किती एकनिष्ठ आणि ध्येयप्रेरित होते हे उमजते. आज शालेय जीवनापासून ते महाविद्यालयीन जीवनापर्यंत वेगवेगळ्या स्तरावर महाराजांच्या जीवनाचा आणि कार्याचा परामर्श घेतला आहे. त्या पाठीमागचे कारण म्हणजे येणारी प्रत्येक पिढी अधिक कार्यक्षम,कर्तृत्ववान आणि एकनिष्ठ व्हावी हा उद्देश आहे.**

क्षत्रिय कुलवंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म 19 फेब्रुवारी 1630 साली शिवनेरी ( महाराष्ट्र ) येथे झाला. भीमाशंकराच्या जटात आणि नाणेघाटाच्या ओठात बसलेला किल्ला म्हणजे शिवनेरी होय असे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे म्हणतात. अन्यायाविरुद्ध लढण्याचा वारसा माता पित्याकडून व वंशपरंपरेनेच शिवरायांना मिळाला होता. लहानपणापासून आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीची जाणीव मातोश्री जिजाबाई यांनी शिवरायांना वेळोवेळी करून दिली होती. त्यामुळे या परिस्थितीवर मात करण्याच्या दृष्टिकोनातून त्यांची जडणघडण झाली. वडिलांकडून मिळालेली शिकवण आणि कौशल्य याचा परिपूर्ण वापर शिवरायांनी स्वराज्य स्थापनेच्या मातृस्वप्नपूर्तीसाठी केला.

कौटुंबिक जीवनामध्ये माता जिजाऊ यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन शिवरायांच्या जीवनाला वेगळी कलाटणी देणारे होते. शिवाजी महाराजांनी मोठ मोठ्या राजघराण्यांशी वैवाहिक संबंध निर्माण केले. ज्याद्वारे राजकीय सुरक्षितता व एकात्मिक संघटन निर्माण होईल. महाराणी सईबाई यांचे पुत्र संभाजी महाराज यांची कारकीर्द, स्वराज्यासाठी केलेले बलिदान आणि शिवविचार जिवंत ठेवण्यासाठी मृत्यूशी केलेली झुंज इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरलेली आहे. दुसरे पुत्र राजाराम महाराज यांचेही कार्य सर्वांना परिचित आहे.

छत्रपती शिवरायांना तत्कालीन समाजाची परिस्थिती पाहता एक गोष्ट लक्षात आली होती. साम्राज्य निर्माण करायचे असेल तर सिमेलगतचे गड किल्ले हस्तगत करणे खूप महत्त्वाचे आहे. या कारणास्तव जवळपास 400 गड किल्ले वेगवेगळ्या युद्धनीतीच्या माध्यमातून हस्तगत केले. छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक 6 जून 1674 साली रायगडावर संपन्न झाला. साडेतीनशे वर्षांपूर्वी छत्रपती शिवरायांनी केलेले अभुतपूर्वक कार्य संपूर्ण जगाला प्रेरणा देणारे आणि उद्दिष्ट पूर्तीसाठी नवचेतना देणारे आहे. मध्ययुगीन राजवटीत सुलतानाच्या विरोधात बंड करणे म्हणजे प्राणाशी गाठच असायची परंतु शिवाजी महाराजांनी या सुलतानशाहीला न जुमानता हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. स्वतःच्या पराक्रमाने, शौर्याने, धाडसाने आणि जिद्दीने मूठभर मावळ्यांच्या मदतीने महाराष्ट्राच्या भूमीवर भगवा फडकवला. याचे कारण म्हणजे स्वराज्याबद्दल असणारे प्रेम म्हणूनच छत्रपतींचे कार्य, पराक्रम आणि विचार आजच्या तरुण पिढीच्या मनात, मेंदूत आणि वर्तनात रुजवणे काळाची गरज आहे.

जाती-पातीच्या भिंती तोडून सर्वांना सन्मान दिला. प्रत्येक मोहिमेनंतर शिवाजी महाराज तलवारी मिरवणाऱ्या धारकऱ्यांना 'मानकरी', भाला फेकणाऱ्या निष्णात सैनिकाचा 'भालेराव' अशी उपाधी देऊन गौरव करायचे. जीवावर उदार होवून



चढाई करणाऱ्या सैनिकांना सोन्याचे कडे द्यायचे. भय हा शब्द महाराजांच्या ध्यानी-मनीही नव्हता. नियोजन करणे, माहिती गोळा करणे, जबाबदाऱ्या निश्चित करणे, यामुळे शिवाजी महाराजांना मोठे यश मिळाले. जिद्दीने, चातुर्याने आणि बुद्धी वापरून शिवाजी महाराजांनी समस्यांवर मात करत प्रचंड यश संपादन केले. गनिमी कावा हे शिवाजी महाराजांचे प्रमुख हत्यार होते. अनेक मोहिमा, लढाया शिवाजी महाराजांनी गनिमी कावा करून जिंकल्या.

रयतेवर जीवापाड प्रेम, निर्भिडपणा आणि जिद्द, दूरदृष्टी, गनिमी कावा, व्यवस्थापन, न्याय आणि सर्वधर्मसमभाव, समानता, एकात्मता, स्त्रीसन्मान, आदर, रयतेच्या सुख व समाधानासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढणारे राजे म्हणून छत्रपती शिवराय यांचे जीवन येणाऱ्या प्रत्येक पिढीला आपल्या कर्तव्याची आणि जबाबदारीची जाणिव करून देणारे आहे. कुशल नेतृत्व, कर्तुत्व, संघटन, सावधानता हे गुण महाराजांच्या अंगी होते. प्रजाहितदक्ष, एक प्रखर योद्धा, कुशल राज्यकर्ता, उदार व लोककल्याणकारी राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य जगाला सकारात्मक दिशा देणारे आहे. छत्रपती शिवरायांच्या या गुणांचे अनुकरण करण्याचे जर सर्वांनी ठरवले तर आजही समाजातील अनेक चुकीच्या घटनांना आळा बसेल आणि सर्व समाज सुख, समाधान व आनंदाने जीवन जगू शकेल. शिवविचार कायम मनात ठेवून समाजाप्रती कार्य करणे म्हणजेच खऱ्या अर्थाने शिवजयंती साजरी करणे होय.

" इतिहासाच्या पानावर, रयतेच्या मनावर, मातिच्या कणावर, विश्वासाच्या प्रमाणावर राज्य करणारा राजा म्हणजे छत्रपती शिवराय "

**(लेखिका बाबुरावजी घोलप महाविद्यालय नवी सांगवी, पुणे येथे इतिहास विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका आहेत)**



# शिवनीती काल आज आणि उद्या



अंजली दिनकर औतकार

आधुनिक केसरी

**महापुरुषांचे इतिहास म्हणजे काय तर पिवळसर पानांमध्ये अडकून पडलेले, त्यावर धूळ साचलेले, गुरफाटलेले विचार ! त्यांचा रोज रोज उहा पोहा करून जागर करणारा तज्ञ गट म्हणजे सो कॉल्ड नॅशनॅलिझम पसरवणारा अडाणी समाज ! खरंय ना ? हीच आपली आजकालची कमकुवत होत चाललेली आणि सत्याच्या दर्पणावर साचलेली धूळग्रस्त मानसिकता. पण इतिहासात घडून गेलेला शिवनीतीचा स्वराज्य काळ, आपल्या आजच्या वर्तमानात एखाद्या अखंड कादंबरी सारखा उभा राहून ,आपल्याला अखंड भारताचे भविष्य लिहिण्याला कसा प्रवृत्त करतो हे सांगण्या अगोदर यावर प्रकाश टाकणे मी गरजेचे समजते की माझे शिवबा एक व्यक्तिमत्व नव्हते ते तर एक संस्था होते , जिथे यानंतरही हजारो वर्ष विद्यार्थी बदलत राहिले.**

काळांवरही विजय प्राप्त केलेले शिवबाचे संस्कार त्यांचा आदम्यसाहस, त्यांचे विचार, त्यांच्या संकल्पना,त्यांचा दृढ निश्चय त्यांचा स्वाभिमान आणि त्यांची स्वायत्तता, त्यांचं हळवं मन, त्यांच्यातलं रौद्ररूप, त्यांच्यातला प्रजाहितदक्ष राजा, स्त्री सन्मान करणारा युगपुरुष, प्रखरणीतिमत्ता असणारा शीलवान युवक, भावनांनी ओसंडून वाहत असला तरी संयमाची दोर न सोडलेला अद्वितीय माणूस, नेहमी काही ना काही ना काही, नेहमी काहीतरी मोठं शिकवतच राहील. गरज आहे फक्त मंथनाची, शिवबाच्या सर्वव्यापी स्वरूपाच्या विचारांच्या मंथनाची. आणि आज माझ्या लेखणीला धन्य मानते की माझ्यात खेळ मांडलेल्या शिवस्वरूपाला या पानांवर उतरण्याचं सौभाग्य जिच्यामुळे मिळालं. जन्माचा सोहळा प्रत्येकाचाच होतो ,पण प्रत्येकाचा जन्मोत्सव साजरा होत नसतो. बाळाचा जन्म एखाद्या झोपडीत झाला तरी आई-बाबांना कोड कौतुक होतच किंबहुना राजमहालात तर गोष्ट वेगळीच. पण त्या जन्माचे स्वागत शिताफीने दौड लावणाऱ्या वाऱ्यानेही करावं, आणि ते नसताना करोडो वर्ष मराठी मनाच्या करोडो माणसांनी करावं. काहीतरी नाही बरच काही खास असावं लागतं.राजेंमध्ये होत. माझ्या छत्रपती बद्दलची ही संकल्पना सांगताना उर भावनांनी दाटून आला आहे की," हो आजही माझ्या राजांचा जन्मदिवस या मातीसाठी गौरवाचा दिवस आहे. शिवनीती म्हणजे एक असा खंड काव्यजे आपल्याच मराठी बोलीतून जन्म घेऊन ,आपल्या भारताला अखिल जगताचा गुरु म्हणजेच विश्वगुरू बनण्यासाठी मार्गदर्शक ठरतं. जहा डाल डाल पर सोनेकी चिडीया करती है बसेरा ! ही एकमेव कवितेची ओळ आपण गेल्या कित्येक वर्षांपासून वारंवार गात आहोत, भाषणांमध्ये लिखाणांमध्ये वापरत आहोत तेव्हा आवर्जून ही गोष्ट सांगावीशी वाटते की गौरवशाली इतिहासावर वारंवार बोट फिरवून अभिमान साजरा करायला सगळ्यांनाच आवडतो, पण वर्तमानाचा आरसा पाहून चुकांना सुधारून, वेळीच बदलांचा अवलंब करून, भविष्यात त्याच सुवर्णमय इतिहासासारखी सोनेरी पाने लिहिण्यासाठी आपण मागे पुढे पाहतो. तेव्हा शिवनीतीपेक्षा दुसरा प्रभावी पर्याय सापडणे कठीणच ! या विषयाच्या पूर्वार्धात सर्वांसमोर छत्रपतींचा सुवर्णकाळ ठेवावा, शिवनीती मांडावी, शिव विचार सजवावा, म्हणून या महाराष्ट्र भूमी कडे डोळे बंद करून अंतर्मनाने पाहिलं.

क्षणभर म्हटलं थोडं थांबून महाराष्ट्राच्या मातीला विचारावं शिवबा कसे होते, मग म्हटलं नाही सह्याद्रीच्या ह्या अखंड रांगांना विचारावं, अचानक डोक्यात आलं युगपुरुषरुपी खड्या असणाऱ्या बुरुजांसारख्या दिसणाऱ्या पण गडगंज छातीच्या किल्ल्यांना विचारावं, जे शिवबांच्या दूरदृष्टीकोनातून घडले त्या किल्ल्यांना, त्या गडकोटांना विचारावं त्यांची बांधणी करताना एक महान कलाकार उपजला होता का शिवरायांमधला त्यांनाही ?

मनाने नुसती मान वळवली आणि त्या गडकिल्ल्यांवर सज्ज असणाऱ्या आज शांत पडून प्रदर्शनीच कार्य करणाऱ्या, तोफांना विचारावंस वाटलं ,ज्या कधी कडाडत होत्या राजांच्या एका इशाऱ्यावर, कसे होते माझे राजे आज रिकाम्या पडलेल्या नुसत्या मार्गदर्शकांच्या भाषेत समजणाऱ्या त्या दरबाराच्या जागांना विचारावं की, किती न्यायाच्या ,किती धर्माच्या ,किती स्वायत्ततेच्या ,निर्णयांचे साक्षी झाले ते दरबार ? रायरेश्वराच्या मंदिरात जाऊन विचाराव सापडलं का एखादा छोटस पोरं माझ्या राजांसारखं दृढनिश्चयी, घालावं साकडं त्या रायरेश्वराला आणि विचारावं काय पाहिलं होतं त्यांनी माझ्या राजांच्या डोळ्यात ?

मग म्हटलं आज माझ्या अखंड भारताची नौसेना स्वतःच चिन्ह म्हणून छत्रपतींच्या राजमुद्रेचा लौकिक स्वीकारते ,तेव्हा त्या विशाल समुद्राला विचारावं माझ्या राजा आणि इतकी गहिरी नजर आणि उंच भरारी असणार दुसरं कोणी पाखरू सापडलं का आजवर ? किंवा मग रात्रंदिवस माझ्या राजांची वाट मोकळी करणाऱ्या त्या रस्त्यांना,पाय वाटांना विचारावं कसे भासले त्यांना राजे ? त्या घोड्यांना विचारावे काय पाहिलं प्रत्येक युद्धात, काय पाहिलं उन्हातान्हात, काय पाहिलं माझ्या राजांच्या एका शिवबाच्या मागे उभे राहून ठामपणे स्वराज्याची बाजू धराविशी वाटली ? त्या भोळ्या भाबड्या माय बहिणींना विचारावं की स्वतःच्या भलेही गुलामगिरीतल्या पण संपूर्ण अशा संपन्न संसाराची किंमत शिवविचारांपुढे का थोडकी वाटली ?

त्या घोड्यांना विचारावं की स्वतःच्या टापांसारखं राजांच धावतं मन त्यांनी पाहिलं असेल ना तेव्हा त्यांना कसं वाटलं ?

क्षणभर वाटलं त्या फडफडणाऱ्या भगव्याला विचारावं, की दर दिवशी समोर पाऊल टाकणार स्वराज्य उभं करताना राजेंना किती रुपांमध्ये बघितलं ? एकवेळ वाटलं राजेंच्या सुनबाई येसूबाई साहेबांना जाऊन विचारावं त्यांच्या हाती निर्णयांची शिक्के कट्यार देताना शिवबा मधला एक पुराणपुरुष दिसला असेल ना त्यांना ? जो नुसत्या स्त्री रक्षणाच्या गोष्टी करत नाही तर स्त्रीला स्वतःच्या बरोबरीतल स्थान देतो. कौतुकाच्या थापेत ? असंख्य मावळ्यांना , झोपड्यांतून निघालेल्या लेकरांना विचारावे की स्वतःचा जीव तळहातावर ठेवून, का त्यांना शिवबाची साथ द्यावी वाटली. असंख्य खानाखुणा, असंख्य पुरावे इतिहासाच्या पानांमध्ये लपून बसलेले अनेक किरदार....कुणाला जरी खेचून आणलं असतं आणि छत्रपती कसे भासले इतकं विचारलं असतं ना,तर एक विशाल कादंबरी निर्माण व्हायला क्षणभराचाही वेळ लागला नसता. पण मला विषयाचा उत्तरार्ध गाठायचा होता.. आज महाराष्ट्रात नव्हे नव्हे तर भारतात शिव विचारांची गरज दर्शवण्यासाठी सर्वांनी दुर्लक्षित केलेला पण सर्वाधिक महत्त्वाचा असणारा विषय सर्वात अगोदर मांडणे मी गरजेचे समजते.कुठेतरी व्याख्यानात ऐकलं होतं, चंद्रकांत वानखेडे नावाचे विदर्भातील एक लेखक यांच्या एका पुस्तकात ज्याचं नाव " एका साध्या सत्यासाठी देता यावे पंचप्राण." या पुस्तकाच्या सुरुवात करताना ते म्हणतात भारत स्वतंत्र होण्यापूर्वी पहिल्या महायुद्धात, दुसऱ्या महायुद्धात, प्लासीच्या लढाईत, भारतात झालेल्या उठावांमध्ये, भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत, आणि त्यानंतर भारतात झालेल्या रोगराईमुळे, जेव्हा लोकांचा मृत्यू झाला.



त्यापेक्षा दुप्पट संख्या भारत स्वतंत्र झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्यांची आहे. परत वाचा वाक्य फार लहान आहे पण एवढ्या सगळ्या लढायांमध्ये मृत्यूंची संख्या कमी असताना स्वतःच आत्महत्त्या करून मेलेल्या शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. जर हे सत्य आहे तर, खरंच भारत स्वतंत्र होण्याचं काहीतरी महत्व आहे का....? मराठवाडा आणि विदर्भात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण जरा जास्तच आहे तेव्हा कृषिमंत्री स्वतःच्या भाषणात सांगतात विदर्भातील मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या करतो त्याच्या एकतर्फी प्रेमप्रकरणामुळे.... आणि तशाच एका शेतकऱ्याचा मुलगा सांगतो हो माझ्या बाबांनी आत्महत्या केली ती त्यांच्या एकतर्फी प्रेमप्रकरणामुळे कारण....कृषिमंत्र्यांना समजला ते एकतर्फी प्रेम कुण्या मुलीवर केलेला होता आणि मला कळलं की माझ्या बापाने ते एकतर्फी प्रेम या काळ्या आई वर वर्षानुवर्षे केलं होतं. वर्तमानातली ही विदारक परिस्थिती पाहता विज्ञान युगात भरारी घेणारा भारत , कृषीप्रधान संस्कृती असणाऱ्या देश अर्थव्यवस्थेचा पाया असलेल्या शेतकऱ्याला जराही किंमत देत नाही आणि दिली तरी ती योजना रुपी भीक असते, ज्यात अगोदरच लाचखोर अधिकारी आणि राजकारणी हिस्सा धरून बसतात तेव्हा शिवनीतीचा आरसा, शिवरायांच्या शेतकरी धोरण पाहणे आणि समजून घेणे गरजेचे भासते. शिवरायांनी समाजाच्या प्रत्येक घटकाला मोठ्या प्रमाणावर एका माळेत ओवनाचा प्रयत्न केला आणि त्यातलाच एक सुंदर मोती म्हणजे शेतकरी समजला गेला. शिवशाहीच्या काळात एवढा भीषण दुष्काळ पडला, की भुकेपोटी माणसांची नजर मेलेल्या जनावरांवर पडू लागली, आणि पोट भरण्यासाठी एक विलक्षण जनावर माणसातून बाहेर पडू लागलं. सगळीकडे दुष्काळ आणि वाईट परिस्थिती असतानाही शिवछत्र छायेत म्हणजेच महाराष्ट्रात एकाही शेतकऱ्याने आत्महत्या केली नाही खरं तर एवढं वाक्य बोलले म्हणजे हा विषयच पुरते ला गेल्यासारखा वाटत आहे. छत्रपती शिवरायांचं कृषी धोरणजाणता राजा..कष्टकऱ्यांचा, शेतकऱ्यांचा राजा...म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज..शिवाजी महाराजांची शेती आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक धोरणं राबवली, राज्यात जलसंधारणाची अनेक कामं केली. त्याकाळी त्याचे शेती विषयीचे विचार हे आजच्या काळातही विचार करायला लावणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराज प्रभावळी मामल्याच्या सुभेदार रामजी अनंत याला 5 सप्टेंबर 1676 ला पाठवलेल्या पत्रात म्हणतात. - " इमाने इतबारे स्वामीकार्य करावं अशी तू शपथ वाहिली आहेस, त्यानुसार भाजीच्या एका देठावरही मन न दाखविता रास्तपणे व योग्यपणे वागावे. रयतेचा वाटा रयतेला मिळेल आणि महसूल आपल्याला येईल ते करावे. रयतेवर काडीचाही जुलूम झाल्यास आम्ही तुझ्यावर राजी नाही हे नीट समजावे "याच पत्रात ते पुढं म्हणतात. ज्या गावी जातील तेथील सर्व कुणबी गोळा करावे. बैल, नांगर आणि पोटाकरिता धान्य नसल्यामुळं जो अडून निकामी झाला असेल त्याला दोन चार बैलांकरिता रोकड हाती देऊन आणि पोटाकरिता दोनचार खंडी धान्य द्यावे. त्याच्याने शेत करवेल ते करवून घ्यावे, नंतर बैलाचे व धान्याची रोकड वाढीदिडी न करता फक्त मुद्दलच हळूहळू त्याच्या ऐपती प्रमाणं वसूल करावी. आणि महत्त्वाचे म्हणजे शिवकाळात हे सर्व कायदे आखूण फक्त कागदी भाषेत राहत नसत, तर यांचा वावर जनतेत मनसोक्त होत असे सर्वांना समान न्याय हक्क मिळत असे.

आता आजच्या लोकशाही समोर सर्वाधिक मोठे प्रश्नचिन्ह असणारा विषय म्हणजेच स्त्री सुरक्षा !आपला भारत देश आज त्या देशांमध्ये गणला जातो जे आपल्या अंतरीक आणि बाह्य सुरक्षेवर सर्वाधिक जास्त खर्च करतात, पण तरीसुद्धा याच देशाची 40% लोकसंख्या असणाऱ्या स्त्री जातीला अजूनही पूर्ण सुरक्षा देण्यास असमर्थ आहे. तेव्हा समान वागणूक जगण्याचा समान हक्क केव्हा मिळेल हा प्रचंड विवेचनाचा विषय. स्त्रीची विदारक परिस्थिती इथे मांडली तर विषय भरकटेल शिवाय जागर करण्याची काहीही गरजही नाही ,दररोज वर्तमानपत्रात छापल्या जाणाऱ्या खबरा, मीडिया द्वारे तासंतास चालणाऱ्या डिबेट्स आणि दररोज घडणाऱ्या घटना आजच्या स्त्रीची परिस्थिती आपल्यासमोर उभी करतातच.

आता पुन्हा मला असं म्हणावसं वाटतं की भविष्यात जर हे चित्र बदलायचं असेल तर इतिहासात मागे फिरवून शिवछत्रपतीच्या काळातील स्त्री अभ्यासणे फार गरजेचे आहे.

स्वराज्यात स्त्रियांचे स्थान अगदी कल्पनेच्या पलीकडचं होतं, जिथे आज आपल्या संविधानाला स्त्रियांची समाजातील स्थान टिकवून ठेवण्यासाठी 50 टक्के आरक्षण द्यावे लागले, तिथे इतक्या वर्षा अगोदर सुद्धा जिजाऊंच्या शिकवणींनी स्वराज्य असं फुलत होतं की प्रत्येक स्त्री मानाने जगू शकत होती.

जिजाऊंचं स्वराज्यातील स्थान तर वेगळं सांगण्याची गरज नाही, पण छत्रपती शिवरायांच्या जीवनातील इतर स्त्रियांचे स्थान ही त्यांनी कसं जपलं ही खरच अभ्यास करण्यासाठी गोष्ट आहे.

छत्रपतींच्या आयुष्यात कांचन आणि कामिनी ह्या दोन गोष्टी कधीच आल्या नाहीत ' ही फार सुंदर ओळ मी कुठेतरी ऐकलेली.

आता अर्थबोध व्हायला जास्त वेळ लागणार नाही कारण कदाचित छत्रपती एकमेव राजे असतील तेव्हा ज्यांना ना मदिरेचा नाद होता ना स्त्रीचा. त्यांच्या दरबारी कुठलीही स्त्री नाचली नाही, त्यांच्या कुठलाच राणीला कधी स्वतःच मत मांडताना संकोच झाला नाही. इतकंच काय तर विरोधात उभ्या असणाऱ्या स्त्रीचाही शिवरायांनी आदर केला नंतरच्या काळात स्वतःच्या सुनबाई येसूबाई साहेबांना स्वराज्याची शिक्के कट्यार दिली..हे आणि असे कित्येक किस्से पुन्हा पुन्हा सांगावे आणि हा सगळा महापराक्रम घडून आला तो यामुळेच की छत्रपतींच्या विचारांची गंगोत्री जिथून सुरू वहायची तिथे स्वतःच्या हातात घागर घेऊन पाणी टाकणाऱ्या जिजाऊ उभ्या होतात. तर आपणही पात्रतेला योग्य असणाऱ्या आजच्या स्त्रियांना एक संधी तर द्यायला हवी ना पुन्हा स्वराज्यासारखा समाधानी समाज घडवण्यासाठी. संपूर्ण शिवनीती म्हणजे शिवाजी महाराजांचा जन्म काळ असतानाच स्वराज्य एवढेच नव्हे तर त्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांचा शासन काळ ते तोपर्यंत मराठा शासन इमानदार लोकांच्या हातात होतं जोपर्यंत रयतेला आपल्या मातीत आपल्या अभिमानाला राखून जगता आलं तोपर्यंतचा काळ. तिथे गणीमांना माफी कधीच मिळाली नाही , राजेद्रोह करणाऱ्यांना दिलेल्या कठोर शिक्षा आपण पाहतो तेव्हा नितळ गंगेच्या पाण्यासारखं शुद्ध राजकारण शिवनीतीमध्ये दिसू लागतं ! दुसरीकडे तीच गढूळ झालेली गंगा दिसते जी राजकीय पक्षांची मस्करी बनवून ठेवते आणि छोट्या छोट्या बालिश कारणांना समोर करून पक्षांतर करते. आणि मग शिव विचारांना गुरफटलेले विचार म्हणणाऱ्या, होऊन गेलेल्या इतिहासाला जुना काळ म्हणून फेटाळणाऱ्या बालिश विचारांवर पश्चाताप करावासा वाटतो. खरं सांगायचं झालं तर आज अखंड भारतात असणाऱ्या समस्या पाहता तो मांडण्यासाठी आणि शिवनीतीची तुलना करून प्रदर्शित करण्यासाठी लेखाची शब्द मर्यादा खरच कमी वाटू लागते. कारण शिवराज्य म्हणजे छत्रपतींच्या अधिपत्याखाली आलेले राज्य झालं असतं ,त्यांनी बनवलं स्वराज्य यावर सर्वांचा समान हक्क असेल ! मग तो राजा असो राजांचा पुत्र असो, सरदार असो की त्यांच्या वंशाचा कुणीही, मावळा असो की त्याच्या घरातले कुणीही सामान्य जनता, स्त्री ,पुरुष ,प्रौढ, छोटे बालक प्रत्येकाच्या हक्काचं असं स्वराज्य. राजेंचं राज्य म्हणूनच जगावेगळं होतं स्वराज्य म्हणजे प्रत्येकाच्या हक्काचं स्वतःला आणि इतरांना राजेंनी ही जाणीव नेहमी करून दिली की हे श्रींच राज्य आहे आणि इथे कुणीही कुणाचा मालक नाही किंवा कुणी कुणाचा गुलाम नाही. शिवरायांचा काळ फक्त म्हणण्यापुरता सुवर्णकाळ नव्हता, आजच्या विज्ञान युगातील व्यवस्थेलाही लाजवेल अशी जलविषयक, शेती विषयक, राजकारणाविषयक , किल्ले बांधणी विषयक ,नौसेना निर्मितीची ,युद्धनीतीची , मूर्तिमंत उदाहरण आपल्याला पाहायला मिळतात. त्या काळातही स्वच्छता विषयक धोरणांची नियमावली असंण राजांच्या दूरदृष्टीचं प्रतीक आहे. एकीकडे नोकऱ्यांसाठी हताश होऊन आंदोलन करणाऱ्या बेरोजगार तरुण पिढीकडे पाहताना, सरकारी कार्यालयांसमोर दिनवाणी विनवणी करताना पाहिलं की शिवराय आठवतात जे दुष्काळात शेत पिकलं नाही म्हणून रयत बेरोजगार राहू नये यासाठी गडकिल्ल्यांची दुरुस्तीची काम समोर आणत, सेनेत भरतीचे कायदे काढत मग आपसूकच अशा नीतीचा अवलंब आपणही भविष्याच्या वाटचालीला करावा हे वाटते.

आज जातीय दंगली पाहायला मिळतात , एकमेकांच्या धर्मांविरुद्ध मीडिया माध्यमांद्वारे मोठ्या मोठ्या डिबेट्स रंगतात, सर्वात जाती धर्मांना समान न्याय हक्काची तरतूद असणाऱ्या संविधानाची भर रस्त्यात लत्तर उठताना दिसतात तेव्हा काळ असूनही, रूढी परंपरांमध्ये रुजलेले वाढलेले विचार असतानाही शिवरायांनी सर्व धर्मांना समान देण्याचे तत्व स्वीकारले, धर्मांतर करून दुसरीकडे गेलेल्यांना पुन्हा स्वधर्मात घेण्याची उच्च कोटीची नीती आपल्याला दिसते आणि मग आपण का शिव विचारांना मार्गदर्शनाचं मंदिर म्हणून उद्याची वाटचाल करू नये हा प्रश्न उभा राहतो ? शिवानीती काल आज आणि उद्या नेहमी अस्तित्वात असेल आणि असलीच पाहिजे , आपण इतिहासाकडून शिकलोच पाहिजे ! नवीन काही करण्याची अबोल अशा मनात बाळगणे उत्तमच पण ते नवीन करताना, जुन्याची गाठ जर पदराला असेल तर समृद्धीची स्वच्छंद सावली सगळ्यांनाच अनुभवता येईल. पूर्ण शिव विचारांचे गठन करण्यात मी असमर्थ आहे शिवाय या शब्दांना मर्यादा आहेत कारण शिवनीती रूपी विशाल कादंबरी समजून घ्यायची असेल तर तिचा अभ्यास गरजेचा. आपापल्या जाती-धर्मांची पुस्तक आपण वाचतो, त्यांचे पूजन करतो त्यांना शिरोधार्य मानतो. मानावेच आपल्या रूढी, परंपरा, संस्कृती ,संस्कार जपण्याचं स्वातंत्र्य आपल्याला स्वतंत्र भारतात भेटतं. त्याबरोबर फक्त छत्रपती शिवरायांच देश उभारणीचा, देश बांधणीचं नवनिर्मितीचा धोरण जर आपण वाचायला सुरुवात केली समजून घ्यायला सुरुवात केली तर नक्कीच उद्याचं भविष्य त्या काळाच्या घोड्याच्या टापांमागे उडत जाणाऱ्या भगव्या माती प्रमाणे चहूकडे पसरलेल्या सुवर्ण किरणांचं असेल. "शिवनीतीच्या समीकरणाला समजून समाजकारण" ही बहुमूल्य वाट आपण आता तरी धरायला हवी एवढा आशावाद व्यक्त करून शिवछत्रपतींच्या चरणी अभिवादन !

# शिवरायांचे महिला विषयक धोरण आणि आजची स्थिती

आधुनिक केसरी

रांझ्याच्या पाटलाने बलात्कार केल्याचे समजताच त्याचे हातपाय तोडून चौरंग केला. आज मात्र माता भगिनींनी अब्रू लुटणारे हजारो नराधम न्यायालयाच्या छत्राखाली स्वतःला वाचवण्यासाठी धडपडत आहेत ! म्हणून आजही शिवरायांच्या स्वराज्याची छाप प्रत्येकाच्या श्वासाश्वासात आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

तीन वर्षांपूर्वी हिंगणघाट येथे एकतर्फी प्रेमातून प्राध्यापिका असलेल्या तरुणीला एका नराधमाने जिवंत जाळल्याची घटना आजही सर्वांच्या स्मरणात आहे. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. तीन वर्ष उलटूनही हिंगणघाटच्या या निर्भयाला न्याय मिळालेला नाही. या नराधमाला फाशी होईल अशी अपेक्षा असताना त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली. ही शिक्षाही रद्द व्हावी यासाठी हिंगणघाटचा हा नराधम आजही न्यायालयाच्या छत्राखाली स्वतःला वाचवण्यासाठी धडपडतोय. या शिक्षेविरुद्ध तो आता वरच्या न्यायालयात अपील करेल. हिंगणघाटची घटना स्त्री अत्याचाराची ही महाराष्ट्रातील पहिली घटना नव्हती. याआधीही अशा अनेक घटना घडल्या आहेत. दररोजचे वर्तमानपत्र चाळलं तर त्यात विनयभंग, छेडछाड, बलात्काराची एकतरी बातमी दिसतेच. आजूबाजूला घडणाऱ्या महिलांविरोधी गुन्ह्यांच्या घटना पाहिल्या की शिवरायांच्या विचारांची, शिवरायांच्या धोरणाची कधी नव्हे इतकी गरज आज असल्याचे जाणवते. कारण शिवरायांच्या शिवशाहित महिला जितक्या सुरक्षित होत्या तितक्या त्या कोणत्याच काळात नव्हत्या. कारण शिवरायांचे महिला विषयक धोरण. मध्ययुगीन काळात शिवरायांचा जन्म झाला. या काळात महाराष्ट्र परकीयांच्या गुलामगिरीत होता. शिवरायांनी महाराष्ट्राला परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचा संकल्प केला. मराठी माणसांच्या मनात अस्मिता निर्माण केली. अठरापगड जातींना एकत्र करून त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. यात सर्वात मोठे कार्य म्हणजे महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी केलेल्या सुधारणा, नियम आणि उचललेले कठोर पावले. त्यांचे हे पाऊल म्हणजे महिला मुक्तीसाठी केलेली क्रांतीच होती. हजारो वर्षांपासून चालू असलेल्या अनिष्ठ चालीरीती बदलण्याची धमक कोणत्याच राजाने दाखवली नाही, ती धमक शिवरायांनी दाखवली. त्यांनी स्वतःच्या आईला सती जाण्यापासून परावृत्त केले ही त्याकाळातील सामाजिक क्रांतीच होती. त्याकाळी महिलांना गुलामीची वागणूक दिली जात होती. महिलांची खरेदी - विक्री केली जात होती. महिलांना गुलाम म्हणून वागवले जात होते. शिवरायांनी या सर्व गोष्टींवर बंदी आणली. शिवरायांचे महिलाविषयक धोरण अत्यंत आदराचे होते. जिजामाता या शिवरायांच्या गुरू होत्या. जिजामातेनेच त्यांना स्त्री जातीच्या सन्मानाचे बाळकडू पाजले म्हणूनच पर स्त्री मातेसमान मानणारा व शत्रूच्या स्त्रियांना सन्मान देणारा युगपुरुष म्हणून शिवरायांची इतिहासात नोंद झाली. शिवराय खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. रक्षणकर्ते होते. सैन्याला राजांचे सक्त आदेश होते. स्त्रियांना मोहिमेवर आणू नये, त्यांना युद्धात पकडू नये. स्त्री संबंधी गुन्ह्याला क्षमा नव्हतीच उलट कठोर शिक्षा होती, मग तो कोणीही असो. साधा शिपाई, वतनदार, किल्लेदार, कुणालाही माफी नव्हती. हातपाय तोडणे, देहदंड अशा कठोर शिक्षा दिल्या जात. रांझ्याच्या पाटलाने गरीब शेतकऱ्याच्या तरुण मुलीला उचलून नेऊन भोगली. त्या तरुण मुलीने आत्महत्या केली. जेंव्हा ही गोष्ट शिवरायांना समजली तेंव्हा शिवरायांनी त्याच्या मुसक्या बांधून त्याला पुण्याला आणले. त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा दिली. जी गोष्ट रांझ्याच्या पाटलाची तीच गोष्ट कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची. तीच गोष्ट सकूजी गायकवाड या सेनापतीची. महिलांसबंधी गुन्ह्याला त्यांच्याकडे क्षमा नव्हती उलट कडक शिक्षाच होती. शिवरायांच्या या महिलाविषयक धोरणामुळेच महिला सुरक्षित होत्या. महिलांना सुरक्षा पुरवण्यात सरकार अपयशी ठरत आहे. कायदे असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. राज्यकर्त्यांनी शिवरायांच्या महिलाविषयक धोरणांचा अभ्यास करुन ते राबवण्याचा प्रयत्न केल्यास देशात शिवशाही अवतरल्याशिवाय राहणार नाही.

# रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज

आधुनिक केसरी

**शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्यावर झाला. हा शिवनेरी किल्ला पुणे जिल्हात आहे. शिवाजी महाराज यांचे पूर्ण नाव शिवाजीराजे शहाजीराजे भोसले असे आहेत. शिवरायांच्या पत्नीचे नाव : काशाबाई जाधव 5. सईबाई निंबाळकर, गुणवंतीबाई इंगळे, 6. सकवारबाई गायकवाड, पुतळाबाई पालकर, 7. सगुणाबाई शिंदे, लक्ष्मीबाई विचारे, 8. सोयराबाई मोहिते, शिवाजी महाराज यांचे मुले :- 1. छत्रपती संभाजी भोसले, 2. छत्रपती राजाराम, शिवाजी महाराज यांच्या मुली :- 1. अंबिकाबाई महाडिक, 2. कमळाबाई (सकवारबाई यांची कन्या ) 3. दीपाबाई 4. राजकुवारबाई शिर्के (सगुणाबाई यांची मुलगी ) 5. राणूबाई पाटकर 6. सखुबाई निंबाळकर (सईबाई यांची मुलगी )**

शिवरायांच्या काळात व्यवहारासाठी चलन-होन, शिवराई, (सुवर्ण होन, रुप्य होण) असे होते. शिवरायांच्या राजब्रीदवाक्य 'प्रतिपच्चंद्रलेखेव। वर्धिष्णुर्विश्ववंदिता। शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते।। हे होते. याचा मराठीत अर्थ ज्याप्रमाणे चंद्र वाढत जातो, आणि साया विश्वात वंदनीय होतो, तशीच शहाजींचा पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तीच लोकिक वाढत जाईल.

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज हे शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावानी ओळखले जातात. शिवाजी महाराजांचा जन्मदिवस हा शिवजयंती म्हणून साजरा केला जातो. तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे पुत्र संभाजी महाराज यांचा संयुक्त उल्लेख 'शिवशंभू' असा होता. शिवाजी महारज यांनी शिस्तबध्द लष्कर व सुसंघटीत प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भूगोल, आश्चर्यजनक वेगवान हालचाली बलाढ्य शत्रूचे मनोधैर्य खच्ची करणारे नेमके हल्ले यांचा वापर करणारे गनिमी काव्याचे तंत्र यांनी यशस्वीपणे वापरले. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या २००० सैनिकांच्या एक छोट्या तुकडीपासून ते एक लाख सैनिकांचे लष्कर छत्रपती शिवाजी महाराजांनी उभे केले. शिवाजी महाराज यांनी राज्यकारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. शिवाजी महाराजांनी किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. छत्रपती शिवाजी महाराजाबद्दल पंडित नेहरू आपल्या डिस्कवरी ऑफ इंडिया (भारताचा शोध) या ग्रंथात म्हणतात की- "छत्रपती शिवाजी प्रतिहल्ला करणाऱ्या हिंदू राष्ट्र वादाचे प्रतिक होते. जुन्या इतिहासातून त्यांनी प्ररणा मिळवली महाराज अत्यंत धैर्यशील आणि उत्कृष्ट नेतृत्व असणारे नेते होते. त्यांनी स्वराज्यासाठी चिवटपणे लढणारा गट म्हणून मराठी जणांना एकत्र केले, त्यांच्यामागे राष्ट्रीयत्वाची पार्श्वभूमी उभी केली. आणि या गटास अशी चेतना दिली की या गटाशी धड्का घेत मुघल साम्राज्य अखेर मोडकळीसा आले. छत्रपती शिवरांचा मृत्यू १६८० मध्ये झाला तरी त्याच्यानंतर प्रभुत्व प्रस्तापित होईपर्यंत मराठ्यांचा राज्यविस्तार होतंच राहिला".



शिवरायंची पाहिली स्वारी ई.स १६४७ मध्ये सतरा वर्षचे शिवाजी राजांनी आदिलशहाच्या ताब्यातला तोरणगड जिंकला आणि स्वराज्यची मुहर्त मेढ रोवली. तोरणगड हे स्वराज्यचे तोरणच ठरले. त्याचसाली छत्रपती शिवाजी महाराजांनी कोंढाणा (सिंहगड), आणि पुरंदर हे किल्ले त्याचे नाव त्यांनी राजगड ठेवल. राज्याभिषेक छत्रपती शिवाजी भोसले हे अभिषिक्त राजे नसल्याने अनेक व्यावहारिक तोटे शिवरायांना व त्यांचा साथीदारांना जाणवत होते. शिवाजीराजांनी अनेक जमिनीवर स्वायित्व मिळवले असले तरी त्यांच्याजवळ मजबूत लष्कर आणि नौदल असले तरी आणि असंख्य सैनिकांवर त्यांचा हुकुम चालत असलातरी सैद्धानितिकदृष्ट्या त्यांची स्थिती ही राजासारखी किंवा सम्राटासारखी नव्हाती. मुघल सम्राटाच्या लेखी ते एक जमिनीवर होते; आदिलशहासाठी ते एका जहागीरदाराचे बंडखोर पुत्र होते. कोणत्याही राजासोबत समान दर्जाचा दावा ते करू शकत नव्हते तसेच ज्या लोकांवर त्याचे राज्य होते त्या लोकांकडून स्वामीनिष्ठेचे वा भक्तीचे खरीखुरी अपेक्षा राज्याभिषेकाशिवाय त्यांच्या अज्ञान किंवा आदेशांना अखिल रयत गांभीर्याने घेईलच असे नव्हते.राज्याभिषेक झालेला नसल्याने कोणत्याही तहावर स्वाक्षरी करणे, विधिवत मार्गाने एखाद्याला जमीन देणे व आपल्या राजकीय सत्तेच्या भविष्याची हमी देणे शक्य नव्हते. आपल्या राजकीय निर्मितीला (स्वराज्याला) कायदेशीर मान्यता मिळवून देऊन तिचे अस्तित्व कायम राखण्यासाठी राज्याआभिषेक आवश्यक होता. प्राचीन हिंदू शास्त्राप्रमाणे केवळ क्षत्रिय वर्णातील व्यक्तीसच राजा म्हणून अभिक्त केले जाऊ शकत होते आणि अशी व्यक्तीच हिंदू रयतेचा राजा असल्याचा दावा करू शकत होते. ६ जुन १६७४ रोजी शिवाजीराजांचा रायगडावर राज्याभिषेक करण्यात आला. त्या दिवसापासून शिवाजीराजांनी शिवराज्याभिषेक शक सुरु केला आणि शिवराई चलन जारी केले. याशिवाय नवी कालगणना सुरु होऊन नवा शक सरु झाला. फारसी-संस्कृत शब्दकोश बनवला गेला. या मध्ये फारसीच्या जागी संकृत शब्द वापरणे यासाठी हुकुम जारी केले. तसेच पंचांगशुद्धी करण्याची सक्ती केले. यासाठी कृष्ण दैवज्ञ नायक ज्योतिष आणवला या ज्योतिषाने ग्रंथ लेखन करावे आणि संबंधितांना रित घालून द्यावी असा आदेश दिला. तसेच त्याज कडून 'करणकौस्तुभ' नामक ग्रंथही लिहून घेतला.

वरील लेख हा शिवजयंती निमित्त घेतलेला एक आढवा आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची** - शिवकाल, लेखक डॉ.गो.खोबरेकर, प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथमावृत्ती २००६ टाईम्स ऑफ इंडिया[१] (इंग्रजी मजकूर ) शिवाजी अँड हिज टाईम्स, लेखक जदुनाथ सरकार, प्रकाशक लाँगमन्स, ग्रीन अँड कं., दुसरी आवृत्ती, १९२० छत्रपती शिवाजी महाराज, लेखक डॉ. प्र.न.देशपांडे, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, द्वितीयावृती, जुलै २००७. "छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित- निवडक ई-बुक, ऑडीओ बुक, पीएचडी. प्रबंध विविध भाषेतील चित्रपट, गड / किल्ले माहिती, सरदार, मावळे, पोवाडा, राज्यभिषेक ई –साहित्य""छत्रपती शिवाजी महाराजांशी सबंधित- निवडक ई-बुक, ऑडिओ बुक, पीएचडी. प्रबंध विविध भाषेतील चित्रपट, गड / किल्ले माहिती, सरदार, मावळे, पोवाडा, राज्याभिषेक ई – साहित्य"

**संशोधक विद्यार्थी:- भारत आसाराम बल्हाळ**
**(एम.ए. मराठी) अंकुशराव टोपे कॉलेज जालना**

# छत्रपती शिवराय समजून घेताना ...

आधुनिक केसरी




सागर न. ननावरे
पुणे

**आज हिंदवी स्वराज्य संस्थापक आणि राष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती. आजचा दिवस म्हणजे एखाद्या उत्सवापेक्षा कमी नाही. इतिहासात अनेक राजे, योद्धे होऊन गेले. हे राजे पराक्रमी, शूरवीर, दानशूर व न्यायीसुद्धा होते. पण या महान, पराक्रमी राजांचा नावलौकिक विशिष्ट अशा राज्याचे राजे म्हणून होता. परंतु यामध्ये एका राजाने आपले वेगळेपण जपले ते एका विशिष्ट अशा वलयाने . आणि हे वलय म्हणजे रयतेचा राजा. आजही रयतेचा राजा म्हटलं की छत्रपती शिवाजी महाराजांशिवाय दुसरं कुठलं नाव समोर येत नाही. आणि म्हणूनच रयतेच्या हितासाठी, स्वराज्यहितासाठी पराक्रमांची शर्थ करणाऱ्या छत्रपती महाराजांसारखे राजे पुन्हा होणे नाही.**

सुमारे साडेतीनशे वर्षांनंतरही लोकांच्या ह्दयात जिवंत असणारे असामान्य व्यक्तिमत्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. आज शिवजयंतीचा उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा होणार. आणि व्हायलाच पाहिजे. यात घोषणा, मिरवणुका ,रथयात्रा आणि विविध कार्यक्रम आदींची रेलचेल असणार. सर्वत्र धामधूम, जल्लोष आणि आनंद पाहायला मिळणार. एकूणच आजचा दिवस एखाद्या सणाप्रमाणेच साजरा होणार हे निश्चितच सुखावणारे आहे. मात्र यासोबतच छत्रपती शिवाजी महाराज हे असामान्य व्यक्तिमत्व समजून घेणे गरजेचे आहे. शिवराय केवळ जयंतीपुरते किंवा जयघोषांपुरते मर्यादित न राहता तो एक विचार म्हणून मनामनात रुजणे गरजेचे आहे. एक प्रेरणा म्हणून कृतीतून आचरणात येणे गरजेचे आहे. आणि म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराज हे समजून घेणे गरजेचे आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वातून आणि जाज्वल्य अशा इतिहासून अनेक गुण घेण्यासारखे आहेत. यातील काही गुण घेऊन आपल्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडायला हवेत. पुढच्या पिढीला याची महती समजावून देऊन त्याप्रमाणे आचरणाची अपेक्षा करायला हवी. अन्यथा पुढच्या पिढीला छत्रपती शिवाजी महाराज कसे कळणार ? कालपरवा मी आणि माझी कन्या स्वराध्या आमच्या गप्पा सुरु होत्या. विषय होता छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचा इतिहास. त्यावेळेस तिने मला एक प्रश्न केला . ती म्हणाली - " आपण छत्रपती शिवाजी महाराज कि जय' असे म्हणतो, पण छत्रपती म्हणजे काय हो ? आपण छत्रपतीच का म्हणतो ?" मी तिला सांगू लागलो , ' बाळा छत्रपती ही एक शाही उपाधी आहे. ' छत्रपती म्हणजेच रयतेवर मायेचं,आधाराचं छत्र धरणारा. रयतेच्या पालन पोषणाची, संरक्षणाची आणि हिताची जबाबदारी घेणारे व्यक्तिमत्व . ती म्हणाली - अच्छा असं आहे तर ... पण मग मी तर असं काहीच केलं नाही तरी मला त्या काकू छत्रपती का म्हणाल्या बरं ? मी तिला उत्सुकतेने विचारले , ' काय म्हणाल्या काकू ?' ती म्हणाली , जेव्हा मी खेळताना एकदा खोडकरपणा केला तेव्हा त्या म्हणाल्या ही पोरगी छत्रपतींच आहे. आता मला तिच्या त्या निरागस बोलण्याचा अर्थ उमगला. मुळात त्या काकूंना देखील इतिहास आणि छत्रपती शिवराय समजून घेण्याची गरज असल्याचे मला जाणवले. अनेकदा बोलताना करामती या शब्दाचा अपभ्रंश करून छत्रपती सारख्या उपाधीचा उल्लेख केला जाणे दुर्दैवीच म्हणावे लागेल. मी माझ्या मुलीला व्यवस्थित समजावून सांगितले खरे परंतु सर्रासपणे असे अनेक शब्द स्वतःच्या तर्काप्रमाणे लावणाऱ्या लोकांचे काय ? अशा लोकांना इतिहास समजावून सांगणे किती गरजेचे आहे याची मला जाणीव झाली. घरोघरी धार्मिक ग्रंथासोबत शिवचरित्र असणे व ते समजून घेणे अतिशय महत्वाचे आहे. अशा अनेक गोष्टी आहेत ज्याबद्दल आपण अनभिज्ञ आहोत. त्यामुळे महाराजांप्रती असणारे आपले प्रेम केवळ जयंतीपुरतेच मर्यादित नाही ना याचेही आत्मपरीक्षण प्रत्येकाने करायला हवे. वादविवादासाठी शिवरायांच्या नावाचा वापर करण्यापेक्षा त्यांच्या इतिहासातुन सुसंवाद वाढवायला हवा. केवळ नाचून शिवजयंती साजरी करण्यापेक्षा शिवचरित्र वाचून खऱ्या अर्थाने साजरी व्हायला हवी. घोषणा आणि जयघोषांसाठी जेवढा मोठा आवाज निघतो तेवढाच अन्यायाविरुद्ध, अपप्रवृत्तीविरोधात निघायला हवा. भगव्या झेंड्यासोबतच सुराज्याचा अ'जेंडा उंचवायला हवा. मोठी मूर्ती उभारताना त्यांच्या कीर्तीतूनही बोध घ्यायला हवा. भव्य मिरवणूक काढतानाच अंधश्रद्धा आणि कुप्रथा यातून स्वतःची 'सोडवणूक' ही करता आली पाहिजे. व्याख्याने,पोवाडे यातून सल्ले ऐकतानाच आपले किल्ले ढासळणार नाहीत याचीही खबरदारी घ्यायला हवी. शिवजयंतीचा भव्यदिव्य सोहळा अभिमानाने पार पाडायला हवाच पण त्याचसोबत प्रत्येक माणूस शिवचरित्रातून घडायला हवा. आणि यासाठीच आपण छत्रपती शिवाजी महाराज समजून घ्यायला हवेत. आणि शिवविचारातून सुजलाम सुफलाम असे स्वराज्य घडविण्यात आपले योगदान द्यायला हवे. जयंती दिनी हाच खरा मुजरा आणि हेच खरे वंदन.







# शिवराय ते भिमराय

आधुनिक केसरी

**अठरा पगड जातींना सोबत घेऊन
एक करणारा, आम्हां रयतेचा राजा
घडवून गेला इथे स्वराज्य महाराष्ट्र माझा
स्वराज्य धर्माचा हाच तो शिवपराक्रम
शिवद्रोही विसरतातच तरी कसे
छत्रपती शिवरायांच्याच महाराष्ट्रात
शिवरायांचीच बदनामी करणारे
शिवद्रोही लोकं येतात तरी कसे?
छत्रपती संभाजी बदनाम करणारे
शिवरायच बदनाम करायला निघालेत
महापुरुषांच्या कार्याची तर तुलनाच होतेय
संतांचेही श्रेष्ठत्व हेच ठरवायला निघालेत
बदनामीचे षडयंत्र अजून ही समजेना
नक्की खरं काय आणि खोटं काय
आज ही आम्ही इतिहासाच्या संभ्रमावस्थेत
खोट्या इतिहासाचं करायचं तरी काय?
तोच तो इतिहास आजही जवळी हाय
जात-धर्म द्वेषगिरीतून मिळतंय तरी काय?
शिवशाही हीच भीमरायांची लोकशाही,
हेच आता समजून घ्यायला हवे हाय
सर्वधर्म समभाव हेच आपले तत्त्व होय
आता स्वराज्याचे शिवराय समजून घ्याच
न्याय देणारे भीमराव आपोआप समजतील
पत्रात जय शिवराय लिहिणारे भीमराव
आहेत आपल्याच लोकशाहीचे शिल्पकार
शिवशाही ते लोकशाही, एकच विचार प्रवाह
इथे आज संविधानिक मूल्यांतून नांदतेय
शिवरायांच्या स्वराज्याची प्रत्येक शिकवण
व्हायला हवे आपणच, तीचे भक्कम शिलेदार
करूया समता, स्वातंत्र्याची लोकशाही मजबूत
जय शिवराय, जय भीमराय असा नारा गर्जूनी**

सुशिल सुदर्शन गायकवाड, 9561394320

# जन कल्याणकारी, न्यायवादी राजे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**स्वराज्य म्हणजे न्याय, कल्याण, समता पराक्रम, आदर व मानसाचे राज्य आहे अशी जनतेची भावना झाली होती. प्रत्येक माणसाला स्वराज्या बद्दल आदर वाटत होता, स्वराज्यामध्ये सुरक्षित वाटत होते. राजे अनेक होऊन गेले परंतु छत्रपती शिवाजी महाराज व त्यांनी निर्माण केलेले स्वराजच लोकांच्या मनात आजही आहे याचे कारण छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्माण केलेले स्वराज्यात मानसाचे कल्याण होते.**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य एवढे व्यापक होते की शत्रुही त्यांच्या बद्दल आदराने बोलायचे. परंतु अलिकडच्या काळात काही कमी बुद्धीच्या लोकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना धर्माशी जोडून त्यांची लढाई धार्मिक होती असे बोलुन त्यांना धर्माचे रक्षक म्हणून त्यांचे विचार व कार्य संकुचित करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांनी धर्माचे नाही तर माणसाचे रक्षण केले म्हणून आजही ते वंदनीय आहेत. शेकडो राजे व राज घराणे असताना आज राज घराण्यातील सर्वाधिक राजाचा उदोउदो होत असेल तर आहे छत्रपतीं शिवाजी महाराज यांचे घराणे. माँ जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शाहु महाराज हेच आजही वंदनीय आहेत हे विषेश आहे. कारण यांचे राज्य लोकांची फसवणूक करून, लोकांना लुटून आर्थिक सधन होण्यासाठी नव्हते तर राज्याद्वारे होणारी लुट, अन्याय अत्याचार यांच्या विरोधात उभे राहुन जनतेला न्याय व त्यांचे कल्याण करण्याचे काम स्वराज्यामार्फत केले जायचे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार व कार्य खरचं समजून घेतले तर स्वराज्यात जनता सुखी होती याची प्रचिती येते. आपण ढोबळमानाने जरी बघितले तर आपल्या लक्षात येते स्वराज्यामध्ये शेतकऱ्यांचे हित लक्षात घेतले जायचे, महिलांना व गोरगरीब लोकांना मानसन्मान व संरक्षण मिळायचे, लुट करणारे आणि अन्याय अत्याचार करणाऱ्यांना शिक्षा तर पिडीतांना न्याय मिळत होता म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्य लोकांना आपलेच राज्य आहे असे वाटत होते. छत्रपती शिवाजी महाराज हे अन्याय अत्याचार लुट याच्या विरोधात होते कोणत्याही धर्माच्या वा कोणत्याही वैयक्तिक व्यक्तीच्या विरोधात नव्हते. म्हणून आपण जर छत्रपती शिवाजी महाराज यांना धार्मिक बनवून संकुचित केले तर हा त्यांच्या कार्यांचा व विचाराचा अवमान आहे. स्वराज्याच्या अगोदर ही अनेक राजे होऊन गेले परंतु लोकांना त्याचे घेणे देणे नव्हते. कारण कोणताही राजा आला काय गेला काय सर्व सामान्य लोकांच्या जिवनावर काहीच फरक पडत नव्हता. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यामध्ये सर्वात महत्वाचे काम केले गेले ते म्हणजे शेतीची मोजणी करून घेतली गेली. शेतसारा निश्चित केला गेला, दुष्काळामध्ये शेतसारा न घेता त्यांना लागवडीसाठी मदत केली जायची. म्हणजे च शेतकऱ्यांचा हिताचे निर्णय घेतले गेले. जर पिकलेच नाही तर देणार कसे आणि माल पिकवायचा असेल तर बी बियाणे आणणार कुठुन हा विचार करून छत्रपती शिवाजी महाराज यांनी शेतकऱ्यांना खुप मोठा दिलासा दिला. पूर्वी युद्धांच्या वेळी सैन्य एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जात होते, जाताना मुक्काम होत होता, सैन्याची रसद जनावरांचा चारा वैरण याचा सर्व भार शेतकऱ्यांवर पडत असे. कारण सैन्य जाताना शेतामधुन जात होते त्यामुळे पिकाची नासाडी होत होती. मुक्काम असेल तर कितीतरी शेतातील पिक उद्धस्त केले जाते जायचे. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांनी सैन्याला सक्त ताकीद दिली होती शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही धक्का लागता कामा नये. कुठे मुक्काम पडलाच आणि घोडे हक्ती यांना चारा वैरणीची गरज पडली तर शेतकऱ्यांना मोबदला देऊन ते विकत घ्यायाचे. असा आदेशच होता. म्हणजे शेतकऱ्यांच्या कल्याणाचे दिवस स्वराजात होते. याची कल्पना होते. शेतकऱ्यांच्या हितासोबतच दूसरे व सर्वात महत्वाचे काम केले ते म्हणजे स्त्रियांचा सन्मान, संरक्षण व गोरगरिबांना न्याय देण्याचे. शत्रुच्या सुनेचा साडी चोळी देऊन सन्मान करण्याची आणि संरक्षण देऊन परत पाठवण्याचा इतिहास तर सर्वांना च माहिती आहे. परंतु तो एकच प्रसंग नाही तर अनेक प्रसंग आहेत ज्यातून स्वरातील स्त्रियांचा मानसन्मान व संरक्षण दिसुन येते. अजून एक प्रसंग आहे तो म्हणजे बेळवाडीची. बेळवाडीच्या किल्ला सेनापती सकुजी गायकवाड यांनी तब्बल सत्तावीस दिवस लढून जिंकला. त्यावेळी किल्याची किल्लेदार सावित्रीबाई देसाई नावाची महिला होती. किल्ला जिंकल्याच्या अविर्भावात येऊन सकुजी गायकवाड ने सावित्रीबाई देसाईवर बलात्कार केला. ही गोष्ट शिवाजी महाराज यांना माहिती झाली आणि छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्यांचे डोळे काढून आजिवन बंदिस्त करून ठेवले. शत्रु महिला असली तरीही तिचा सन्मान करण्याची शिकवण शिवाजी महाराज यांची होती. किल्ला जिंकला



म्हणून काय झालं संस्कार व स्त्री आदर महत्वाचा म्हणून गुन्हेगाराला शिक्षा देणारे छत्रपती शिवाजी महाराज होते. दुसरा अजून एक प्रसंग म्हणजे रांझ्याचा वतनदार पाटील याने गरिब शेतकऱ्यांच्या मुलीला सर्वां समोर उचलून नेऊन बलात्कार केला. अब्रु गेल्याचे मनात दुख असणाऱ्या गरिब मुलीने आत्महत्या केली ही बाब छत्रपती शिवाजी महाराज यांना कळताच त्यांनी पाटलाला पुण्यात आणले हात पाय तोडण्याची शिक्षा दिली. ही बाब जेव्हा पंचक्रोशीत पसरली तेव्हा छत्रपती शिवरारांबदल आदर व राज्यात संरक्षण आहे ही भावना वाढायला लागली. सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन त्यांच्या कला कौशल्यानुसार त्यांच्या वर जबाबदारी देऊन स्वराज्य उभे केले. स्वराज्यात कोणात्याही भेदभावाला थारा दिला नाही. समोर चा व्यक्ती मुस्लिम आहे म्हणून शत्रु नव्हता तर तो लोकांच्या हिताच्या विरोधात होता म्हणून शत्रु होता याची जाणीव आपल्याला कृष्णा भास्कर, राझ्यांचा पाटील, व बेळवाडीचा किल्ला जिंकणारा सकुजी गायकवाड यांच्या प्रसंगातून दिसून येते.

आज छत्रपतीच्या नावाचा राजकीय वापर करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचाराच्या विरोधात काम केले जातात. आपल्याला खरचं छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करायची असेल तर छत्रपती शिवाजी महाराज यांची आरती करण्याची गरज नाही. राज्यात शेतकऱ्यांची आत्महत्या होऊन तिरडी उठणार नाही यावर लक्ष द्यावे लागेल. स्वराज्य शेतकरी सुखी होता आज त्याच स्वराज्यात शेतकऱ्यांचे काय हाल आहेत हे मेंदु असलेल्या लोकांना सांगायची गरज नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांनी महिलांचा सन्मान केला परंतु आज बलात्काराचे आरोप असलेल्या लोकांना पक्ष तिकीट देऊन निवडून आणतात व त्यांच्या फाईल बंद केल्या जातात. गोरगरिबांना न्याय तर सोडाच न्यायधिशांना रस्त्यावर याव लागते यापेक्षा अजून मोठी काय शोकांतिका असेल? अशा नितीभ्रष्ट, चारित्र्यहीन लोकांना छत्रपती शिवाजी महाराज यांचे नावही घेण्याचा अधिकार नसताना स्वतः ला मावळे समजणारे व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सोबत वैचारिक बेईमानी करणारे लोक बलात्कारी, पाखंडी, लुटारू लोकांना डोक्यावर घेऊन मिरवतात. हीच सर्वात मोठी शोकांतिका देशात आहे. गुन्हा बघून छत्रपती शिवाजी महाराज शिक्षा देत होते येथे गुन्हेगाराची जात बघुन शिक्षा होते. थोडक्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यात जनतेच्या कल्याणावर भर देऊन लोकांना न्याय दिला जायचा. आज लोकांना न्याय किती व कसा मिळतो याची जाणीव देशवासियांना आहे. स्वराज्यातील शिवशाही पुन्हा आम्हांला येथे रूजवायची असेल तर अगोदर आम्हाला छत्रपती शिवाजी महाराज समजून घेणे आवश्यक आहे. जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज लोकांना समजतील आणि समाजातील लोक बलात्कारी, लुटारु नेत्यांना त्यांची जागा दाखवतील तेव्हा कुठे जनकल्याण व न्याय प्रस्थापित होईल. आणि खऱ्या अर्थाने हीच छत्रपती शिवाजी महाराज यांना आदरांजली असेल.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने मंगलमय सदिच्छा..!

# शिवरायांच्या कार्यातून घडली रयत



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**बहुजन हिताय,बहुजन सुखाय ही जनहिताची संकल्पना घेऊन रयतेचे राज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज इथल्या बहुजन वर्गाचे खऱ्या अर्थाने बहुजनप्रतिपालक बनले होते.स्वराज्य म्हणजे स्वतःचे राज्य.हे राज्य होते रयतेचे.इथली रयत सर्व जाती धर्माची होती. अन गुण्या गोविंदाने राहणारी ही रयत स्वराज्यासाठी अगदी स्वतःच्या जीवाची बाजी द्यायला तयार होती.रयतेचा राजा हा सर्वांना सामावून घेणारा होता.बहुजनांचे संरक्षण करण्यासाठी कायम न्यायाची भूमिका देणारा हा राजा होता.जात धर्म असा कोणताही भेदभाव स्वराज्यात नव्हता.**

स्वराज्यात चुकीच्या प्रवृत्ती निदर्शनास आल्यास त्या प्रवृत्तीस ठेचण्यास हा राजा कठोर भूमिका घेत असायचा.राजमाता जिजाऊची शिकवण स्वतःच्या जीवनात अंगी बाळगणारे छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त एका जातीचे नव्हे तर सर्व बहुजन वर्गाचे बनले होते.इथल्या स्त्रियांना ही सन्मानाची वागणूक दिली जात होती.परस्त्री माते समान अशी शिकवण शिवरायांमध्ये जिजाऊनी दिली होती.शत्रुच्या स्त्रीचा मान सन्मान सुद्धा करणारे छत्रपती शिवाजी महाराज होते.शत्रूंनासुद्धा महाराजांच्या अशा स्त्री सन्माना बद्दल विशेष कौतुक वाटून राहायचे.इथल्या रयतेची सतत काळजी करणारा राजा रयतेतील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देणारा होता.म्हणून प्रत्येक जात अभिमानाने,सन्मानाने स्वराज्यात जगत होती.क्रूर प्रवृत्तीकडून अन्याय झाल्यास न्यायाचे द्वार हे राजेंच्या निर्णयातून खुले व्हायचे. स्वातंत्र्य,समता,न्याय,बंधुता या सर्व मूल्यांची शिकवण देणारा राजा म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज होत.हे सर्व इथल्या बहुजन वर्गाला बहाल करण्याची कामगिरी त्यांनी केली.आज भारतीय संविधान अस्तित्वात आहे.भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान लिहीत असताना छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्यच डोळ्यासमोर ठेवले होते. सर्व समाजाला न्याय मिळवून देणारी जी भूमिका भारतीय संविधानातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पार पाडलेली आहे.तेच कार्य आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात दिसून येते.सामाजिक प्रबोधनाची चळवळ गतिमान करणाऱ्या सर्वच समाज सुधारकांना छत्रपती शिवाजी महाराज हे आदर्श होते.महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची रायगडावर समाधी शोधून काढली.त्यांच्या वर आधारित पोवाडा लिहिण्याचे काम सत्यशोधक महात्मा फुले यांनीच केले.पहिली शिवजयंती महात्मा फुले यांनीच साजरी केली.महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हे क्रांतिचे रणशिंग फुकताना आंदोलनातून छत्रपती शिवाजी महाराजांनाच प्रेरणास्त्रोत मानले होते. सुप्रसिद्ध इतिहासकार डॉ.श्रीमंत कोकाटे यांच्या व्याख्यानातून इतिहासाची मांडणी परखडपणे केली जात असते.जय भवानी जय शिवाजी या घोषणेचे जनक डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत. असेही डॉ.श्रीमंत कोकाटे यांनी म्हटलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्यच इतके प्रभावी आणि प्रेरणादायी आहे की त्यातून अनेकांना लढण्याची ऊर्जा मिळत असते.१९ फेब्रुवारी १६३० साली शिवनेरी किल्ल्यावर जन्मलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा उदय घडवून आणल्याने रयत आणि रयतेच्या राज्याची खरी खुरी संकल्पना राज्यकारभारातून उदयास आली. रयतेचा राजा,बहुजनांच्या अस्मितेला रयतेतून अनन्य साधारण मिळवून देणारा राजा.इथल्या शेतकऱ्यांसाठी सुद्धा त्याच ताकतीने लढत होता.स्वराज्यात शेतकऱ्याच्या शेतीच्या देटाला हात लावण्याची कोणाची हिंमत होत नव्हती. महाराजांच्या काळात खऱ्या अर्थाने बळीचे राज्य होते.शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्नच उदभवत नव्हता.शेतीतील विविध पिकांनी समृद्ध झालेला शेतकरी हा सुखी आणि समाधानी पाहायला मिळत होता.छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे कार्य समजून घेण्याची गरज आजही आहे आणि उद्या सुद्धा असणार आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याने हा महाराष्ट्र घडला असून हयाच महाराष्ट्रात सामाजिक प्रबोधन घडवून आणण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी प्रयत्न केलेले आहेत. सामाजिक समता निर्माण करणे, समाजातील विषमतावादी विकृती नष्ट करण्यासाठी जे प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी केले.तोच संघर्ष आपल्याला फुले, शाहू,आंबेडकर यांच्या कार्यातून पाहायला मिळतो.छत्रपती शिवाजी महाराजांना महात्मा फुलेंनी गुरू मानले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुलेंना. छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकमेकांसाठी समकालीन नाहीत.परंतु गुरू शिष्याची परंपरा ही कार्याने आणि विचारातून जोडली गेलेली आहे.रयत शिक्षण स्थापना करणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी तर छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव शाळेस दिले.शिवरायांचे रयत आणि जनतेसाठी केलेले कार्य किती महान असते.हेच तर महाराजांच्या महान कार्यातून आपल्याला दिसून येते. शिवरायांच्या कार्यातून रयत घडली. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य हे समाजाला प्रेरणा देणारे आहेत.हीच प्रेरणा महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला अजून पुढे घेऊन जाईल.



संग्रहित

# मूल्यात्मक राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**प्रेमात आणि युद्धात सर्व काही माफ असतं, असं म्हणण्याची सुरुवात जेव्हा कधी झाली असेल, तेव्हा स्वतःच्या चुकांवर पांघरून घालणे हाच उद्देश असला पाहिजे. कारण प्रेम काय, युद्ध काय किंवा अन्य काहीही समग्र जीवनापेक्षा निश्चितच मोठे नाही. अलीकडे राजकारणातही सर्व क्षम्य असते किंवा काही नीतिमत्ता, मूल्यभान जपण्याची आवश्यकता नसते, अशा प्रकारचा सूर आळवला जात आहे. राज्य, देश किंवा जगाचे सध्याचे चित्र पाहता लोक म्हणतात ते खरे की काय? अशी परिस्थिती सर्वत्र दिसत आहे. परंतु संपूर्ण जीवनच जर मूल्याधिष्ठित असेल तर त्याचा एक पैलू असलेले राजकारण त्यास अपवाद राहू शकत नाही.**

पूर्वीच्या काळी घनघोर युद्धे व्हायची. आजच्यापेक्षा आडदांड लोक. समोरासमोर कापाकापीच नुसती. तरीही दिवस मावळला की युद्धविराम ठरलेला. रात्रभर आराम करून पुन्हा नव्या जोमाने सुरू. लहान मुले, स्त्रिया, वृद्ध यांनाहात लावायचा नाही, हा दंडक. आज सर्वच कसे बदलले हा प्रश्न आम्हांस पडावा अशी परिस्थिती. ज्या राजकारणाच्या साह्याने समाज प्रगतीपथावर जाणे अपेक्षित होते, ते राजकारण सामान्य माणसाच्या दृष्टीने आज गलिच्छ होऊ पाहते आहे. हा केवळ राजकारणातील मूल्यहीनतेपुरता प्रश्न नसून एकूणच जगण्याच्या पातळीवर माणूस मूल्यभ्रष्ट होत असल्याचे हे लक्षण आहे. आम्ही दैनंदिन व्यवहारात मूल्यांची केलेली गळचेपी चालू शकते, परंतु राजकारण मात्र कसे सात्विक असले पाहिजे, ही आमची अपेक्षा. राजकारण म्हणजे तरी दुसरे तिसरे काही नसून समूह मनाचा, रुसोच्या भाषेत सर्वसाधारण इच्छेचा आविष्कार असतो. राजकारणातील मूल्यस्तर घसरण्याचे एकमेव नसले तरी मुख्य कारण म्हणजे राज्यसंस्था अनेकांच्या मताप्रमाणे चालविणे. सत्तेचे विकेंद्रीकरण गोष्ट वेगळी. यात प्रमुख राज्यकर्त्यास साह्यभूत ठरणारे घटक येतील, परंतु राज्यशकट मात्र कोण्यातरी एकाच्या नावे चालणे हे राजकीय मूल्यपातळी स्थीर ठेवण्यास मदत करणारी ठरते. कारण सत्तेच्या वर्तुळात वावरणारी मंडळी स्वतःची वैयक्तिक इच्छा घेऊन राजकारणात आलेली असतात. कोणाची इच्छा कशी असेल हे आपण सांगू शकत नाही आणि कार्यकारी मंडळासही प्रत्येकाची मर्जी सांभाळत काम करणे कठीण होते. अनेकांच्या अनंत इच्छा आणि अनेक हितसंबंधी गोष्टींमुळे राजकारणात कोलाहल सदृश्य स्थिती निर्माण होण्यास वेळ लागत नाही. कोणत्याही काळात सत्तेच्या राजकारणात अशी खिचडी झाली तेव्हा राजकारणाचा पोत घसरल्याचे आपण पाहिले आहे. इथे अनेकांचा प्रभाव असल्यामुळे प्रभावीपणे एकही काम होऊ शकत नाही आणि तेच एकाच्या प्रभावामुळे अनेक कामे योग्यरीतीने पार पडत असतात. राजकीय मूल्ये दृढतेने रुजवली जाऊ शकतात. ही मूल्ये समूह म्हणून उपयोगाची असतात. व्यक्तिगत मूल्ये आणि समूह मूल्ये ही वेगळी असल्यामुळे ती कधीकधी परस्परांना छेद देण्याचा प्रयत्न करणार हे निश्चित. अशावेळेस व्यक्तीच्या भूमिकेवर हे अवलंबून आहे की, तो कशास प्राधान्य देतो. माणसाचा सद्गुण म्हणा, दुर्गुण म्हणा किंवा वैशिष्ट्य म्हणा तो शरीर, मन, बुद्धी आणि अहंकार सहजासहजी विसरू शकत नाही. या सर्वांना सोबत घेऊन तो राजकारणातही वावरतो. राजकारण जात्याच समूहाशी निगडित असल्यामुळे तेथे व्यक्तिगत भावनांचे काम असू नये, पण माणूस नेमके त्याच ठिकाणी समूहापेक्षा स्वचा विचार करतो आणि अधःपतनाला तिथून सुरुवात होते. असा राजकारणी व्यक्ती जर सत्तास्थानी असेल तर मग आपणांस हवे तसे कायदे करवून घेण्याकडे त्याचा कल असणार हे उघड आहे. त्यामुळेच वयपरत्वे एक पोक्तपणा येतो हे गृहीत धरून काही महत्त्वाच्या पदाला वयाची अट घातलेली असते. सत्तेच्या राजकारणात कायमपणे दोन गोष्टी हेतूतः संभाळाव्या लागत असल्यामुळे आपल्या मूल्यविवेकास कोणत्याही प्रकारे बाधा कशी पोहचणार नाही याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रांतर्गत समाजाचा न्यायपूर्ण विकास आणि इतरांशी असलेले आपले संबंध हे सांभाळून आपणास पुढे जावे लागते. राजकारणातील हे मूल्यभान टिकवून ठेवण्याचे किंबहुना वेळोवेळी डोस पाजण्याचे काम करते ती राज्यघटना. राजकारण्यांचा एकमेव धर्मग्रंथ म्हणजे राज्यघटना होय. राज्य



क्षितिजापल्याड


व्यवस्थित चालावे आणि सर्वांना न्याय मिळावा अशी आपली इच्छा असो अथवा नसो विशिष्ट कार्यासाठी विशिष्ट परिस्थितीत कसे वागले पाहिजे आणि कसा निर्णय घेतला पाहिजे, हे वेळोवेळी राज्यघटनाच मार्गदर्शन करत असते. सद्यस्थितीत सार्वजनिक जीवनात आणि राजकीय जीवनात आपले वर्तन कसे असावे यासाठी प्रत्येक राजकारणी मंडळींनी संविधान आत्मसात केले पाहिजे. यातून दोन गोष्टी फलित होतील. आपण राजकारणी म्हणून इतरांपेक्षा वेगळे तर दिसूच, त्याहीपेक्षा राजकारणात जाऊन आपण नेमके काय करायचे किंवा आपण इथे कशासाठी आलो आहोत, याचे भान येईल. राजकारण गलिच्छ आहे असे म्हणणे म्हणजे आपण निर्माण केलेल्या राज्यघटनेस आपणच नावे ठेवण्याचा प्रकार होईल. कारण सकृतदर्शनी ज्या काही राजकीय घडामोडी चालू असतात त्या राज्यघटनेला धरूनच आहेत, हे प्रत्येक राजकारणी अगदी उच्चरवात नेहमीच साक्ष देत असतो. त्यामुळे आपल्या राजकारणातील मूल्यात्मकता टिकवून ठेवायची असेल तर राज्यघटनेचे धडे गिरविण्याशिवाय दुसरा काही पर्याय नाही. आम्ही आमचे जातीय, वर्गीय, धार्मिक आणि सांप्रदायिक मूल्ये घेऊन राजकारणात वावरणार असू तर राजकारणातील मूल्यऱ्हासास कोणीही थांबवू शकणार नाही. कोणाची मूल्ये किती श्रेष्ठ आहेत हे ज्याने त्याने उगाळीत बसावे. याचा अर्थ धार्मिक मूल्ये कुचकामी आहेत असे मुळीच म्हणणे नाही. ती तुमच्या व्यक्तिगत आत्मोन्नतीस उपकारकच असणार यात संशय असण्याचे काहीच कारण नाही, परंतु त्यावर राजकारणाची मूल्यबांधणी मात्र होऊ शकणार नाही, हेही तेवढेच खरे. ज्यावेळेस आपली धार्मिक मूल्ये राज्यघटनेच्या मूल्यावर अधिष्टित होतील तेव्हा आपले कायदे असतील, कायद्याचे राज्यही असेल, परंतु कायदा करण्याची शक्ती आम्ही गमावून बसलेले असू. आणि राज्य कायद्यावर जेवढे जिवंत असते त्याहीपेक्षा जास्त त्याच्या नवीन कायदे करण्याच्या शक्ती असण्यावर जिवंत असते. नवीन कायदे करण्याच्या मनिषेतून मूल्यात्मक राजकारणाची पायाभरणी आणि वृद्धी व्हावी हीच इच्छा.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# 'आई तू'... काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा

आधुनिक केसरी

कवयित्री सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे -चोपडे लिखित आई तू... या पहिल्या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा आईचा स्मृतिदिन व शिवजयंतीच्या औचित्याने दि.१९फेब्रुवारी २०२३,रविवार ,वेळ दु. १२:३०वा.रोजी आयोजित केला आहे.अकोला वैदेही ग्राफिक्स चे मा. श्री. गजानन काटे साहेब यांनी प्रस्तुत पुस्तकाचे प्रकाशन केले आहे. या कार्य क्रमाला मा. श्री. तुकारामजी साठे साहेब, अध्यक्ष कर्मभूमी शिक्षण संस्था, हे अध्यक्ष म्हणून लाभले आहेत. तसेच मा.प्रा.श्री. विठ्ठलरावजी भुसारे साहेब,(शिक्षणाधिकारी प्रा.जि.प.परभणी,) मा.प्रा.श्री. श्रीपादजी देशपांडे साहेब( उपशिक्षणाधिकारी प्रा. जि.प.परभणी.)मा.श्री.भगवानरावजी राईतकर साहेब (जेष्ठ पत्रकार,संत साहित्याचे अभ्यासक, मेहकर), श्रीमती सिंधुताई दहिफळे मॅडम (जि. प.शिक्षिका, लेखिका/ कवयित्री हिंगोली,) तसेच मा. श्री. रंगनाथरावजी चोपडे साहेब( लेखक/ कवी माजी जिल्हाध्यक्ष शेतकरी संघटना परभणी) मा.श्री. उद्धवरावजी वानखेडे साहेब (शिक्षक तथा मार्गदर्शक परभणी) मा. श्री. प्रकाशआप्पा उबाळे (प्रसिद्ध व्यापारी तथा मार्गदर्शक)इ. सर्व मान्यवरांच्या शुभ हस्ते *आई तू... या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा होणार आहे. या कार्यक्रमाला परभणी शहरातील व शहराबाहेरील अनेक प्राध्यापक,शिक्षक काव्यप्रेमी रसिक श्रोते व मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.आईच्या भाव विश्वाची सफर घडविणारा... हा काव्यसंग्रह असल्याचे कवयित्री सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे -चोपडे यांनी सांगितले. कवयित्रीने परभणी येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात पदव्युत्तर अध्यापिका म्हणून कार्य केले असून काही वर्तमानपत्र व दिवाळी अंकांमध्ये त्यांच्या कवितांना पूर्व प्रसिद्धी लाभली आहे. प्रस्तुत कार्यक्रम परभणी येथील सिद्धेश्वर ऑइल इंडस्ट्रीज, ए -४३ बालाजी पाईपच्या बाजूला, वसमत रोड परभणी येथे आयोजित केला आहे. तरी सर्व काव्यप्रेमी रसिकांनी तसेच कवी ,लेखक, पत्रकार बंधू भगिनींनी कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित रहावे. अशी विनंती प्रा. श्रीकृष्ण उद्धवराव वानखेडे व काव्यसंग्रहाच्या कवयित्री सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे-चोपडे आणि कार्यक्रमाचे संयोजक वानखेडे परिवार व उबाळे परिवार यांनी केली आहे.




# स्वतंत्र विदर्भची पुन्हा हवा

आधुनिक केसरी



सुनील शिरपुरे
संपर्क क्र. ७०५७१८५४७९

स्वतंत्र विदर्भाची मागणी सर्वात आधी १०० वर्षांपूर्वी करण्यात आली. त्याचा परिणाम म्हणून मध्य प्रांताच्या विधिमंडळाने नागपूर येथे १ ऑक्टोबर १९३८ रोजी 'महाविदर्भा'चे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचा एकमताने ठराव मंजूर केला. ही घटना संयुक्त महाराष्ट्राच्या देखील मागणीपूर्वी घडली होती. त्यानंतर तेलंगणाच्या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या राज्यात त्या राज्यातील काही शुभचिंतक आपआपले कार्यक्षेत्र वेगळे करून मूळ राज्याचे विभाजन करू पाहत होते. त्यासाठी वाटेल त्या मार्गाचा अवलंब करून शासनाचे लक्ष वेधत होते. पण हे शुभचिंतक कितपत आपल्या कार्यक्षेत्राबद्दल शुभ चिंततात. हा एक प्रश्नच आहे आणि हा प्रश्न अनुत्तरीयच राहील. यात काहीच शंका नाही. पण त्या त्या राज्यात हा लढा काही कायम दिसून आलेला नाही. लहर आली की केला कहर असंच काहीसं दिसून येत होतं.

याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रामध्येही विदर्भाच्या पाऊलखुणा उमटायला लागल्या होत्या. यासाठी अनेक संघटनांकडून, संस्थांकडून आंदोलनामार्फत वेगळ्या विदर्भाची मागणी होत होती. काही ठिकाणी तर जनतेचा कौलही मागितल्या जात होता की, विदर्भ वेगळा हवा कि नको? स्वतंत्र विदर्भाबद्दल सतत चर्चा सुरु होती. विदर्भाचा विकास हाच या चर्चेचा मुख्य गाभा होता. पण तेलंगणाच्या मागणीप्रमाणे यात कधीही सातत्य दिसून आलेलं नाही. आता, पुन्हा विदर्भ राज्याच्या मागणीने डोके वर काढलेले पाहायला मिळत आहे. परत आधीच्याप्रमाणे जनतेचा कौल मागितल्या जात आहे. पण मला मनापासून वाटते की, विदर्भ राज्य वेगळा होऊ नये. कारण विदर्भ वेगळा झाला, तरी सामान्य जमतेला त्याचा काहीच फरक पडणार नाही. फरक पडणार तो, फक्त राजकारणी लोकांनाच. कारण त्यांच्याच हाती सत्ता येणार आहेत. साहजिक त्यांचीच घरे पैशाने भरणार आहे. विदर्भात खूप खनिज संपत्ती आहे. पण त्याचा फायदा कधी विदर्भवासीयांना होत नाही. महाराष्ट्रात फक्त विदर्भच मागासलेला आहे. त्यासाठी एकत्र राहूनच राजकारणी लोकांनी विदर्भाचा विकास करायला पाहिजे. तेव्हाच विदर्भाचा विकास होऊ शकेल, वेगळे होऊन काहीच फायदा होणार नाही. याउलट विदर्भ राज्य वेगळा झाला, तर भरमसाठ कार्यालये, प्रशासकीय यंत्रसामग्री इत्यादींसाठी अतोनात खर्च होईल आणि पैशाचा नाहक अपव्यय होईल. त्यामुळे अजून महागाई वाढून सामान्य जनतेच्या डोक्यावर थईथई नाचू लागेल. याचा त्रास जनतेलाच होईल.



कदाचित यापूर्वीच विदर्भ वेगळा झाला असता, तर तो आतापर्यंत खूप विकसित झाला असता. पण आता खूप वेळ झाला आहे. राजकारणी लोकांनी स्वार्थीपणा सोडायला पाहिजे. जोपर्यंत ते स्वार्थीपणा सोडणार नाही, तोपर्यंत विदर्भाचा विकास होऊच शकत नाही आणि होणारसुद्धा नाही. विदर्भाविषयी इतकी आत्मीयता वाटत असेल, तर एकत्र राहूनच विदर्भाचा विकास करायला पाहिजे. राजकारणी लोकांना सामान्य जनतेच्या वतीने हिच अपेक्षा!

# पत्रकारांवर हल्ला करणाऱ्यांना कठोर शिक्षा झालीचं पाहिजे !

आधुनिक केसरी

राजापूर येथील पत्रकार शशिकांत वारीशे यांना जीपने धडक दिल्यानंतर फरफटत नेऊन जखमी केल्यानंतर उपचार घेताना त्यांचा मृत्यू झाला एका बातमीचा रोष ठेवून हे घडविण्यात आल्याचे समोर येतं आहे अशा प्रकारे दिवसाढवळ्या त्यांची हत्या करण्यात आली ही घटना निंदनीय असून महाराष्ट्राला काळीमा फासणारी आहे या हल्यातील गुन्हेगारावर कडक कारवाई करुन कठोर शिक्षा केली पाहिजे पत्रकारांवरील हल्ला म्हणजे झुंडशाहीने संविधानिक लोकशाहीवर केलेला हल्ला तसेच तो अभिव्यक्ती स्वातंत्र्य, माध्यम स्वतंत्र यावर ही हल्ला असतो हे लक्षात घ्यायला हवे कोणत्याही बातमीचा तळाशी जाऊन सत्य सांगण्याचा प्रयत्न नेहमीचं पत्रकार करत असतात त्यामुळे त्यांच्यावरील हल्ला हा सत्यावर हल्ला ठरतो सद्या असे हल्ले दिवसेंदिवस वाढतच आहे त्यामुळे पत्रकारिता अडचणीत आली असून पत्रकारितेमध्ये भितीचे वादळ घोंगावत आहे पत्रकार संरक्षण कायदा आहे मात्र त्याची अंमलबजावणी संदर्भात शाशंकता उपस्थित होते कायद्यांची अंमलबजावणी योग्यप्रकारे झाली नसल्यामुळे असले हल्ले वाढत चालले आहेत पत्रकार संरक्षण कायदा हा अजामीनपात्र गुन्हा आहे राजकारण आणि गुन्हेगारी यांच्या एकत्रीकरणातून पत्रकारांवरील हल्यांचे प्रमाण आणि धारिष्ट वाढत चालले आहे लोकसंख्येपासून अर्थव्यवस्थेच्या आकारापर्यंत आपल्या वाढीची चर्चा होत असतांना माध्यम स्वातंत्र्याबाबतीचीही घसरण लक्षात घेतली पाहिजे अशा हल्यासारख्या घटनेमध्ये पत्रकार जर मयत अथवा जखमी झाला तर त्याचे संपूर्ण कुटुंबचं उदवस्त होते संसार सारा उघड्यावर पडून मरणयातना भोगाव्या लागतात हे वास्तव नजरेआड करता येणार नाही जनतेचा आवाज म्हणून पत्रकार विविध घटनेवर नेहमीचं निर्भिड लेखणीतून वाचा फोडण्याचे काम करत असतो मात्र अशा हल्यामुळे त्याचा कायमचा आवाज बंद करण्याचा कुटील डाव मांडला जात आहे ही शोकांतिकाच म्हणावी लागेल !! **राजू जाधव, मांगूर जि.बेळगाव**



# शिवरायांची राज्यव्यवस्था आणि आजच्या लोकशाहीची अवस्था



कल्पना घुगे
जालना

आधुनिक केसरी

**भारत हा प्राचीन काळापासून प्रजाहितदक्ष राजा महाराजांचा देश राहिलेला आहे. बहुजन अनार्यांच्या अनेक पराक्रमी राजांनी आपल्या कार्यकर्तृत्वाची छाप प्रजेच्या मनात निर्माण केलेली आहे. बळीराजा, चंद्रगुप्त मौर्य,सम्राट अशोक,महाराणा प्रताप, राजर्षी शाहू महाराज इ. उदाहरणे आपल्याला देता येतील. त्याचबरोबर जगाच्या इतिहासात आदर्श राज्यकारभार करून लोककल्याणकारी धोरण राबणारे प्रजाहितदक्ष अव्दितीय राजे म्हणजे विश्ववंदनीय,कूळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज होय.छत्रपती शिवाजी महाराज ज्या काळात जन्माला आले ते सतरावे शतक! शिवपूर्वकाळातील सत्ता संघर्षामुळे भरडून निघालेल्या जनतेच्या कल्याणासाठी मराठी मुलुखाचे सुवर्ण सिंहासन उभारून स्वराज्य प्रस्थापित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिवरायांनी केले. छत्रपती शिवरायांचा कालखंड मध्ययुगाचा कालखंड होय. या कालखंडात राजेशाही पध्दतीने कारभार हा चालवला जात असे.संपूर्ण राज्याची ध्येय धोरणे ही राजाच्या हाती असत.राजा हे पद वंशपरंपरेने राजाच्या पोटी राजघराण्यात जन्म घेतल्याने किंवा कार्यकर्तृत्वाने प्राप्त होत असे.**

राजेशाही पध्दतीची प्रतिकूल बाजू लक्षात घेतली तर अनेक राजे जनतेवर अन्याय-अत्याचार करून जनतेवर हुकुमशाही गाजवत असत.परंतू छत्रपती शिवरायांच्या राज्यव्यस्थेचा व कार्यकीर्दीचा जर विचार केला तर ' न भूतो,न भविष्यती' अशी आदर्श तितकीच अगम्य, सामान्य जनांना न्याय देणारी,रयतेला जगण्याचं बळ देणारी राज्यव्यवस्था पहायला मिळते.कालांतराने काळाच्या ओघात राजेशाही पध्दती ही कालबाह्य झाली.राजेशाही व्यवस्थेत काही प्रजाहितकारी राजे वगळता अनेक राजांनी जनतेवर अन्याय-अत्याचार केलेले ही आपल्याला इतिहासात पहायला मिळतात.त्यानंतर आपल्या देशाने लोकहितासाठी अनेक लोकचळवळी उभ्या करून लोकशाही शासनपध्दती स्वीकार ली."लोकांनी,लोकांसाठी,लोकांकडून चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही होय."या व्यवस्थेने इथल्या प्रत्येक नागरिकाला राज्याचा प्रमुख निवडण्याचा व वेळप्रसंगी त्याचा अधिकार काढून घेण्याचा अधिकार प्राप्त करून दिला.लोकशाही ही लोक उन्नतीची एक आदर्श व्यवस्था आहे. परंतु वास्तविक परिस्थितीचा आजचा विचार केला तर जनतेच्या हिताच्या निर्णयांची उचलबांगडी करून स्वतःचे उखळ पांढरे करणारे निर्णय घेणारी व्यवस्था आपल्याला आज पहायला मिळते.तेव्हा पदोपदी आठवण येते ती छत्रपती शिवरायांच्या आदर्श राज्यव्यवस्थेची!! छत्रपती शिवरायांच्या स्वराज्यात सहिष्णुता ही पहायला मिळते.अठरापगड जाती-जमातीमधील



मावळ्यांना एक करून,जाती-पातीच्या भिंती गाडण्याचे कार्य शिवरायांनी केले.जात-धर्म-पंथ यापेक्षा व्यक्तीच्या कर्तृत्वाला,निष्ठेला अधिक मोल देणारी शिवरायांची राज्यव्यवस्था होती.म्हणुनच स्वराज्यासाठी प्रसंगी जिवाला जीव देणारे मावळे निर्माण झाले.जिवाजी महाले,तानाजी मालुसरे,शिवा काशिद,दर्यासारंग दौलतखान,सिद्दी इब्राहिम,बाजीप्रभू देशपांडे, नेताजी पालकर इ.उदाहरणे आपल्याला देता येतील. मुळात शिवरायांचा दृष्टिकोनच हा सहिष्णूतेचा होता.परंतु आजच्या नावाला लोकशाही असणा-या व्यवस्थेत लोकशाही मूल्यांना खो देऊन,धार्मिक तेढ निर्माण करून,समाजात दु-फळी निर्माण करून,निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीचा फायदा घेऊन स्वार्थ साधेणारे सर्वच नाही पण अनेक नेते इथल्या व्यवस्थेत पहायला मिळतात.ही एक प्रकारे प्रजेची दिशाभूल म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

छत्रपती शिवरायांच्या राज्यव्यवस्थेत स्त्री संरक्षण,स्त्रीविषयक दृष्टीकोन हा मुद्दा लक्षात घेतला तर "स्त्रीयांची इज्जत कायम राहिली पाहिजे.मग स्त्री कोणीही असो!" स्त्रीयांवर अन्याय-अत्याचार करणा-याचा तात्काळ निकाल देत चौरंगा करून शिक्षा देण्याची सक्त ताकीद शिवरायांच्या राज्यव्यवस्थेत होती.परकीयांच्या स्त्रीयांनाही मातेसमान मानण्याचा उद्दात दृष्टीकोन शिवरायांचा व मावळ्यांचा होता.स्त्री सुध्दा आपल्या कार्यकर्तृत्वाने आदर्श राज्यकारभार करू शकते या बाबतीत शिवरायांची सून येसूबाई यांना स्वराज्यातील 'कुलमुखत्यार' हे महत्तवपूर्ण पद बहाल केले.तसेच दुसरी सून राणी ताराबाई यांना तलवारबाजी करण्याचा अधिकार दिला. पुढे याच राणी ताराबाईंनी स्वराज्याचे संरक्षण केले. या स्त्रीसंरक्षण व स्त्रीविषयक दृष्टीकोनाचा आढावा आपण आजच्या व्यवस्थेत घेतला तर आजही समाजात स्त्रीयांवरील अन्याय-अत्याचार, हुंडाबळी,स्त्रीभृणहत्या या घटना पहायला मिळतात. घटनेनंतरही आरोपीना शिक्षा ठोठावण्यास होत असलेली दिरंगाई,न्यायाची कित्येक वर्षे करावी लागणारी प्रतिक्षा,आरोपींची निर्दोष मुक्तता हे विचित्र-चित्र स्त्री संरक्षण विषयक बाबतीत पहायला मिळते. शिवरायांच्या राज्यव्यवस्थेतील कृषीविषयक धोरण लक्षात घेतले तर "शेतक-यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये." "उत्पन्नाचा आदमास पाहून रयतेवर कर बसवावा." अशी सक्त ताकीद शिवरायांची होती.बी-बियाणे,गुरे-ढोरे शेतक-यांना द्यावीत.पीक येईपर्यंत धान्य पुरवावे. "सैन्यातील घोड्यांना दाना वैरण लागली तर रोख रक्कम देऊन खरेदी झाली पाहिजे." शेतक-यांच्या हिताचे अतिशय सूक्ष्म विचार शिवरायांच्या राज्य व्यवस्थेत पहायला मिळतात. याउलट आजची परिस्थिती दृष्टीक्षेपास येते.अवघ्या जगाचं पालपोषण करणा-या बळीराजा संबोधल्या जाणा-या बळीराजाचा जीव बळी जाण्याची विपरित परिस्थिती निर्माण झालेली आहे. बळीराजावर आत्महत्या करण्याची वेळ येतेय यापेक्षा दूर्देव ते काय असू शकत? स्वतः कष्ट करून,घाम गाळून पिकवलेल्या पिकाला हमीभाव मिळावा म्हणून आंदोलने,मोर्चे करण्याची वेळ शेतक-यांवर येते आहे. पाऊस,ओला दुष्काळ,सुका दुष्काळ या नैसर्गिक संकटांनी शेतकरी हताश झालेले तर आहेतच.त्याचबरोबर एकुणच परिस्थितीचा विचार केला असता बेरोजगारी,उपासमारी,दंगली,धार्मिक तेढ,इ.समस्या अधिक निर्माण होत आहेत.महागाई गगनाला जाऊन भिडली आहे. अशा परिस्थितीत 'जन-सामान्यांचे जगणे' हा गंभीर चिंतेचा विषय निर्माण झाला आहे.

एकूणच सर्व बाबींचा विचार करता जर आपल्याला आपल्या देशाचे,राज्याचे अस्तित्व व अस्मिता अबाधित ठेवायची असेल तर लोकहितकारी लोकशाही व्यवस्थेत छत्रपती शिवरायांच्या आदर्श राज्यव्यवस्थेची प्रेरणा घेऊन लोकशाही व्यवस्थेस अधिक बळकटी देणे गरजेचे आहे.जाती-धर्म-पंथ यांना अधिक महत्व न देता सामाजीक सलोखा अबाधित राखून स्वातंत्र्य,समता,बंधूता या मूल्यांची जोपासना करावी लागेल.तसेच शिक्षण, आरोग्य, रोजगार,उद्योगधंदे इ. घटकांवर अधिक लक्ष देणे महत्त्वपूर्ण ठरेल.आपल्या आदर्श अशा लोकशाही व्यवस्थेला छत्रपती शिवरायांच्या राज्यव्यवस्थेतील विचार-मूल्यांचे,धोरणांचे अधिष्ठान प्राप्त झाले तर नक्कीच आपला देश महासत्ताक झाल्याशिवाय राहणार नाही.

# भाऊसाहेब, गनिमी कावा कोणाची आठवण देतो ?



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रच नव्हे तर अख्ख्या भारताचे लाडके छत्रपती शिवाजी महाराज हे शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावांनी ओळखले जातात. शिवरायांचा जन्मदिवस हा शिवजयंती म्हणून साजरा होतो. शिवाजीरिजे आणि त्यांचे पुत्र छत्रपती संभाजीराजे यांचा संयुक्त नामोल्लेख शिवशंभू असा होतो. सर्वसाधारणपणे इतिहासकार शिवाजी महाराजांचा जन्म- १६३० ते औरंगजेबाचा मृत्यू- १७०७ या ७७ वर्षांच्या काळास शिवकाल असे म्हणतात. शिव छत्रपतींबद्दल पुरेपूर माहिती लिहिण्याची आपली काय औकात? असे म्हणत श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार यांनी शब्दबद्ध केलेले काही प्रसंगच वाचकांच्या सेवेत.**

शिवाजी महाराजांच्या जयंतीला महाराष्ट्रात 'शिवजयंती' म्हणतात. ती राज्यभर एखाद्या मोठ्या सणाप्रमाणे साजरी केली जाते. त्यांच्या जन्म दिनांकाबद्दल वाद असल्याने शिवजयंती महाराष्ट्रात वर्षभरात किमान दोनदा तरी साजरी होते. त्या दिवशी दिवसभर ढोल-ताशे वाजवीत मिरवणुका निघतात आणि शिवाजीच्या पुतळ्यांना हार घालण्याचा कार्यक्रम होतो. अनेक ठिकाणी शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी जी कालगणना प्रचलित होती त्यानुसार शिवाजी जयंती तिथीनुसार साजरी केली जाते.

सन २००१ सालापासून १९ फेब्रुवारी या तारखेला सरकारी शिवजयंती साजरी होते. छत्रपती शिवाजीराजे भोसले, जे शिवराय म्हणूनही जगविख्यात आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासाचे कोणतेही पुस्तक पाहिले तर मुखपृष्ठ हे छत्रपती शिवाजी महाराजांचेच दिसेल. कारण ते येथील मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाही आणि मोगल साम्राज्य यांच्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य महाराजांनी उभे केले आणि इ.स.१६७४मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भूगोल-इतिहासाचे ज्ञाते, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्चीकरणात नेमके हल्ले, यांचा वापर करणारे गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे हाताळले होते. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या दोन हजार सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर त्यांनी उभे केले. किनारे आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. राज्यकारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले होते.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर दि.१९ फेब्रुवारी १६३० रोजी छ.शिवाजी महाराजांचा जन्म झाला. इतिहासाच्या अभ्यासांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची नेमकी जन्मतारीख हा एकेकाळी मतभेदांचा मुद्दा होता. तो वाद नंतर मिटला. महाराष्ट्र राज्य शासनाने फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ अर्थात शुक्रवार दि.१९ फेब्रुवारी १६३० ही शिवरायांची जन्मतारीख २००१ साली स्वीकारली. इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७- वैशाख शुद्ध तृतीया ही एक जन्मतारीख मानली जात होती. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला माता जिजाईंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा, अशी प्रार्थना केली होती. म्हणून या मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. त्यांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता विजापूर, अहमदनगर आणि गोवळकोंडा या तीन मुसलमानी सल्तनतींमध्ये विभागलेली होती. शहाजीराजांनी आपली निष्ठा वेळोवेळी अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही आणि मुघल यांच्यादरम्यान बदलली; पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली आणि स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली होती. आई जिजाई छोट्या शिवबासह पुण्यात रहायला गेल्या. त्यावेळी पुण्याची फार दुरवस्था झालेली होती. तेव्हा छोटे शिवराय व कारभारी यांच्या हस्ते पुण्यात एका शेतात प्रतीकादाखल सोन्याच्या मुलाम्याचा नांगर फिरवून पुण्याची पुनःस्थापना करायला सुरुवात केली. शिवाजीराजे लहानाचे मोठे होत असताना आणि त्यानंतरही प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी त्यांना जिजामातेनी खंबीर मार्गदर्शन केले. शिवाजी महाराजांच्या त्या आद्यगुरू होत. हिंदवी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न साकार करायला त्यांना जिजाऊंनी स्फूर्ती दिली, असे काही इतिहासकार सांगतात. युद्धाभ्यास आणि रणनीती तसेच राजकारभार यासंबंधी प्राथमिक मार्गदर्शन त्यांना शहाजी राजांकडून दप्तर व न्यायव्यवस्थेचे शिक्षण, परकीय सत्तेविरूद्ध लढा देण्यात आवश्यक असलेल्या शिस्तीचे शिक्षण माता जिजाऊकडून मिळाले, असे उपलब्ध ऐतिहासिक माहितीवरून निश्चितपणे सांगता येते. जिजाऊंनी शिवबांच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांस युद्धकला व राजनीतिशास्त्राचे शिक्षण देवविले. शिवाय संत एकनाथ महाराजांच्या भावार्थ रामायण, भारूड आदींच्या माध्यमातून त्यांच्या मनात स्वराज्याचे स्फुल्लिंग चेतविले.



शिवरायांची राजमुद्राः छत्रपती शिवाजीराजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली. ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती. ती अशी- "प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते!" त्याचा मराठी अर्थ- "ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो. तशीच शहाजींचा पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तिचा लौकिक वाढत जाईल!"

पन्हाळगडापासून काही अंतरावर वाटेत सिद्दीच्या सैन्याने त्यांना घोडखिंडीत गाठले आणि हातघाईची लढाई सुरू झाली. तेव्हा शिवाजीराजांचे विश्वासू पराक्रमी सरदार बाजीप्रभु देशपांडे यांनी शिवाजीराजांना विनंती केली, की त्यांनी विशालगडासाठी पुढे कूच करावी. खिंडीतील लढाई ते स्वतः लढतील. विशालगडावर पोहोचताच तोफांच्या तीन डागण्या ऐकू आल्या म्हणजे शिवाजीराजे सुखरूप गडावर पोहचले, असा संदेश मिळेल. बाजीप्रभु देशपांडे- यांनी वचन दिले, की जोपर्यंत तोफांचे तीन आवाज ऐकू येणार नाहीत, तोपर्यंत सिद्दी जौहरला खिंडीमध्येच झुंजवत ठेवतील. महाराजांना ते पटेना, पण बाजीप्रभूच्या विनंतीवजा हट्टापुढे त्यांनी यास मान्यता दिली आणि विशालगडासाठी कूच केली. बाजींनी सिद्दीच्या सैन्याला रोखून धरण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली, परंतु संख्येने कितीतरी पटीने अधिक सैन्यापुढे त्यांनी प्राणांची बाजी लावली. ते स्वतः प्राणांतिक रितीने घायाळ झाले होते. शेवटी सैनिकांनी मृत्युपथावर असलेल्या घायाळ बाजींना एके ठिकाणी आणून बसविले, मात्र बाजीप्रभूंचे प्राण कानाशी साठले होते. थोड्या वेळाने तोफांचे तीन आवाज ऐकू आले आणि शिवाजीराजे गडावर पोहोचल्याचा तो संदेश समजल्यावरच बाजीप्रभूंनी प्राण सोडले. शिवाजीराजांना ही बातमी फार चटका लावून गेली. बाजीप्रभू हे ज्या घोडखिंडीत लढले आणि स्वतःच्या प्राणांचे बलिदान दिले त्या घोडखिंडीचे नाव त्यांनी पावनखिंड असे बदलले. बाजीप्रभूंच्या बलिदानाने पावन झालेली ती पावनखिंड होती.

मोगल साम्राज्याचा नर्मदा नदीपलीकडे विस्तार करणे, तसेच शिवाजी महाराजांच्या राज्यविस्ताराला वेसण घालणे या दोन हेतूंसाठी औरंगजेबाने त्याचा मामा शाहिस्तेखान याला दख्खनच्या मोहिमेवर पाठविले. प्रचंड मोठा लवाजमा, सैन्य आणि फौजफाटा सोबत घेऊन शाहिस्तेखान निघाला आणि वाटेत असणाऱ्या प्रत्येक राज्यात, गावात त्याने दहशत पसरवीत जमेल तेवढा जमेल तेथे विध्वंस केला. शेवटी पुण्याजवळील चाकणचा किल्ला जिंकून पुण्यातील शिवरायांच्या लाल महालातच तळ ठोकला. महाराजांनी खानाचा बंदोबस्त करण्यासाठी एक धाडसी निर्णय घेतला. तो म्हणजे लाल महालात शिरून खानाला संपविण्याचा! लाल महालात आणि अवतीभोवती खडा पहारा आणि महालात शिरणे अतिशय जोखमीचे काम होते. एके रात्री जवळूनच जाणाऱ्या एका लग्नाच्या मिरवणुकीचा आधार घेऊन काही मोजक्या माणसांसह स्वतः शिवाजी महाराज लाल महालात शिरले. महालाचा कानाकोपरा माहीत असल्यामुळे लवकरच प्रत्यक्ष शाहिस्तेखानच्या खोलीत त्यांनी प्रवेश केला. तोपर्यंत महालात कोठेतरी झटापट सुरू झाल्यामुळे शाहिस्तेखानला जाग आली. तेवढ्यातच त्यांना समोर पाहून खानाने जीव वाचविण्यासाठी सरळ खिडकीतून खाली उडी घेतली. महाराजांनी चपळाईने केलेला वार हुकल्यामुळे खानाच्या प्राणावर बेतण्याऐवजी त्याची हाताची तीन बोटे कापली गेली. अनेकदा या गोष्टीचा अप्रत्यक्ष फायदा शिवराय किंवा त्यांच्या सैन्याला मिळाला. शत्रू सैन्यामध्ये ते घुसल्याच्या केवळ अफवा पसरवून संख्येने किरकोळ असलेल्या मावळ्यांनी संख्येने अनेक पटींनी मोठ्या सैन्याची उडविलेली दाणादाण ही याच गोष्टीची साक्ष देऊ शकते. इ.स.१६६३ सालचे शाहिस्तेखान प्रकरण शिवाजीराजांच्या जीवनात आणखी एका नाट्यमय प्रसंगाची भर घालून गेले. शिवछत्रपतींच्या अशा अनेकानेक पराक्रमी व विजयी घोडदौडी झाल्या. त्यानंतर प्रदीर्घ आजारपणामुळे छ.शिवाजी महाराजांचा मृत्यू दि.३ एप्रिल १६८० रोजी रायगड यथे झाला, असे सांगितले जाते.

# भरकटू न देता त्या त्या विषयातील सखोल माहिती आटोपशीर शब्दात देण्यारं पुस्तक



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**जत तालुक्यातील मुक्त पत्रकार आणि शिक्षक श्री मच्छिंद्र ऐनापुरे यांचे 'विचारांच्या प्रदेशात' हे दहावे पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांमध्ये प्रसंगानुरूप लेखन करण्याचा त्यांचा छंद ग्रंथरूप होऊन वाचकांच्यापर्यंत पोहोचतोय याचा आनंद आहे. सर्वसामान्य, तळागाळातील विद्यार्थ्यांपासून शिक्षक, पत्रकार, स्पर्धा परीक्षांचे विद्यार्थी, वक्तृत्व आणि निबंध स्पर्धांचे स्पर्धक, ख्यातकीर्त वक्ते, राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी अशा विविध स्तरातील आणि घटकातील लोक ऐनापुरे सरांच्या माहितीचा वापर आपली कामगिरी चांगली घडावी यासाठी करत आहेत यातच त्यांचे यश सामावलेले आहे. तरुण भारत, सकाळ, लोकमत, पुढारी, संचार, केसरी, महासत्ता, ललकार, संकेत टाइम्स या आपल्या भागातील वृत्तपत्रांच्या बरोबरच देशोन्नती, लोकशाही वार्ता, गावकरी या दूरच्या प्रदेशांबरोबरच लोकसत्ता, सामना या राज्यस्तरीय प्रमुख वृत्तपत्रांमध्ये त्यांचे लेख सातत्याने प्रसिद्ध होत असतात.**

ते लेख आवडल्याची वाचकांची पत्रे हे वृत्तपत्रातून अधून मधून वाचायला मिळतात. ऐनापुरे सर हे पत्रकार आणि शिक्षक अशी आपली दुहेरी भूमिका बजावत असल्याने त्यांना समाजाला नेमके काय हवे आहे याची चांगली जाण आहे. त्यामुळेच केवळ वृत्तपत्रांमध्ये लिहून आपल्या इच्छित वर्गापर्यंत पोहोचता येणार नाही याची त्यांना जाणीव आहे. त्यामुळेच छावा, छोट्यांचा छोटू, किशोर, मुलांचे मासिक,मार्मिक या नियतकालिकांमधून त्यांच्या बालकथा, शेती, सिनेमा, शिक्षण सामाजिक विषयावरील लेखन प्रकाशित होत असते. सुमारे दशक भरापूर्वी त्यांनी स्वतःचा ब्लॉग लिहिण्यास सुरुवात केली आणि आपले क्षेत्र अधिक व्यापक केले. 'विचारांच्या प्रदेशात' पूर्वी प्रकाशित झालेले त्यांचे नवे प्रकाशन 'सामान्यातील असामान्य' हे मला विशेष भावलेले पुस्तक आहे. या पुस्तकातून त्यांनी ज्या व्यक्तिरेखांची ओळख करून दिली ते जितके महत्त्वाचे कार्य करतात तेवढेच महत्त्वाचे कार्य मच्छिंद्र ऐनापुरे सर आपल्या लेखनातून करत आले आहेत. 'विचारांच्या प्रदेशात' या ग्रंथाची प्रेस कॉपी वाचताना माझ्या लक्षात आले की ऐनापुरे सरांनी अनेक महत्त्वाच्या विषयांना हात घातला आहे. पत्रकार म्हणून अशा वैविध्यपूर्ण विषयावर लेखन आणि चिंतन करण्याची गरज प्रत्येक पत्रकाराला भासत असते. वेगवेगळ्या क्षेत्रातील वाचकाला आपल्या मनातील विचार वृत्तपत्राच्या पानात शोधायचे असतात किंवा आपल्याला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे तो वृत्तपत्रातील विविध स्तंभातून शोधत असतो. गोंधळलेल्या स्थितीतील समाजाला योग्य वेळी योग्य विचार आणि माहिती पोहोचवणे, त्यांची भूमिका स्पष्ट होण्यासाठी सहाय्यक ठरणे वृत्तपत्राचे काम असते. या कार्याद्वारे पत्रकार लोकशिक्षकाची भूमिका पार पाडत असतो. मच्छिंद्र ऐनापुरे हे या व्याख्येत बसणारे लोकशिक्षक आहेत. त्यांच्या लेखनातून समाजाविषयी तळमळ आणि लोकजागृतीची प्रेरणा नेहमीच दिसून आलेली आहे.

आजच्या समाजासमोर असलेल्या अनेक प्रश्नांचा वापर त्यांनी 'विचारांच्या प्रदेशात' मध्ये केलेला आहे. जीवन जगण्याचा मार्ग, हिरोशिमाच्या इतिहासातील काळा दिवस, विभक्त कुटुंब संस्कृतीच्या निमित्ताने, डिजिटल अर्थव्यवस्था आणि पायाभूत सुविधा, महिलांवर होणारे सोशल मीडियावरील आभासी अत्याचार, गुन्हेगारीचा फास आपल्याला कुठे नेणार, विज्ञान क्षेत्रात भारत मागे का, दुरावत चाललेली नाती आणि बाजारीकरण, यापुढील काळात रोबोट जगात धुमाकूळ घालणार, भ्रष्टाचारात भारताचा संपूर्ण आशियामध्ये डंका, शैक्षणिक तंत्रज्ञान क्षेत्रात ग्रामीण भाग मागेच, लैंगिक असमानतेचे समांतर प्रश्न, यापुढे बसणार वारंवार चक्रीवादळाचा तडाखा, प्रदूषणामुळे भारतीयांच्या आयुष्यात घट हे यातील लेख मला विशेष करून आवडले. सध्याचे युग हे माहितीचे युग आहे असे म्हटले जाते आणि इंटरनेटवर




माहितीचा कचरा प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे. एखाद्या विषयावर इंटरनेटवर माहिती घ्यायची ठरवले तर ती माहिती घेता घेता भलत्याच ठिकाणी जाऊन वाचक गुरफटून पडतो. आपल्याला नेमकी माहिती काय हवी होती हेच आणि आपण काय शोधत आहोत आपला वेळ किती वाया गेला? याचा विचार करून अनेकांना पश्चातापाची वेळ येते. त्यामुळे या माहितीच्या महाजालाचे जंजाळात रूपांतर होण्यापूर्वी सुयोग्य माहिती मिळवायचे असेल तर ऐनापुरे यांच्यासारख्या व्यक्तींनी जमा केलेली माहिती आपल्या कार्यासाठी उपयोगात आणणे आवश्यक ठरते. वाचकाला कोठेही न भरकटू देता त्या त्या विषयातील सखोल माहिती आणि आटोपशीर शब्दात देण्याचे काम ऐनापुरे सरांचे लेख करतात. एखादा विषय समजून सांगायचं असेल तर फार पल्हाळीक लिहिण्यापेक्षा परिपूर्ण माहिती सुयोग्य शब्दात जर उपलब्ध झाली तर वाचकांचा केवळ वेळच वाचतो असे नव्हे तर तो विषय समजावून घेणे आणि लक्षात ठेवणे त्यांच्यासाठी सोपे जाते. त्यामुळेच 'विचारांच्या प्रदेशात' कोठेही वाचकाला भरकटू न देता त्याला पोहोचायच्या ठिकाणी ऐनापुरे सर व्यवस्थित पोहोचवतात, याची अनुभूती वाचकांना आल्याशिवाय राहत नाही. या ग्रंथाचे कौतुक करतानाच आता ऐनापुरे यांच्याबाबतीत समाजाच्या आणि माझ्यासारख्या माहिती संकलित करून ठेवणाऱ्या एका पत्रकाराच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. आतापर्यंत सरांनी संकीर्ण स्वरूपात विपुल लेखन केलेले आहे. त्यांचे जवळपास 2000 हून अधिक लेख इंटरनेटवर उपलब्ध आहेत. मात्र आता अशा संकीर्ण कार्यातून सरांनी स्वतःला बाजूला केले पाहिजे. यापेक्षा व्यापक क्षेत्र त्यांची वाट पाहत आहे. एखाद्या विषयावर पुरेपूर माहिती देणारे आणि त्या विषयाचे सखोल ज्ञान उपलब्ध करून देणारे पुस्तक त्यांच्याकडून या पुढच्या काळात अपेक्षित आहे. सांगली जिल्ह्यातील अनेक शिक्षकांनी आपल्या व्यासंगातून अशा पद्धतीचे ग्रंथ मराठी सारस्वताला दिले आहेत. ती काळाची गरज आहे. वृत्तपत्रीय लिखाणाला एक मर्यादा असते त्या मर्यादांना पार करून कधी ना कधी समाजाची खरी गरज लक्षात घेऊन परिपूर्ण माहिती देणारे ग्रंथ वाचकांपर्यंत पोहोचण्याची आवश्यकता आहे. तळागाळात काम करणाऱ्या शिक्षकांना, पत्रकारांना राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक अशा सर्वच प्रश्नांचे प्रत्यक्ष जनमानसावर काय परिणाम होत असतात याची जितकी माहिती असते तेवढी माहिती आकडेवारी आणि दुसऱ्याचा अनुभव ऐकून आपले मत ठरवणाऱ्या व्यक्तींकडे नसते. त्यामुळे मोठ्या मोठ्या व्यक्तींच्या विचारांना आणि ते सुचवत असलेल्या उपायांनाही मर्यादा पडतात. एखाद्या योजनेतील फोलपणा त्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी किंवा समाजातील एखाद्या प्रथेची मूळ कारणे ती न हटण्यामागची सामाजिक स्थिती आणि प्रत्यक्ष कार्य करताना कोणत्या प्रकारची काळजी घेतली पाहिजे याबाबतचे ज्ञान जितके 'ग्रास रूट'वर काम करणाऱ्या व्यक्तीला असते तितके समाजातील धुरिणांना सुद्धा असणे मुश्किल अर्थात त्याला काही मान्यवर अपवाद आहेतच. मात्र तरीही आपल्या ज्ञान आणि अनुभवाचा लाभ ऐनापुरे सरांच्या सारख्या विचारी व्यक्तिमत्त्वांनी समाजाला करून द्यायचा असेल तर एखाद्या विषयाला समोर ठेवून एक ग्रंथ अशा पद्धतीचे कार्य त्यांनी यापुढे करावे. त्यांना वाचक मान्यता तर मिळालेली आहेच, समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील वर्ग त्यांच्या विचारांकडे आस्थेने आणि उत्सुकतेने लक्ष देत असतो याचा विचार करून पुढचा ग्रंथ विचारांच्या प्रदेशाच्या पलीकडे अजून भरभरून देणारा होवो याच शुभेच्छा!

**– शिवराज काटकर**
**विशेष प्रतिनिधी, तरुण भारत**

# विचारांची व्यापक दृष्टी



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**कविता म्हणजे नेमके काय ? कुणाला शब्द म्हणजे कविता वाटते, कुणाला रचना म्हणजे कविता वाटते तर कुणाला अर्थ म्हणजेच कविता वाटते, कुणाला अनुभव म्हणजे कविता वाटते. पण या सा-यांच्या पलीकडे कविता असते. निराकार परमेश्वरासाखी (मानला तर) 'बिटवीन द लाईन्स' असे इंग्रजीत म्हणतात. म्हणजे मराठीत काव्य शब्दांच्या पलीकडे किंवा अलीकडे असते. म्हणजे नेमके काय हे सामान्य वाचकांना कळत नाही. आत्मा जसा निराकार असतो. तसेच कवितेचा अर्थही निराकार असतो. त्याला पा-यासारखे चिमटीत पकडता येत नाही. इतका तो तरल असतो.**

मोजक्या शब्दात आशयपूर्ण विचारमांडणी करणारी कविता रसिकांच्या मनाचा ठाव घेते. भारतीय आणि पाश्चात्य साहित्यमीमांसकांनी काव्याची व्याख्या केली आहे. कविता शब्दांच्या पलीकडला अनुभव असतो. म्हणून कविता 'बिटवीन द लाईन्स' वाचावी लागते. प्रतिभावान कवी आपला अनुभव प्रतिमांतून साकार करतो. कधीकधी कवितेतील संपूर्ण विधानच प्रतिमा बनून येते. कविता ही सत्याची जाणीव करून देते तसेच कल्पनाविश्वात रममाण होण्यास प्रवृत्त करते. लेखक व. पु. म्हणतात, 'ध्यानीमनी नसताना विचारांच्या माध्यमातून जो तुम्हाला खडबडून जाग आणतो, तो कवीच असतो.

आपल्या विचारांना काव्यरूपी पंख लावून मुक्तपणे विहार करणारे कवी गिरीश घाटे यांचा 'सांग ना समजेल का ? ' हा कवितासंग्रह म्हणजे सहजसुंदर विचारांची काव्यनक्षी आहे. कविता, चारोळया, अभंग असे विविध काव्यप्रकार या संग्रहात अनुभवायला मिळतात. कथा- कादंबऱ्या याशिवाय कवितेपासून कवी घाटे हे दूरच होते. वाचनाची आवड होती पण लिखाण काही होत नव्हते.लॉकडाउनच्या कालावधीत ती संधी त्यांना मिळाली आणि त्याची परिणती म्हणजे हा कवितासंग्रह होय. अध्यात्माचा विशेष प्रभाव त्यांच्यावर आहे तसेच सुरेश भट, शांताबाई शेळके यांचाही विशेष प्रभाव कवीवर आहे.

'सांग ना समजेल का ' संग्रहातील रचना शब्दसौन्दर्याने खुललेल्या आहेत. सामान्य वाचकाला सहज अर्थ समजेल अशी रचना या संग्रहात वाचावयास मिळते. कवी घाटे यांच्या लेखणीवर संतसाहित्याचा प्रभाव असल्याचे जाणवते. त्यातील फक्त आध्यात्मिक भाव त्यांनी जाणला नाही तर तुकारामांची गाथा वाचताना त्यांना संत तुकाराम यांच्या रचनेत त्यांचं कवित्व ही दृष्टिस पडले. वाचनाच्या या प्रेरणेतून त्यांना आपली कविता गवसली. प्रेम, विरह, भास, आत्मविचार , भक्तिभाव , सामाजिक भाव असे विविध भावरंगांची उधळण या कवितासंग्रहात पाहायला मिळते. या कवितासंग्रहातील 'याद अजुनी येतेस तू' या कवितेतील प्रियकराला अस्तास जाणाऱ्या सूर्याकडे पाहून प्रेयसीची आठवण येते आहे, हा विरहाचा हळवा क्षण या कवितेत चित्रित झाला आहे. ' दुष्ट त्या सांजसमयी, पाठ करून गेलीस तू,
अस्तणारा सूर्य बघुनी, याद अजुनी येतेस तू....'

आयुष्य जगण्याच्या या स्पर्धेत, जबाबदारी, कर्तव्य निभावताना बऱ्याच सुखद क्षणांना आपण मुकलो आहोत, याची जाणीव करून देणारी 'मी होतो कुठे ? ' या कवितेतील या ओळी पहा,

**"मुलांसोबत बसण्याची वेळ झाली**
**पण त्यांना आता उसंत**
**होती कुठे**
**नकळत ती छोटी पाऊले**
**मोठी झाली,**
**छोटे छोटे ते क्षण टिपाया**
**मी होतो कुठे ?** "

जे घडून गेले आहे, त्यावर चिंतन करण्यापेक्षा आणि हातात नसणाऱ्या भविष्याची चिंता करण्यापेक्षा हातात जो वर्तमान आहे, तो भरभरून जगण्याची सकारात्मक दिशा देणारी 'प्राप्तकाळ' ही रचना आहे.


**'झाले गेले भूत जे | नसे माझे, अप्राप्त जे|**
**जगू एकेक क्षण हा | आज जो माझा || ( प्राप्तकाळ )**

आपल्याआ दुसऱ्याकडे जे असते त्याचा हेवा वाटतो, पण स्वतःकडे असणाऱ्या गोष्टीकडे लक्ष नसते, स्वतःला आपल्या अंतर्मनात डोकावून पाहण्याची उर्मी देणारी 'माझे मला कळले' ही कविता आहे.

**"जे शोधले आजवर, नाही कधी मिळाले,**
**येथेच होते मजकडे, माझे मला कळले.."**

कमीतकमी शब्दात विचारांची व्यापक दृष्टी मांडणाऱ्या ह्या कविता आहेत. या संग्रहाला सकारात्मकतेची झालर प्राप्त झाली आहे. जगण्याचे सार उत्तम प्रकारे विशद करणारा हा कवितासंग्रह वाचनीय आहे.

**( सांग ना समजेल का ? – कवितासंग्रह / कवी गिरीश घाटे / प्रकाशक : ब्लूरोज पब्लिशर्स / मूल्य : १५० रुपये )**




# एक प्रश्न

आधुनिक केसरी

**एक प्रश्न कवींना.... प्रेयसीच्या सौंदर्याला चंद्राची उपमा देऊन झाली असेल तर,**
**तिच्या मदमस्त कायेचे वर्णन करून झाले असेल तर, थोडं लक्ष इकडे पण द्या.**
**हजारो वर्षांपासून रानोमाळी वास्तव्यास असणाऱ्या, कंदमुळे खाऊन गुजराण करणाऱ्या,**
**उबदार वस्त्रांअभावी शेकोटीचा आधार घेणाऱ्या,**
**आदिमांचे दुख उतरू द्या तुमच्या कवितेतून.**
**एक प्रश्न मिडीयाला... करीनाच्या तैमुरवर प्राईम टाईम करून झाला असेल तर,**
**सलमानच्या विवाहावर डिबेट**
**करून झाली असेल तर, अंबानीच्या लेकीच्या**
**बाळंतपणावर बोलून झाले असेल तर,**
**एखादा रिपोर्टर पाठवा इकडे पण**
**दिसू द्या त्याला आदिवासिंचं खपाटीला गेलेलं**
**पोट, कुपोषणाने हातपाय घासून मेलेलं पोर,**
**अन रानोमाळी फिरणारे नुसतेच जिवंत सांगाडे.**
**एक प्रश्न साहित्यिकांना......**
**विश्वगुरूच्या थाटात घरघर तिरंगा म्हणणाऱ्या**
**नेतृत्वास कधी करणार तुम्ही प्रश्न**
**की, डोक्यावर छप्परच नसलेल्या**
**करोडो भारतीयांनी कुठे फडकवावा तिरंगा,**
**विद्यावाचस्पती, साहित्यप्रभू म्हणून मिरविणाऱ्या**
**साहित्यीकांनो..... स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवावर**
**स्तंभ लिहून झाले असेल तर,**
**येऊ द्या एखादा लेख विकासापासून**
**कोसो दूर असणाऱ्या आदिवासींवर.**
**एक प्रश्न राजकारण्यांना.....**
**आदिवासींचे कैवारी म्हणून मिरविणाऱ्या**
**राजकारण्यांनो कधी सोडविणार आपल्याच**
**बांधवांना शासन-प्रशासन, पोलीस आणि**
**नक्षलींच्या अजगरी विळख्यातून.**
**कधी गुंजणार तुमचा बुलंद आवाज**
**आदिवासींच्या फ्रिडमला फ्रॅक्चर्ड**
**करू पाहणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध,**
**खाणींसाठी डोंगर पोखरले जात असताना,**
**आदिवासींची श्रद्धास्थाने नष्ट होत असताना,**
**अस्मितेच्या खाणाखुणा पुसल्या जात असताना,**
**तुम्ही असे गप्प का ?**
**डॉ. संतोष संभाजी डाखरे, ८२७५२९१५९६**

तुकारामनीती
भाग -४५

# होईल आघवा। तुका म्हणे आनंद ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**काळाच्या शेकडो वर्षे पुढे जाऊन जे विचार मांडले जातात तेच विचार अखंड, अमरत्व पावतात. असे लेखन करणारी माणसेच संपूर्ण जगाचे सर्वकाळ मार्गदर्शक ठरतात. अगदी इसवीसनाच्या अगोदरपासून लोक लिहून जागृती करत आहेत. त्यांचे अजरामर वाङ्मय आज सुद्धा लोकजागृती करत आहे. या लेखनाचे अनंत फायदे अजून समाजाला होत आहेत. याच्या आधारेच अनेक लोकांना नोकऱ्या मिळत आहेत. याच आधाराने अनेक लोक कीर्तन-प्रवचने करून आपले चरितार्थ चालवत आहेत. एखाद्या व्यक्तीचे लेखन अथवा जीवन हे दुसऱ्या माणसाचे अर्थकारण चालवत असेल तर त्या व्यक्तीच्या लेखनाचे महत्व अजून किती असावे? हा निश्चितपणे विचार करण्यासारखा विचार आहे. काही लोकांचे विचार अनेक लोकांचे आचारण सुधारत असतील तर या एवढे पुण्य ते काय? आज आपण एकविसाव्या शतकांत आणि सर्वत्र साधनांनी एवढामोठा गदारोळ मांडलेला असताना आपल्याला तुकोबांच्या विचारांची नितांत आवश्यकता का असावी? याचे हे गमक आहे. आज ज्याप्रमाणे ग्रीक तत्ववेत्ते प्लेटो, ॲरिस्टॉटलपासून, संबोधि बुद्ध, पतंजली, चार्वाक ते थोर संत-विचारवंत थिरुवल्लुवर, चक्रधर, ज्ञानदेव, तुकाराम महाराजांपर्यंत लोकांचे विचार तेव्हढेच कालातीत आणि समकालीन वाटतात.**

तामिळ संत थिरुवल्लुवर यांचे क्षमा शीर्षकाखाली "थोरपणा हवा असेल, सदैव उन्नत राहण्याची इच्छा असेल, तर दुसऱ्याने केलेल्या अतिक्रमणाची सदैव क्षमा करण्याची सवय मनःपूर्वक प्रयत्नांनी लावून घे" हे विचार आज-आत्ता आपल्या जीवनाला तंतोतंत लागू पडणारे आहेत.याच अनुषंगाने तुकोबाराय आपले अभंग लिहितात. त्यापैकीच तुकोबांचा

**काळ सारावा चिंतने। एकांतवासी गंगास्नाने। देवाच्या पूजने। प्रदक्षणा तुळसीच्या॥ युक्त आहार विहार। नेम इंद्रियांसी सार। नसावी बासर। निद्रा बहुभाषण॥ परमार्थ महाधन। जोडी देवाचे चरण। व्हावया जतन। हे उपाय लाभाचे॥ देह समर्पिजे देवा। भर काहींच न घ्यावा। होईल आघवा। तुका म्हणे आनंद॥**

हा एक चिंतनीय अभंग आहे. तत्कालीन परिस्थितीत लिहिलेला हा अभंग आजच्या परिस्थितीत अत्यंत चपखलपणे तंतोतंत लागू पडतो. आज माणसे सगळीकडे चिंताग्रस्त आहेत. लोकांचा संयम संपत चालला आहे. लोक वर्तमान परिस्थितीत भूतकाळाचा विचार करून भविष्याचा वेध घेणारे विचार करत नाहीत. माणसाने नेहमी सकारात्मक, लोकोपयोगी आणि वैश्विक बाबींचे चिंतन करावे. त्या ऐवजी लोक दैनंदिन जीवनातील गोष्टींची चिंता करत बसतात. याच अनुषंगाने सुभाषितकार माणसाला अनावश्यक चिंता किती घातक आहे? याचे इथे वर्णन करतात.

**चिता चिंता समाप्रोक्ता बिन्दुमात्रं विशेषता ।**
**सजीवं दहते चिंता निर्जीवं दहते चिता ॥**

चिंता-चिता या दोन शब्दातील एका अनुस्वाराच्या भेदाने सगळी अडचण निर्माण केली आहे. चिंता माणसाला जिवंतपणी तर चित्ता मेल्यावर जाळते. त्यासाठी माणसाने चिंता करण्याऐवजी सकारात्मक चिंतन करावे. महान लोकांच्या विचारांचे आणि आचाराचे चिंतन करून आपला जीवनातील अनमोल काळ व्यतीत करावा. त्याशिवाय माणसाने सातत्याने लोकांत राहतांना कधीतरी एकांतात राहून ध्यान-चिंतन-मनन करावे. माणसाने ईश्वर पूजन म्हणजेच ईश्वर स्तवन करावे. आपल्या जीवनात दिव्य प्रस्थापित



करणारे विचार समाविष्ट करावेत म्हणजेच देवपूजा होय. याशिवाय माणसाने वृक्षाचे आदर्श आपल्या जीवनात उतरवायला हवेत. अखंड प्राणवायू देणारे तुळशीचा वृक्ष आपल्या अंगणात लावून सर्वकाळ प्राणवायू घेत राहावा. त्याशिवाय तुकाराम महाराज माणसाने आपल्याला पचेल असाच आणि माणसासाठी असलेला शाकाहार घ्यावा. अन्न माणसाचे भरणपोषण करते, परंतु आपल्या शरीराला सर्वार्थाने लाभकारी होणारेच अन्नसेवन करावे. तसेच आपल्या पंचकर्मेंद्रियांना योग्य नियम घालून द्यावेत. त्याप्रमाणे कानाने, डोळ्याने आपल्या हिताचेच चिंतन होणाऱ्या गोष्टी ऐकाव्या अथवा पहाव्यात. असे झाल्यास माणसाचे मन आपल्या लक्षापासून विचलित होणार नाही. त्याचबरोबर माणसाने दिवसा झोपू नये आणि व्यर्थ बडबड म्हणजेच जास्तीचे, अनावश्यक बोलू नये. असे वर्तन करणे म्हणजेच परमार्थ करणे होय. परमार्थ म्हणजेच आपल्या जीवनाला सर्वश्रेष्ठ अर्थप्राप्त होईल असे चिंतन-मनन करावे. यामुळे आपल्या जीवनाचे सर्वार्थाने कल्याण होईल. असे विचार माणसाने नित्य नित्य जतन करावेत आणि जीवन सार्थकी लावावे. त्याशिवाय दैनंदिन संसारात फार काही ताणताणाव न घेता, सृष्टीतील होणाऱ्या बदलावर जास्तीचा विचार न करता त्या स्वीकारण्याची मनाची तयारी ठेवावी. कोणताही अनावश्यक भर घ्यायचा टाळले की माणसाच्या जीवनामध्ये सर्वकाळ आनंदच आनंद नांदायला लागेल. तमाम मानवजात आनंदी, सुखी, निरोगी होईल! या अभंगात संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी तमाम मानवजात सुखी होण्याची महत्वपूर्ण तत्व प्रतिपादन केली आहेत. आज माणसाला या अभंगाची नितांत आवश्यकता आहे. आज माणसाने व्यर्थ गोष्टींचा विचार करून चिंताग्रस्त जीवन करून टाकले आहे. यामुळे माणसे शुगर-बिपी सारख्या भयंकर रोगांनी त्रस्त आहेत. अनावश्यक विचार करून त्रस्त, चिंताग्रस्त आणि अस्वस्थ माणसांना या अभंगासारखे वर्तन करण्याची नितांत आवश्यकता आहे. माणसाचे मन अनेक रोगांचे प्रवेश द्वार असून कान, नाक, डोळे, त्वचा आणि इतर इंद्रिये माणसाला आनंद देतातच परंतु यांचा जर आपण अनियंत्रित आणि स्वैर उपभोग घेतला तर हीच इंद्रिये माणसाच्या जीवनाची राखरांगोळी करतात. त्यामुळे "तुका ह्मणे सुख देहनिरसनें। चिंतनें चिंतनतद्रूपता॥" याप्रमाणे चिंतन करून सुखोपभोग घ्यावा. आज माणसांच्या चरणांवर सर्वच सुविधा लोळण घेत असतांना माणूस मात्र चिंताग्रस्त आणि रोगग्रस्त आहे! यासाठी माणसाला अनावश्यक चिंता करणे सोडावे लागेल. सत्ता-संपत्ती या गोष्टी गौण असून आपले विचार अत्यंत महत्वपूर्ण आहेत याचे भान-जाण असणे क्रमप्राप्त आहे. तुकाराम नीती लिहिण्याचा उद्देश सफल होत आहे. अनेक वाचक हे सदर नियमितपणे वाचत आहेत, प्रतिक्रिया देत आहेत. आज तुकोबांच्या अभंगांची माणसाला नितांत आवश्यकता आहे. तुकाराम महाराजांच्या आचरणातून आलेले महान विचार आपल्या जीवनात उतरवल्यास आपले जीवन आनंदाने ओतप्रोत भरून अखंड प्रवाही होईल. त्यासाठी चला सज्जनांनो, आपल्या जीवनात महान लोकांचे विचार पेरून मिळालेल्या जीवनाची कृतार्थता सिद्ध करूयात. असे झाल्यास खऱ्या अर्थाने जगद्गुरू तुकोबाराय आपले अखंडकाळाचे मित्र बनून राहतील. तुकोबांच्या गाथा आणि त्यातील अमर-अजीवन तत्वे आपले जीवन उजळवून टाकतील यात तिळमात्र शंका नाही! जय तुकोबाराय!

# अखेर शहिद वीर जवान सुर्यकांत नामदेवराव जोगदंड यांना ५६ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर जिल्हा प्रशासनाने दिला न्याय !

## पुर्णा तालुक्यातील शहिद जवान सुर्यकांत जोगदंड यांची शौर्य गाथा देणार तरुण पिढीला प्रेरणा

आधुनिक केसरी

सन १९६५ च्या भारत-पाकीस्तान युध्दात शहिद झालेल्या पुर्णा तालुक्यातील गौर येथील शहिद विरजवान सुर्यकांत नामदेवराव जोगदंड यांना जिल्ह्याच्या सन्माननीय जिल्हाधिकारी आंचलजी गोयल व जिल्हा सैनिक कल्याण विभागाचे सन्माननीय अधिकारी श्री.पाटील यांनी जिल्हा प्रशासनात रितसर नोंद करुन योग्य सन्मान मिळवून दिला...शहिद विर जवान सुर्यकांत जोगदंड यांच्या कुटुंबातील वारस श्री.विजय जोगदंड व शरद जोगदंड यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शनपर माहितीमुळे आमच्या प्रयत्नांना यश आले सप्टेंबर १९६५ यावर्षी तत्कालीन प्रधानमंत्री स्व.लालबहादूर शास्त्रीजी यांच्या कार्यकाळात भारत-पाकीस्तान या दोन देशात तब्बल २२ दिवस घनघोर युध्द झाले या भयंकर युध्दात भारत-पाकीस्तान बॉर्डर आयएएफडी क्र.९३१ या ठिकाणी युध्दात अडकलेल्या भारतीय जवानांना रसद पुरवण्यास गेलेले विर जवान सुर्यकांत नामदेवराव जोगदंड राहणार गौर जिल्ह्यात परभणी/हिंगोली संयुक्त मराठवाडा महाराष्ट या विर जवानाचा शत्रू सैन्याने केलेल्या रॉकेट हल्ल्यात होरपळून मृत्यू झाला होता या घटने नंतर शहिद विर जवान सुर्यकांत नामदेवराव जोगदंड यांचे मुळगाव गौर येथील जोगदंड कुटुंबाशी प्रत्यक्ष संपर्क साधून तत्कालीन सैन्य दलातील अधिकाऱ्यांनी त्यांना मरणोप्रांत प्राप्त निधीसह त्यांचे अन्य साहित्य देऊ केले परंतु या देशभक्त कुटुंबातील वडीलधाऱ्या जेष्ठ मंडळींनी आमचा पुत्र या देशासाठी शहिद झाला याचा आम्हाला सार्थ अभिमान असून जेव्हा तोच गेला तर आम्ही त्याचा पैसा व अन्य साहित्य घेऊन काय करणार ? असा प्रश्न उपस्थित करुन त्याच्या विर मरणाची इतिहासात नोंद व्हावी व त्याच्यासह कुटुंबाचा सन्मान व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली परंतु जिल्ह्यातील प्रशासनाने या देशभक्त कुटुंबातील जेष्ठांची अपेक्षा देखील तब्बल ५६ वर्षापर्यंत पुर्ण केली नाही ही फार मोठी शोकांतिकाच म्हणावी लागेल ना ? कुटुंबाला काही एक न सांगता नांदेड येथे दि.१० जुन १९६१ रोजी झालेल्या सैन्य दलाच्या भरतीत निवड झालेल्या या देशभक्त मर्द मराठा विर जवानाने तब्बल ४ वर्षापर्यंत सैन्य दलात यशस्वीपणे सेवा बजावली या कालावधीत एकही वेळ आपल्या मुळ गाव गौर येथील कुटुंबाशी संपर्क देखील साधला नाही परंतु दुर्दैवच म्हणावे लागेल की जोगदंड कुटुंबाला शेवटी १२ सप्टेंबर १९६५ रोजी आपला हा सुपुत्र देशासाठी शहिद झाल्याची खबर ऐकावयास मिळाली देशासह समाजाप्रती आपल काहीतरी कर्तव्य असल्याची प्रांजळ भावना सदैव हृदयात बाळगून सातत्याने कार्यरत राहणारे देशभक्त जोगदंड कुटुंब आपल्या कुटुंबातील सदस्याने देशासाठी विरमरण पत्करल्यानंतर देखील केवळ प्रशासनाकडून योग्य सन्मानाचीच अपेक्षा करीत आपल्या तिसऱ्या पिढीत पोहोचले परंतु त्यानंतर देखील प्रशासनाकडून सादा सन्मान तर सोडाच या कुटुंबातील प्रखर देशभक्त शहिद विर जवान सुर्यकांत नामदेवराव जोगदंड यांची जिल्हा प्रशासनात सादी नोंद देखील करण्यात आली नाही अशी खंत व्यक्त करीत असतांना सन १९९७/९८ यावर्षी कुटुंबातील त्यांचे वारस विजय जोगदंड यांनी एक पत्रकार मित्र या नात्याने माझ्याशी संपर्क साधून या घटने संदर्भात सविस्तर माहिती दिली त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे आम्ही त्यावेळी एका अंतरदेशी पत्रावर संपूर्ण मजकूर लिहून सैन्य दलाच्या तत्कालीन सन्माननीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधला यावेळी थल सेना अध्यक्ष जनरल वेद मलिक हे होते त्यांनी तात्काळ दखल घेऊन शहिद जवान सुर्यकांत जोगदंड यांचा मरणोप्रांत दि.१७ सप्टेंबर १९९९ रोजी कारगील विजयी दिनाचे औचित्य साधून शहिद विरजवान सुर्यकांत जोगदंड यांच्या कुटुंबातील विजय जोगदंड यांना औरंगाबाद येथे बोलवून विरजवान सुर्यकांत जोगदंड यांच्या नावाने सन्मानपत्र व पदक देऊन सन्मानीत केले परंतु यानंतर या शहिद विर जवानासह त्यांच्या कुटुंबाचा जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी सन्मान व्हावा याकरिता त्यांच्या नावाची जिल्हा प्रशासनासह जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात रितसर नोंद व्हावी याकरिता जोगदंड कुटुबांतील सदस्य विजय जोगदंड व शरद




जोगदंड यांनी माझ्याशी सातत्याने संपर्क साधून लढा कायम ठेवत लेखी स्वरुपात जिल्हा प्रशासनासह सैन्य दलाकडे विनंत्या केल्या यासह वेळोवेळी वृत्तपत्रांमध्ये या संदर्भात वृत्त देखील प्रकाशित केले त्यांच्या शहिद जवान सुर्यकांतराव जोगदंड यांच्या विषयी नितांत आदर व्यक्त करीत दैनिक सकाळ,दैनिक आधुनिक केसरी,दैनिक प्रसार,दैनिक सत्यलेख,दैनिक एकमत,मासिक अजितपत्र हिंदी पाक्षिक प्रजातंत्र शक्ती,जंग-ए-अजितन्युज वेब वृत्त वाहिनीसह अनेक वृत्तपत्रांनी वेळोवेळी वृत्त प्रकाशित केले अश्या प्रकारे तब्बल ३३ वर्षाच्या लढ्यानंतर विद्यमान सन्माननीय जिल्हाधिकारी आंचलजी गोयल व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सन्माननीय एस.एस.पाटील यांनी सैन्य दलाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून शहिद विर जवान सुर्यकात जोगदंड यांच्या संदर्भातील माहिती मागवली असता एसआरओ श्री.एम.डी.कमीरकर यांनी दि.२७ एप्रिल २०२२ रोजी परभणी जिल्हा प्रशासनाला लेखी स्वरुपात केलेल्या पत्रव्यवहारात नमूद केले की सदरील शहिद विर जवाना संबंधिचे सर्व रिकॉर्ड सन १९९५ यावर्षी नष्ट करण्यात आल्यामुळे सैन्यदलाकडे त्यांच्या सैन्य दलातील नियुक्तीसह विरमरणाची तारीख घटनास्थळ व विर मरण (मृत्यूच्या) तारखे व्यतिरिक्त कुठल्याही प्रकारची माहिती नसल्याचे कळवले या अल्पशः माहितीच्या आधारे सन्माननीय जिल्हाधिकारी आंचलजी गोयल व सन्माननीय जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी एस.एस. पाटील यांनी जिल्हा प्रशासनासह जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात रितसर नोंद करुन या शहिद विरजवानासह त्यांच्या कुटुंबाला तब्बल ५६ वर्षांनी न्याय मिळवून दिल्यामुळे त्यांच्या विषयी संपूर्ण पुर्णा तालुक्यात आदर व्यक्त होत असून त्यांनी केलेल्या या महत्वपुर्ण नोंदीमुळे शहिद विर जवान स्व.सुर्यकांत नामदेवराव जोगदंड यांच्या भव्य शहिद स्मारकाचा प्रश्न देखील मार्गी लागणार आहे.

कारण जिल्हा सैनिक कल्याण विभागा मध्ये या शहिद जवानाची २०२२ पर्यंत नोंद नव्हती शहिद उधमसिंघ फाऊंडेशनच्या माध्यमातून आम्ही केलेल्या विनंतीस मान देऊन त्यांचे जन्मगाव असलेल्या गौर ग्राम पंचायतीने दि.२५ फेब्रुवारी २०१९ रोजी ग्राम पंचायतीच्या सर्वसाधारण सभेत सरपंच सौ.चांगुणाबाई अनंतराव पारवे यांनी ठराव क्र.०६ अंतर्गत बहुमताने ठराव पास करून शहिद विरजवान सुर्यकांत जोगदंड यांच्या स्मारकासाठी गावातील जिल्हा परिषद शाळेसमोरील जागा देण्याचा अत्यंत महत्वपुर्ण ठराव पास केला होता या जागेवर आता लवकरच सन्माननीय जिल्हाधिकारी आंचलजी गोयल व सन्माननीय जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्री.पाटील साहेब यांच्या मार्गदर्शना प्रमाणे शहिद विरजवान सुर्यकांत जोगदंड यांचे शहिद स्मारक निर्माण होणार आहे.....

**विर जवान शौर्यगाथा :**

**लेखक - चौधरी दिनेश (रणजीत)**
**संस्थापक अध्यक्ष : शहिद सरदार उधमसिंघ फाऊंडेशन महाराष्ट्र**
**मो.क्र.9766529055**



## वेल सुकता सुकता...

काळजाला पडते चीर
डोळ्यातून फुटतो पान्हा,
तरीही वास्तल्याच्या वेलीवर
ममते चे फुल फुलते पुन्हा पुन्हा.


तिरस्कारचा काटा हृदयी
रुतून रक्ताचा थेंब न थेंब
भळ भळतो जेव्हा केव्हा,
तरीही भावनेचे ते कोमल
फुल फुलू पहाते पुन्हा पुन्हा.

निर्माल्यतल फुल पायदळी
तुडवून मातीतल्या मातीतच
मिसळून जाते पुन्हा,
शांत झालेल्या मातीतल्या
त्या मातीला ही धरणी माय
दुभंगून कवेत घेते केव्हा केव्हा.

भावनेच्या भाव फुलांची
ओंजळ चरणांवर अर्पुणी
चरणांवर व्हावी की कधीतरी
रिती, पण एका एका कणाच्या
सिंचनातून फुललेली नाती
तिथेच कशी आणि का जन्म घेते
अनिती ?.
©वैशाली चंद्रकांत महाडिक
MO.-9767437923

## हिनवू नये

हिनवू नये कोणालाही
अपमान करू नये कोणाचा
सारे लेकरे आहेत विद्यात्याचे
जीवन वाया घालवू नये
माणसाचा
माझे, माझे म्हणताना
वेळ कधीही वाया घालवू नये
मदत करावी एखाद्याची
पण, कोणालाही बोल लावू नये
हिनवून बोलल्याने मान वाढत
नाही ह्याची जाणीव सदैव ठेवावे
माणूस म्हणून जगावे जगात
असे एखादे सत्कर्म करावे
आपण आहोत सर्वच माणसे
सर्व काही कळते आपल्याला
हिनवून बोलल्याने फायदा नाही
अर्थ लागत नाही या जगण्याला
एक दिवस जाणे आहे प्रत्येकाला
कशाला इकडे, तिकडे शोधायचं
माणुसकी धर्म निभावून दाखवावे
त्यातच सर्व काही बघायचं
सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५



## ।। स्तुतीसुमने।।



पंढरीनाथा पांडुरंगा विठ्ठला ।
देवांचा शिरोमणी हा एकला ।।
गळा वैजयंतीमाला रूळतसे ।
कंठी कौस्तुभ मणी विराजीतसे ।।
मकरकुंडले शोभति श्रवणी।
तुझे पायीची सुखावली धरणी ।।
शिरी मुकुट शोभे फाकली प्रभा ।
वामांगी रखुमाई दिव्य तयाची शोभा ।।
कासे पितांबर कस्तूर ललाटी ।
गरूड हनुमंत पुढे उभे ठाकति ।।
भीमा आणि चंद्रभागा ।
तुझ्या चरणीच्या गंगा।।
उध्दव अक्रूरउभे भूमंडळी ।
हजेरी लावती संतमंडळी ।।
ज्ञाना तुका गोरा चोखा बंका ।
सोपान मुक्ता जनी नामा एका ।।
सम चरण ठेवुनिया विटेवरी ।
उभा पांडुरंग ठेवुनिया कर कटेवरी ।।
झाली तयाला युगे अठ्ठावीस ।
पुंडलिका भेटीसाठी हा प्रयास ।।
रचनाकार : आहेर वा.र.नासिक 9958782982

## सह्याद्री गातो अंगाई...



तव तेजाच्या प्रकाशाने
उजळल्या दिशा या दाहीं
सह्याद्रीचा कण -कण तुम्हां
गातो अंगाई...
शूर शहाजी पिता हो तुमचे
धैर्यवान जिजाऊ आई...
गड किल्ला ही प्रत्येक इथला
गुणगान तुमचेच गाई...
सह्याद्रीचा कण-कण तुम्हां...
शिवनेरीला आली स्फूर्ती
शिवबांच्या जन्माने...
पावन झाली इथली माती
त्यांच्याच पदस्पर्शाने...
अजूनही येथे त्यांच्या कीर्तीचा
गंध दरवळत राही...
सह्याद्रीचा कण कण तुम्हां...
सहज नव्हता हो शिवरायां
यज्ञ तो स्वराज्याचा...
या भूमीला कित्येकांचा
अभिषेक जणू रक्ताचा...
अंतःकरणे मुजरा माझां
त्या वीरांच्या पायीं...
सह्याद्रीचा कण कण तुम्हां...
अंगावरती येती शहारें
शौर्य तुमचे पाहून...
तनां- मनातून जागे स्फूर्ती
नाम तुमचे घेऊन...
चरांचरांतून सिंहगर्जना
एकच आता होई...
जय जिजाऊ अन् जय शिवराय
हां नाद हों ठायीं- ठायीं...
सह्याद्रीचा कण कण तुम्हां
गातो अंगाई...
- सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे,
परभणी

## काजळल्या राती

काजळल्या राती
काळोखले नभ
सारी लगबग
थांबलेली..
झाडाच्या ढोलीत
लालबुंद डोळे
खिंडारात जाळे
टांगलेले..
दूरवर कुठे
मिणमिण दिवे
धुमसती गावे
हरलेली..
नभामध्ये उगा
डोकावती तारे
सुनसान वारे
थांबलेले..
रातकिडे सारे
किरकिर गाती
श्वास हुंकारती
लांबलेले..!
महादेव बी. बुरुटे,
शेगाव, ता. जत, जि. सांगली
मो. 9765374805

## छत्रपती शिवाजी महाराज


जिजाबाईच्या पोटी
जन्मला विर
होऊनी गेला मोठा तो
राजे शुर
नाव होते छत्रपती
शिवाजी सोबतीला
होते प्रभु बाजी मराठा
साम्राज्याचे संस्थापक
होते
गुलामगिरीला त्यांनी
नाकाराले
जनतेसाठी ते फक्त
जगले
असे शूरवीर राजे झाले
आशीर्वाद भवानी
मातेचा
घेऊन लढाया जाये
रयतेचा
तो राजा पाठी ढाल
हाती
असे तलवार असा
लढ़ती
हर हर महादेव बोलूनी
करती सुरवात कामाची
जिजाबाई ने घड़वला
असा शूरवीर तो राजा
अफजल खानला
मारले
ना शस्त्र ना हत्यार होते
केला फक्त हल्ला
युक्तिने
वाघ नखे घालूनी गेले

मराठयांची शान
छत्रपती
शिवाजी महाराज
पराक्रमी
लाड़के होते राजे
शहाजींचे
प्रेरणा आहेत
नवयुवकांचे

@ कु, कविता चव्हाण,
जळगाव

## राजे शिवाजी महाराज

सर्वत्र पाप-पापच घडू लागलं जिकडे
पहा तिकडे मोगलांचं राज्य चालू
लागलं, माँ साहेबांनी ते पाहुणी करी
नवस भवानी पुत्र होऊ दे तो चांगला
मला पोटी ||1||
पुत्र जिजाऊंना झाला
पुत्र शहाजीराजांना झाला, 19
फेब्रुवारी 1630 साली शिवनेरीवर
वाघ शिवबा जन्माला आला ||2||
पुढे हाच वाघ रयतेचा वाली झाला
ज्यांच्या हातून सुरूवात झाली
स्वराज्य घडायला, मानाचा मुजरा
करतो छत्रपती शिवबाला ज्यांनी
मराठा मातीत भगवा फडकवला ||3||
हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी दिली
शिकवण माँसाहेबांनी,
मूठभर मावळे सोबती घेऊनी,
अखेर; हिंदू स्वराज्य स्थापन केले



शिवरायांनी ||4||
कवी :- एस. के. शिंदे पाटील

## आई

दैवाच्या गाठोड्याने गाठ मोकळी
केली तुझ्या विना माय,पोरं पोरकी
झाली आयुष्याचे तोल, खोल-खोल
गेले मौल्यवान जिंदगीचे अर्थ कोरे
झाले निळ्या आभाळाचे रंग काळे
झाले दाही दिशात अंधारली माऊली
तुझी सावली जगातून हरवली,
हरवली माय माऊली आई विना
आयुष्याचे मोल हरवले
मौल्यवान जिंदगीचे अर्थ कोरे झाले
निळ्या आभाळाचे रंग काळे झाले
होळी होऊनी आयुष्याचे रंग,
बेरंग होऊनी विखुरली
तुझ्या विना माय, पोरं पोरकी झाली
मौल्यवान जिंदगीचे अर्थ कोरे झाले
निळ्या आभाळाचे रंग काळे झाले
हरवल्या जगामध्ये तूला शोधू कोठे
हृदयात आमच्या, तुझे अस्तित्व
साठलेले मोठे मौल्यवान जिंदगीचे
अर्थ कोरे झाले निळ्या आभाळाचे
रंग काळे झाले दैवाचं झापड
नशीबाच्या कावडावर तापलेल्या
उन्हातच,उडाला सावलीचा पदर
तुझ्याविना जगण्याची आस
मावळली मौल्यवान जिंदगीचे अर्थ
कोरे झाले निळ्या आभाळाचे रंग
काळे झाले आटापिटा जीवाची,
झाल्या रक्ताच्या गाठी
देहाची झाली ..,झाली मुठ माती
मौल्यवान जिंदगीचे अर्थ कोरे झाले
निळ्या आभाळाचे रंग काळे झाले
- लक्ष्मण वाल्डे-कन्नड



## राजा सहयाद्रीचा

कृष्णेवर स्वार होऊन
शिवराय निघाले!
फडकता भगवा पाहून
मुघल भडकले!!
सूर्याच्या तेजासम
शिवकार्य लखलखले!
स्वराज्य स्थापन्या
मार्गदर्शन राजमाता
जिजाऊंचे लाभले!!
तानाजी, बाजीप्रभू,
मुरारबाजी रक्तानं
न्हाले!
तयांचे बलिदान
स्वराज्यासाठी आदर्श
बनले!!
मुघलशाहीला करण्या
स्वराज्यातून कडेलोट!
शिवरायांनी तोडले
वज्रासम कठीण तट!!
अन्यायाविरुद्ध समशेर
उपसली! मुघलशाहीचा
सूड घेण्या भवानी



समशेर तळपली!!
असा हा क्रांतीसुर्य
शिवशंभूचा अवतार!
किल्ले शिवनेरीवर
राजमाता जिजाऊंच्या
उदरी जन्माला!!
आनंद सर्व विश्वाला
झाला..
आनंद सर्व विश्वाला
झाला ..
जय भवानी... जय
शिवराय...
कवी- रवी दगू सगर
शिंगवे, ता. निफाड

## हा माझे देवच आहे शिवराय

हर हर महादेव आवाज घुमला
अन् 19 फेब्रुवारीला शिवनेरीवर
जन्म झाला सूर्यासारख्या पुत्राचा,
फर्जत शहाजीराजे व स्वराज्यजनी
माँसाहेब जिजाऊ यांचा हात त्यांच्या
डोक्यावर मायेच्या छत्राचा ॥धृ॥ अन्
शिवाजीराजे भोसले हे नाव ठेवण्यात
आलं शिवशंकरा सारखं रौद्ररूप
त्यांच, श्रीकृष्ण,अर्जुन अन् श्रीरामा
सारख्या महान यौद्धांचं शिक्षण दिलं
कार्य मोठं खूप त्यांच ॥२॥
लहानपणीच चालू केले माँसाहेबांनी
संत नामदेव, संत एकनाथ व संत
ज्ञानेश्वर त्यांच्या डोक्यात भरणे,
सवंगड्या सोबत लहानपणीच
शिकले पक्ष्या-प्राण्यांचा
हुबेहूब आवाज काढणे अन्
तलवारबाजी करणे ॥३॥
रायरेश्वराच्या मंदिरात जाऊन
सोळाव्यावर्षी सवंगड्यासह हिंदवी
स्वराज्याची शपथ घेतली,
तोरणा जिंकून स्वराज्याचे तोरण
बांधले आणि इथूनच स्वराज्याची
ठिणगी पेटली ॥४॥ इ. स. १६७४
मध्ये रायगड किल्ल्यावर
करण्यात आला शिवरायांचा
राज्याभिषेक,
इथेच झाला माझा राजा छत्रपती अन्
रयतेच्या राज्यासाठी जिंकत गेला
किल्ले एक-एक ॥५॥
18 पगड जातीचे मावळे
शिवरायांनी केले गोळा अन्
अन्याय अत्याचाराला घातला
आळा, आदिलशाही, मुगलशाही व
कुतुबशाहीचा
शिवरायांनी दाबून टाकला गळा
॥६॥
शंभूराजांचा जन्म झाला आणि
दोन वर्षांनी महाराणी सईबाईंनी
आपले प्राण सोडले, दुःखाचा काळ
असताना सुद्धा महाराजांनी अनेक
गड किल्ले जिंकले व जिवाभावाचे
मावळे जोडले ॥७॥
सुसज्ज व शिस्तबद्ध फौज घेऊन
गनिमी कावा निर्माण केला व
निर्माण केले आरमार,
दिल्लीचा बादशहा सुद्धा भीत
होता बघून शिवरायांची युद्धनीती
व त्यांचा कारभार ॥८॥ मुठभर
मावळ्यांच्या बळावर माझ्या राजांनी
सामर्थ्यशाली व प्रागतीक राज्य उभे
केले, गुलामगिरी होती सगळीकडे
माझ्या राजाने रयतेचे राज्य स्वराज्य
आणून दिले ॥९॥ शेवटी आला तो
दिवस ज्या दिवशी आपल्या परक्या
सजीवा सोबत निर्जीव सुद्धा रडली
असेल राणा वनात, ३ एप्रिल १६८०
रोजी निघून गेले तुम्ही सुवर्णाक्षरांनी
नाव कोरून जगातील प्रत्येकाच्या
मनात ॥१०॥
विशाल बाबासाहेब गाडेकर
संपर्क - ९३०९०२२५२०




# वडजाई दर्गा येथील कॉंक्रीट रस्त्याचा आ.शाह यांचे हस्ते शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहर मतदार संघात विकास कामांची जोरदार सुरुवात करीत असतांना हद्दवाढ गावांचा प्रश्न अनुत्तरीत राहू नये या भूमिकेतून आ.फारुख शाह यांनी हद्दवाढीने महापालिकेत समाविष्ठ झालेल्या गावांसाठी स्वतंत्रपणे ग्रामविकास विभागाकडून देखील निधी खेचून आणला आहे. त्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडील निधीतून वडजाई दर्गाने वडजाई रस्ता कॉंक्रीटीकरणाचे काम प्रस्तावित आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होणाऱ्या ३८,३५,४६१ खर्चाच्या कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांचे शुभहस्ते करण्यात आला. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता धर्मेंद्र झाल्टे,कनिष्ठ अभियंता सलीम शाह नगरसेवक नासिर पठाण, मूक्तार अन्सारी ,नगरसेवक गनी डॉलर,नगरसेवक सईद बेग,डॉ.दीपश्री नाईक,डॉ.पवार, प्यारेलाल पिंजारी,मौलवी शकील,रियाज अली सर,आमिर पठाण ,साजिद साई,साबीर सैय्यद,निजाम सय्यद,इकबाल शाह,आसिफ शाह,जमील खाटीक,युसुफपापा सर,वसिम अक्रम, हालिम शमसुद्दिन,नाजिम शेख,रिजवान अन्सारी,, माजीद पठाण,मुस्ताक पहिलवान , साकिव शाह, फरिदा अन्सारी, रईस शेख,साजिद बाबा,नासिर बागवान,सलीम शेख,जावेद मेमन,लुकमान शेख आदी उपस्थित होते.

# ज्ञानसंदिप शिक्षण संस्थेचा ३३ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** ज्ञानसंदिप शिक्षण संस्था डा.आंबेडकर नगर,सिडको एन ७ औरंगाबाद चा ३३ वा वर्धापन दिन व संत तुकाराम प्राथमिक विद्यालय, तुकाराम सोनवणे हायस्कूल डा.आंबेडकर नगर,ज्ञानसंदिप प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मिसारवाडी,या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी ज्ञानसंदिप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश सोनवणे हे होत, तर उद्घाटक म्हणून दामिनी पथक प्रमुख कल्पना मॅडम, निर्मला अभोरे मॅडम, बनसोडे मॅडम घ्या उपस्थित होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून - सिडको पोलिस स्टेशन गुन्हेशाखा अन्वये पी.ए.आय.अशोक अवचरमोल, विजयजी खिल्लारे, संस्थेच्या सचिव संगिताताई खिल्लारे, अजिंक्य ढवळे,अनिल जाधव हे प्रमुख पाहुणे उपस्थिती होते.

सर्व मान्यवर पाहूण्यानी महात्मा फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला तसेच सर्व धर्म समभाव प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ज्ञानसंदिप शिक्षण संस्थेचे प्रेरणास्थान कालकथीत तुकाराम बाबा सोनवणे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करुन पाहूण्याच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी परिक्षक म्हणून सेवानिवृत्त आदर्श शिक्षक बी.बी.शिंदे व सेवानिवृत्त मुख्याध्यापक. डि.एन.वाहूळे यांनी काम पाहिले. या वेळी सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थींनी आपल्या विविध कलागुणांना वाव देत विविध नृत्य,नाटीका सादर केल्या. यामध्ये सर्वधर्मसमभाव, कोऱ्या चालल्या रानात सुरु झालीया पेरण, संदेशे आते है, अगु बाई ठगु बाई, मेरावाला डान्स, सामी सामी, खंडेराया झाली माझी दैना,स्कुल चले हम, कोरोना वॉरियर, वृक्ष संवर्धन नाटिका, छत्रपती शिवाजी महाराज यांची युगत मांडली गित,अंधश्रद्धा भारुड,असे अनेक गीत, गायन,नाटिका,नृत्य सादर करण्यात आले. परिक्षकांच्या निकाला वरुन खालील प्रकारे निकाल जाहिर करता आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन तुकाराम सोनवणे हायस्कूलचे मुख्याध्यापक संदिप प्रकाश सोनवणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साऊट व्यवस्था व फोटो मुख्याध्यापक अभिजीत सोनवणे यांनी पाहिली. तसेच सुनिल चौधरी, संजिव चौधरी, साहेबराव शिंदे, विजय पाटिल, नजमा खान, हर्षल पगारे,किरणकुमार सोनवणे,वैशाली बोरूडे (सोनवणे),स्वामी जाधव,नय्युम शेख ,अजयकुमार खिल्लारे, विजय आघाव,गौतम मकासरे,आनंद सातदिवे,गवळी मॅडम, पठाण मॅडम, शेजुळ मावशी या सर्वांना परिश्रम घेतले.



# गुंज फाउंडेशनच्या वतीने संगणक आणि सायकल वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**दिंडोरी :** नाशिक येथील प्रतिष्ठित गुंज फाउंडेशनच्या वतीने कादवा इंग्लिश स्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय लखमापूर, ता. दिंडोरी येथे १० संगणक व ४० सायकलींचे वितरण करण्यात आले. राजेशजी बोरा सचिव विनीताताई बंका जॉंइन सेक्रेटरी मा. डॉ. गजानन अग्रवाल तसेच सायकल विभाग प्रमुख दिपालीताई गुप्ता संगणक विभाग प्रमुख संजयजी गोयल वितरण प्रमुख समीरजी अग्रवाल तसेच गूंज फाउंडेशनचे सन्माननीय सदस्य व माननीय शहाजी सोमवंशी संचालक राजेंद्र गांगुर्डे. पत्रकार ह.भ.प. बंडा महाराज पत्रकार शांताराम पगार हे उपस्थिती होते.

या कार्यक्रमा साठी कर्म. रा. स. वाघ शैक्षणिक व आरोग्य संस्थेचे अध्यक्ष मा. श्री शहाजी दादा सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली ४० सायकलचे विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले व १० संगणक विद्यालयास फाउंडेशन ने दिलेत. तसेच अनेक दानशूर व्यक्तींनी विद्यालयास फरशी चे काम पूर्ण करण्यासाठी मदत केलीत यात प्रवीण सोनवणे यांनी 30 सिमेंट गोण्या तर हुसेन स्क्रॅप वाले यांनी एक खडीची गाडी दिले मा.ऋषी शर्मा यांनी वीस ब्रास फरशी दिलेत या सर्व मान्यवरांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी विद्यालयाचे प्राचार्य श्री पाटील पी . एन. यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व प्रास्तविक केले अध्यक्ष सोमवंशी दादा यांनी सांगितले गुंज फाउंडेशने आमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे अडचण ओळखून 40 सायकल दिल्यात तसेच संगणकाचे ज्ञान हवेत यासाठी १० संगणक दिलेत त्यांचे कार्य अत्यंत उल्लेखनीय आहेत तसेच गुंज फाउंडेशनचे माननीय गोयल सो यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज करताना म्हटले आम्ही सर्व सदस्य एकत्र येऊन निधी जमा करतो व यातून गरीब होत करू विद्यार्थ्यांना सायकल वाटप करून प्रदूषण दूर करण्याचा प्रयत्न करतो.

संगणक ही काळाची गरज ओळखून विद्यालयास संगणक देत आहोत. कादवा साखर कारखाना संचालक विश्वनाथजी आप्पा देशमुख व संचालक राजेंद्र गांगुर्डे, सरपंच गंगाधर निखाडे,सरपंच संगीता ताई देशमुख,उपसरपंच नानाभाऊ सोनवणे उपसरपंच अजित कड माजी सरपंच ज्योतीताई देशमुख शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष बापू मोगल बाळासाहेब देशमुख बाळासाहेब सोनवणे व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जोंधळे पी एम यांनी केले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



लखमापुर येथील कादवा न्यु इंग्लिश स्कूल हे गुणवत्ता राखण्यासाठी आतापर्यंत अग्रेसर विद्यालय असुन अजून गरीब होतकरू अभ्यासु विद्यार्थी वर्गाला अनेक दानशुरांनी जी मदत केली . ती विद्यालयांच्या प्रगतीला मार्गदर्शन ठरणार आहे . यावेळी लखमापुर ग्रा .प .चे उपसरपंच किशोर सोनवणे यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यालयास डॉं . बाबासाहेब आंबेडकर यांची जीवनगाथा भेट देऊन त्यात अजून भर टाकली आहे . **प्राचार्य पी . एन .पाटील**

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# हर हर महादेवच्या जयघोषाने वैद्यनाथ मंदिर परिसर दुमदुमला

आधुनिक केसरी न्यूज

**परळी वैजनाथ :** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिरात आज शनिवार दिनांक 18 फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री पर्वानिमित्त मोठी गर्दी झाली आहे. राज्य, परराज्यासह ग्रामीण भागातील भाविकांनी तब्बल महाशिवरात्रीला दर्शनाचा लाभ घेतला. येथील वैद्यनाथ मंदिरात महाशिवरात्री निमित्त पंचक्रोशीतील भाविक भक्तांसह राज्य, परराज्यातील भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी आले आहेत. महाशिवरात्रीच्या पावनदिनी बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या पाचव्या क्रमांकाचे प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी परळी नगरात भाविकांची मांदियाळी दिसून आली. लाखो भाविक प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी परळी नगरीत दाखल झाले असून जणू काही परळी नगरीला कुंभमेळा भरले असल्याचे स्वरूप आले आहे. हर हर महादेव! प्रभू वैजनाथ महाराज की जय! अशा जयघोषाने वैद्यनाथ मंदिर परिसर दणाणून गेला. प्रभू वैद्यनाथाचे दर्शनासाठी परळी शहर व तालुक्यातील नागरिकांसह देशभरातून शिवभक्तांची रीघ लागली होती पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगाच रांगा लागल्या होत्या प्रभवती नाथा चे दर्शन नागरिकांना सुलभ घेता यावे यासाठी वैद्यनाथ देवल कमिटीच्या वतीने ब्यारीकेटिंग करून चोख नियोजन करण्यात आले होते. महाशिवरात्रीच्या दिनी मंगळवार 1 रोजी मध्यरात्रीपासूनच भाविकांनी प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी मोठी रिघ लावली आहे. राज्यासह सीमावर्ती भागातील शेकडो भाविक परळी शहरात दाखल झाले होते. परळी नगरीत येणाऱ्या भाविकांच्या सेवेकरिता शहरातील अनेक सामाजिक संघटना यांनी उपवासाच्या फराळाची, पिण्याच्या पाण्याची जागोजागी मोफत सोय उपलब्ध केली आहे. वैद्यनाथ मंदिर कमिटीचे ट्रस्टचे सचिव राजेश देशमुख यांच्यासह सर्व सदस्य मंदिर परिसरात देखरेख, नियोजन व खबरदारी घेण्यासाठी उपस्थित आहेत.





### सुरक्षा करण्याऐवजी पोलिसच बनले गोंधळाचे भागीदार

महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन जिल्हाधिकारी श्री राधाबिनोद शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच एक बैठक पार पडली होती . या बैठकीत दर्शनासाठी मंदिरात जाण्याचे व दर्शन घेतल्यानंतर बाहेर पडण्याचे मार्ग निश्चीत केले होते .बाहेर पडण्याच्या मार्गावर भाविक आत जावु नये म्हणुन तेथे पोलिस कर्मचार्यांची नियुक्ती केली होती .हे कर्मचारी आपले नातेवाईक व परिचयाच्या व्यक्तींना बोलावून घेत बाहेर पडण्याच्या मार्गातून मंदिरात सोडत असल्याने गोंधळ उडाला .याच दरम्यान माध्यमांचे प्रतिनिधी वार्तांकनासाठी आलेले असतानाही पोलिसांनी नियमांवर बोट ठेवत मंदिरात जाण्यास मज्जाव केला . हा गोंधळ खुप वेळ सुरु होता .बंदोबस्ताला असलेल्या पोलिस कर्मचारीच गोंधळाचे भागीदार बनल्याने या कर्मचार्यांवर पोलिस अधिक्षकांनी कारवाई करावी अशी मागणी भाविकांतुन केली जात आहे .

### परळी पोलिसांनी पत्रकारांना वैद्यनाथ मंदिरात जाण्यास रोखले

महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन जिल्हाधिकारी श्री राधाबिनोद शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच एक बैठक पार पडली होती . या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांच्या समोरच वैजनाथ देवल कमिटीचे सचिव राजेश देशमुख यांनी सर्वच पत्रकारांना वैद्यनाथ मंदिरात ओळखपत्र दाखवून आत सोडण्यास सांगितले होते . असे असून सुद्धा संबंधित पत्रकाराने ओळखपत्र दाखवून सुद्धा त्याने आत जाण्यास रोखले व अरेरावीची उद्धट भाषा वापरली . या उलट एपीआयने आपल्या जवळच्या नातेवाईक व ओळखीच्या लोकांना मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी सोडले . हा सर्व प्रकार वैजनाथ मंदिरच्या सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये कैद झाला असून जिल्हा पोलीस अधीक्षक साहेबांनी या एपीआय वर कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे .



# शिवाय मॉर्निंग ग्रुपतर्फे प्रसादाचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील एक आधुनिक वास्तू म्हणून एका झुलत्या पुलावर शंकर भगवान यांची एक मोठी सुंदर मूर्ती आहे व या ठिकाणी भाविक मोठ्या प्रमाणात गर्दी करत असतात. तसेच आजच्या दिवशी शिवाय ग्रुप तर्फे सर्वांना महाशिवरात्रीनिमित्त शुभेच्छा देण्यात आला. ह्या ग्रुप मध्ये 25 ते 30 सदस्य आहेत सकाळी सहा वाजेपासून दहा वाजेपर्यंत हजेरी लावत असतात स्वच्छता राखणे साफसफाई करणे व सकाळी सहा वाजेपासून दहा वाजेपर्यंत व्यायाम व आसन करत असतात व सर्व वयोवृद्ध मंडळी या ठिकाणी येत असतात व या या सुंदर जागेचा लाभ घेत असतात अशाच प्रकारे या ठिकाणी महाशिवरात्री निमित्ताने शिवाय ग्रुप तर्फे आज महाप्रसादाचा कार्यक्रम ठेवण्यात आला या ठिकाणी उपस्थित किशोर चित्ते, राजेंद्र चव्हाण, संजय मोरे, राहुल ढिवरे, किरण मराठे,जगदीश बागुल, मंगेश मोरे, जगदाळे रावसाहेब, मोतीराम पुकळे, राजेश चौधरी,दीपक महाले, विजय गरुड, महेंद्र सगळे, शंकर पाटील, मनोज लगडे,प्रकाश कदम इत्यादी उपस्थित होते.



# कुणाल दादा राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त गरजूंना फळांचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** दि.१७ फेब्रुवारी रोजी डॉ.अरुण शिरसाट, शहर जिल्हाध्यक्ष, यांच्या मार्गदर्शनानुसार औरंगाबाद शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनु.जा.विभागाच्या वतीने घाटी रुग्णालय, औरंगाबाद येथे उपचारासाठी आलेले रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांना फळांचे वाटप करून अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस कुणाल दादा राऊत यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला, यावेळी प्रा.शिलवंत गोपणारायन, सोशल मीडिया प्रमुख, प्रा.सोनाजी गवई, योगगुरू भागवत भोरे, ॲड. अरुण पट्टेकर, भोळे गुरुजी, शालिनी मोरे ताई, रेखा गोरे आणि इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** जि. प. प्राथमीक शाळा धामणगाव तांडा येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी पदवीधर मतदार संघाचे आमदार श्री सतीश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थित संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी गंगापूर खुलताबाद मतदार संघाचे अध्यक्ष महेश उबाळे ता.अ. अनिल चव्हाण मोहसीन पटेल जावेद पटेल रावसाहेब फुलारे इत्यादी पदवीधरसह मुख्याध्यापक एस.वाय जमादार सह शिक्षक श्रीमती व्ही.बी. गवई शालेय समिती अध्यक्ष गणेश राठोड उपाध्यक्ष साहेबराव चव्हाण यांच्यासह उपसरपंच विकास कापसे सदस्य विकास राठोड टाकळी राजा राव येथील मुख्याध्यापक वसंत राठोड यांच्यासह गावकरी उपस्थित होते. आमदार संतोष चव्हाण यांनी यासह टाकळी अब्दुलपूर जमालवाडी धामणगाव आखात वाडा पळसवाडी वेरूळ आदी तांड्यासह भेटी देत नागरिकांच्या समावेत संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी केली तसेच नागरिकांच्या अडीअडचणी समजून घेत त्यासोडवण्याचे आश्वासन त्यांनी दिले .

# कॉपी मुक्त परीक्षा घेण्यासाठी प्रशासन सज्ज

## विद्यार्थ्यांनी तणावमुक्त परीक्षा द्यावी : राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** जिल्ह्यात कॉपी मुक्त परीक्षा घेण्यासाठी जिल्हा प्रशासन,जिल्हा परिषद आणि पोलीस प्रशासन सज्ज असून विद्यार्थ्यांनी तणावमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत बोलतांना केले.यावेळी त्यांनी परिक्षार्थींना शुभेच्छाही दिल्या. यावेळी त्यांच्यासोबत जिल्हा शिक्षण अधिकारी गजानन सुसरही उपस्थित होते.

श्री.गुप्ता म्हणाले, फेब्रुवारी-मार्च 2023 मध्ये आयोजित इयत्ता बारावी परीक्षा दि. 21 फेब्रुवारी ते 21 मार्च 2023 आणि इयत्ता दहावी परीक्षा दि. 2 मार्च ते २५ मार्च 2023 या कालावधीत सुरू होणार आहे. परीक्षेसाठी शिक्षण विभाग पूर्ण क्षमतेने कार्य करीत असून परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर गैरप्रकार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून 8 भरारी पथक स्थापन करण्यात आले आहेत. जिल्ह्यात इयत्ता बारावी चे 40 परीक्षा केंद्र असून परीक्षेत प्रविष्ट विद्यार्थी संख्या 15हजार 901 आहे. तर इयत्ता दहावीच्या परीक्षेत परीक्षा केंद्र संख्या 86 असून परीक्षेत प्रविष्ट विद्यार्थी संख्या 21 हजार 983 आहे. जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी जिल्हाधिकारी यांची जिल्हा नोडल अधिकारी तर तालुकास्तरावर



तहसीलदार यांची तालुका नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा समन्वयक अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना नियुक्त करण्यात आले आहे. प्रशासनाकडून परीक्षेसंदर्भाने संपूर्ण नियोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांनी तणावमुक्त वातावरणात परीक्षा देण्याचे आवाहन श्री.गुप्ता यांनी केले.

परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्राच्या 100 मीटर परिसरात 144 कलम लागू करण्यात आले आहे. विद्यार्थी हित लक्षात घेऊन व पालक, विद्यार्थी यांच्या मागणीचा विचार करून शिक्षण मंडळ पुणे यांनी परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिट वाढवून दिले आहेत. महसूल विभागाचे बैठे पथक असणार आहे. परीक्षा चालू असताना दक्षता समिती सदस्यांमार्फत परीक्षा केंद्रांना आकस्मिक भेटी देण्यात येणार आहेत. परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर बाह्य उपद्रव होणार नाही या दृष्टीकोनातून पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. परीक्षेच्या दरम्यान बंदोबस्तासाठी कर्तव्यावर असलेल्या पोलिसांनी परीक्षा कक्षामध्ये प्रवेश करू नये. परीक्षा केंद्राच्या परिघीय भागामध्ये बंदोबस्ताचे काम करावे. अशा सूचना पोलीस प्रशासनास दिलेल्या आहेत. परीक्षा चालू असताना परीक्षा केंद्राच्या 50 मीटर परिसरातील झेरॉक्स दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत. परीक्षा दालनात पर्यवेक्षण करण्यासाठी त्याचा शाळेच्या, विद्यालयाच्या शिक्षकांना नियुक्त न करता इतर शाळेच्या,विद्यालयाच्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात आलेल्या आहेत.

जनजागृती मोहीमः कॉपीमुक्त अभियानाकरिता शिक्षक, मुख्याध्यापक आणि शैक्षणिक संस्थांचे प्रमुख यांच्या कार्यशाळा घेऊन जनजागृती करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. इयत्ता दहावी व बारावीच्या सर्व केंद्र संचालकांची सभा घेऊन परीक्षा संदर्भात मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या असल्याचे श्री.गुप्ता यावेळी म्हणाले.

# शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुका वानेगाव येथे दिनांक 11 फेब्रुवारी 2023 रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा औरंगाबाद येथून घेऊन तो गणोरी फाटा येथे त्यांची पूजा आरती करून छत्रपती महाराज यांचा जयघोष करीत फुलंब्री येथील हनुमान नगर सोसायटी जवळ छत्रपती शिवाजी महाराजांचे पूजन करून मोठ्या उत्साहात आरती करण्यात आली.

\यावेळी काशिनाथ जाधव व त्यांच्या पत्नी लता जाधव व त्यांचे दोन्ही मुलं यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे पूजन केले तसेच वाणेगाव येथे फार उत्साहात गावातील नागरिकांनी जल्लोष करीत व महाराजांच्या घोषणा देऊन छत्रपती शिवाजी महाराजांची पुतळ्याची हनुमान मंदिरासमोर स्थापना केली व सदर स्थापना करून पुतळ्याचे आज दिनांक 16 फेब्रुवारी 23 रोजी गावातील मोठ्या उत्साहाने व आनंद वातावरणात राज्याचे केंद्रीय मंत्री आदरणीय श्री रावसाहेब दानवे व फुलंब्री आमदार आदरणीय श्री हरिभाऊ बागडे नाना यांनी व माननीय श्री संदीप नाना बोरसे माजी सभापती व श्री राजेंद्र ठोंबरे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष नगराध्यक्ष सुहास शिरसाट राम बनसोड वाल्मीक जाधव योगेश मिसाळ रेल सरपंच अर्चनाताई जाधव ज्ञानेश्वर जाधव मनोज चिकटे सुभाष गायकवाड विकास कुलकर्णी सुखदेव जाधव उपसरपंच संतोष तुपे सागर गाडेकर व इतर मान्यवर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळ्याचे अनावरण केले तेव्हा सदर मान्यवरांचे स्वागत श्री काशिनाथ दादा जाधव औरंगाबाद जिल्हाध्यक्ष शरद जोशी जोशी शेतकरी



संघटना व त्यांचे पुत्र श्री योगेश काशिनाथ जाधव माजी उप सरपंच वानेगाव यांनी शाल श्रीफळ देऊन स्वागत केले त्याच गावकऱ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला त्याबद्दल गावकऱ्यांचे व छत्रपती शिवाजी महाराज कमिटीचे जाधव कुटुंबीय तर्फे हार्दिक हार्दिक अभिनंदन

# इयत्ता दहावी व बारावी विद्यार्थ्यांचा निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**घोडेगाव :** माता जिजाऊ वरीष्ठ महाविद्यालय, राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय, सद्‌गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालय, घोडेगाव, ता. खुलताबाद जि.औरंगाबाद येथे आज इयत्ता दहावी व बारावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. प्रा. डॉ सुभाष बागल सर (एम ए पीएचडी ,एम.फील सेट बी.एड मराठी व प्रमुख पदवी-पदव्युत्तर विभाग चिस्तिया कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खुलताबाद) हे होते.तर कार्यक्रमाचे उदघाटक म्हणुन श्री साईनाथ जाधव साहेब हे होते. तर मुख्य अतिथी म्हणुन राष्ट्रीय पदक विजेती नेमबाज खेळाडू गीता मस्के मॅडम, डॉ. योगिता अशोक होके पाटील मॅडम (राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) माननीय भाऊसाहेब काळे साहेब (सचिव ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळ बाजार सावंगी) तसेच संचालक लोकविकास नागरी सहकारी बँक औरंगाबाद हे होते. दीपप्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर वृक्षपूजन करण्यात आले. नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष साईनाथ पाटील जाधव यांच्या हस्ते सुभाष बागल सर व भाऊसाहेब काळे साहेब यांचे स्वागत करण्यात आले. ले. यांचे गीता म्हस्के मॅडम यांचे स्वागत साक्षी जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्ष श्री. साईनाथ पाटील जाधव यांचे स्वागत खैरनार सर यांनी केले. प्रास्ताविक मा.साईनाथ पाटील जाधव यांनी केले.यानंतर गीता म्हस्के ,डॉक्टर योगिता होके पाटील मॅडम यांचे भाषण झाले. आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष बागल सर यांनी विद्यार्थ्यांना खुप सुंदर असे मार्गदर्शन केले. आंतरमहाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा झाल्या होत्या त्या स्पर्धेतील प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. आज विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्री. तुकाराम जाधव सर,तर आभार गोमलाडू सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी संदिप जाधव सर ,प्राचार्य ,मुख्याध्यापक, प्राध्यापक , शिक्षक ,शिक्षकैतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.





# जय भवानी जय शिवाजीच्या गर्जना देत धावले हजारो युवक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित मॅरेथॉन स्पर्धेमध्ये हजारो युवकांनी सहभाग नोंदवत विजेतेपद मिळवण्यासाठी आपला सर्वच पणाला लावले. सरस्वती भवन महाविद्यालयातुन सकाळी आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून या मॅरेथॉन स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. त्यावेळी युवकांच्या जय भवानी जय शिवाजीच्या घोषणेने परिसर ढवळून निघाला. शहरातील विविध शाळा व महाविद्यालयातील तीन हजाराहून अधिक स्पर्धक या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. तर सर्व विजेत्यांना आमदार प्रशांत बंब, माजी महापौर नंदकुमार घोडेले, शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष हर्षवर्धन कराड, राज्य ॲथलेटिक्स संघटनेचे सहसचिव पंकज भारसाखळे, माजी नगरसेवक अभिजीत देशमुख, अनिल मानकापे, महेश उबाळे, मनोज पाटील, विशाल दाभाडे, संदीप शेळके, हरीश शिंदे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात अली.

स्पर्धेचे निकालः महाविद्यालयीन गट(३.५ किलो मीटर) मुलीः प्रथम-आकांशा हरकल, द्वितीय-मानसी इंगळे, त्रितिय- श्रावणी भोसले. मुलेः प्रथम-अर्जुन शिंदे, द्वितीय-महेंद्र मगरे, त्रितिय-अक्षय यमराज. शालेय गट (२ किलो मीटर) मुलीःप्रथम-सरोज पाटील, द्वितीय-रेश्मा सय्यद, त्रितिय-नेहा पुजारी. मुलेः प्रथम- शैलेश जाधव, द्वितीय-भीम सोनटके, त्रितिया-कार्तिक वाकले.

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ॲथलेटिक्स संघटनेचे डॉ.दयानंद कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल अहिरे, गजानन वाबळे, अनिल निळे, शाम अंभोरे, सुनील गायसमुद्रे, अमृत बिराडे यांनी परिश्रम घेतले.

# शिक्षण आणि शिकवणी दहा महिन्यांची तर फी मात्र बारा महिन्यांची वसूल करण्याचा अट्टहास का ?

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**औरंगाबाद :** आजच्या विज्ञान युगांत शिक्षण अतिमहत्वाचे ठरत असून शिक्षणाशिवाय पर्याय नाही असाही आवाज जोरात उठविला जातो. मात्र ज्या ठिकाणी आपला पाल्य शिक्षण घेतो त्या शाळेची काही समीकरणे जर आपण पाहिली तर नक्कीच यांत फार मोठा अन्याय पालकांवर होताना दिसतो असे एका सर्व्हेतून आधुनिक केसरीच्या टीमने बाहेर आणण्याचा प्रयत्न केला आहे.

नर्सरीच्या वर्गांपासून तर दहावीच्या वर्गांपर्यंत जिल्ह्यांतील सर्वच खाजगी शाळेत मुलांना सरासरी माहे जून ते मार्चपर्यंत शिकविले जाते त्यांतही दिवाळी सणाच्या 15 दिवस सुट्ट्या असतात. काही शाळेत ख्रिसमस सणाच्या 15 दिवस सुट्ट्या असतात आणि उन्हाळ्याच्या सुट्ट्या सरासरी दीड ते दोन महिने असतात. म्हणजेच वर्षांतून एकत्रित प्रत्येक खाजगी शाळेत आपल्या पाल्याला 10 महिनेच शिक्षण दिले जाते मात्र पालकांकडून ट्युशनच्या नावाखाली पाल्याची फी एकूण 12 महिन्यांची वसूल केली जाते आणि ती सुद्धा काही शाळेत अरेरावीने तर काही शाळेत जबरदस्तीने.! या प्रकाराने पालकवर्गांत नाराजीचा सूर उमटला असून ही लूट थांबवावी, अशी मागणी पालकवर्गांतून जोर धरत आहे.

शाळांच्या या बेकायदेशीर नियमांमुळे व बेजबाबदार पणामुळे मात्र एकीकडे पालकांच्या खिशाला दोन महिन्यांचा नाहक भूर्दंड लागत असून पालकांची मोठ्या प्रमाणांत लूट होतांना दिसत आहे तर दुसरीकडे



शैक्षणिक क्षेत्रांतील महर्षी अगदी गब्बर होतांना दिसत आहे. काही शाळेचा सर्व्हे करताना तर असे आढळून आले की, इयत्ता दहावीच्या मुलांना फी वसुलीसाठी सक्ती केली जाते तर काहींना फी अभावी परीक्षेपासून वंचित राहण्याच्या धमक्या दिल्या जातात मात्र त्यांचीही शिकवणी दहा महिन्यांचीच असते मार्च मध्ये दहावीची बोर्ड परीक्षा होते आणि त्यांचेकडून मात्र एप्रिल आणि मे या दोन महिन्यांची फी नाहक वसुली केली जाते.

*शिक्षण आणि शिकवणी मात्र दहा महिन्यांची, तर बारा महिन्यांची वसुली करण्याचा अट्टहास का.?* हा प्रश्न चार ते पाच शाळेत विचारला असता त्यांचेकडून एकच उत्तर आले की, इतर शाळा दोन महिन्यांची फी घेतात

> शैक्षणिक वर्ष हे माहे जून ते मे पर्यंतचे असते म्हणजे शिक्षण जरी दहा महिन्यांचे असले तरी सत्र बारा महिन्यांचे असते म्हणून बारा महिन्यांची फी पालकांकडून घेतली जाते ही चालत आलेली पद्धत आहे यांत जर पालकांना काही चुकीचे वाटत असेल तर पालकांनी आणि शिक्षकांनी मिळून शालेय समितीच्या बैठकीत किंवा पालक मीटिंग मध्ये हा प्रश्न उपस्थित केला पाहिजे तरच या गोष्टींवर आळा बसू शकेल .
> **– मधुकर देशमुख शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद**

म्हणून आम्ही पण घेतो.! परंतु अशा सक्तीचा कुठला ठोस कायदा नाही अशी माहिती नाव न सांगण्याच्या अटींवर काही मुख्याध्यापकांनी दैनिक आधुनिक केसरीला दिली. म्हणून या गंभीर विषयाची दखल घेऊन औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी यांच्याशी या प्रकाराबद्दल बातचीत केली असता त्यांनी मात्र शब्दाचा मुलामा चढवत ही प्रचलितपणे चालत आलेली पद्धत असून ती पद्धत बंद करणे सोपे नाही आणि त्याचा तसा कायदा आहे असे सांगितले मात्र त्यांना या नियमांचे व कायद्याचे शासन परिपत्रक मागितले असता तासभर शोधून सुद्धा सापडले नाही आणि त्यांच्याकडून शेवटी भ्रमनिराशा झाली. म्हणजे असा कायदा खरंच अंमलात आहे की नाही हा मोठा आणि तितकाच कठीण प्रश्न उपस्थित होत आहे.?? तरी देखील जोपर्यंत या विषयाचा ठोस पुरावा आधुनिक केसरीच्या हाती लागत नाही तोपर्यंत आधुनिक केसरी शांत बसणार नाही. आणि पालकांच्या खिशाला बळजबरीने कात्री आणणाऱ्या या नियमाचा सामना करतच राहील.



# कामगारांचे थकीत वेतन मिळवून देणारच : पालकमंत्री भुमरे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** सोयगाव विधानसभा दौरा अंतर्गत रेल येथे पालकमंत्री तथा रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे यांनी भेट दिली यावेळी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले व शेतकरी पाणंद रस्त्यांचे उद्घाटन करण्यात आले तसेच कन्नड साखर कारखान्याचे कर्मचाऱ्यांचे थकीत रक्कम बाबत निवेदन देण्यात आले यावेळी भुमरे म्हणाले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याची भेट घेऊन हा कित्येक वर्षाचा प्रश्न प्रलंबीत असुन लवकरच मार्गी लावल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही असे आश्वासन बोलतांनी दिले. यावेळी गावाच्या वतीने सरपंच पती धनसिंग जाधव व उपसरपंच किशोर वाळुंजे , यांनी मान्यवरांचे स्वागत केले या वेळी जिल्हा अध्यक्ष भरतसिंग राजपुत, जिल्हा सहकारी बॅंकेचे चेअरमण तथा माजी आमदार नितीन पाटील, जिल्हा परीषद सदस्य किशोर पवार, माजी पंचात समिती सदस्य गोकुळसिंग राजपुत, तालुका अध्यक्ष केतन काजे, नायब तहसीलदार मोनाली सोनवणे, गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे ग्रामसेवक ए .डी चव्हाण शिवाजी थेटे, शाम थेटे , नारायण बोडखे , सोपान बोडखे, प्रदिप थेटे, जयराम नागे, नानासाहेब बोडखे, मोगल वाघ, महेश थेटे,ललीत गायकवाड, राजु व्यवहारे, संतोष थेटे परिसरातील सर्व पदाधिकारी, शेतकरी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .



## संदीप मानकर यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व दैनिक मराठवाडा साथीच्या वतीने दिला जाणारा पत्रमहर्षी स्व.मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार 2023 ची घोषणा निवड समितीने नुकतीच जाहीर केली असून यांमध्ये दैनिक आधुनिक केसरीचे सिल्लोड तालुका प्रतिनिधी पत्रकार संदीप दादाराव मानकर यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांना हा पुरस्कार औरंगाबाद येथील एका विशेष पुरस्कार वितरण समारंभामध्ये देऊन त्यांचा सन्मान केला जाणार आहे अशी माहिती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, व दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांनी दिली. राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कारासाठी मानकर यांची निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी, दैनिक आधुनिक केसरीचे मुख्य संपादक डॉ.प्रभू गोरे, व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी व दैनिक आधुनिक केसरीच्या सर्वच टीमने मानकर यांचे अभिनंदन केले आहे. तर राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल राजकीय, सामाजिक, कला व क्रीडा आदी सर्वच क्षेत्रांतून त्यांचे कौतुक होत आहे.

## उमरावती येथे अवैध मुरूम उपसा; महसुली पथकाला जेसीबी मिळाले तर ट्रॅक्टर पळाले

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील उमरावती येथील ड शासकीय डोंगरा लगत असलेल्या गायरान जमिनीतुन शेकडो ब्रास मुरमाची उपसा करून मुरमाची चोरी करणाऱ्या शेतकऱ्यांसह जेसीबी यंत्रासह मुरुम वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टरवर महसूल पथकाने अचानक धाड टाकल्याने एकच खळबळ उडाली. जेसीबी चालकाच्या विरोधानंतर पोलीस बंदोबस्तात कारवाई करण्यात आली. जेसीबी मिळाले परंतु ट्रॅक्टर डोंगर वाटने पळाले हे विशेष औरंगाबाद जिल्ह्यात अनेक ठिकाणी गौण खनिज उपसा सुरू असून या गौण खनिज उपसा करणाऱ्या माफियांवर प्रशासनाचा वचक नसल्याने भर दिवसा हा प्रकार सुरू असल्याचे उमरावती येथील प्रकरणावरून उघड झाले आहे.

उमरावती येथे डोंगर पराड्याला लागून असलेल्या शासकीय जमिनीवर जेसी पी यंत्राद्वारे मुरुमाचे अवैध उत्खन करत असतांना १६ फेब्रुवारी रोजी वरिष्ठाच्या आदेशाने तहसीलच्या महसुली पथकाने उमरावती शिवारातील शासकीय जमिनीवर उपसा होणारा अवैध मुरूम करणारे जेसीपी यंत्र महसुली पथकाने पकडले . यंत्र मिळाले पण ट्रॅक्टर पळाले . तिथे दोन ट्रॅक्टर मुरूम खाली करून पथकासमोर पळाले . विशेष जेसीबी यंत्र जप्त करण्यात येऊ नये यासाठी संबंधित यंत्राच्या मालकांनी जेसीबी समोर काही काळ आडवे होऊन पथकाला कारवाई पासून रोखण्याचा प्रयत्न केला . महसुली पथकातील कर्मचार्यांनी तुम्ही तहसील कार्यालयात या आम्ही तुम्हाला मदत करू तुम्ही दंड भरा व जेसीबी घेऊन या परंतु संबंधित शेतकरी मालक काही ऐकण्याच्या स्थितीत नव्हते . शेवटी सर्व घटनेचा व्हिडीओ करत वरिष्ठांना कल्पना देण्यात आली आणि वरिष्ठाच्या आदेशाने वडोद पोलिसांना कल्पना देऊन त्यांना घटना स्थळी पाचारण करण्यात आल्यानंतर सदर जेसीबी मालकाने जेसीबी सोडला आणि हा जेसी पी अखेर पोलीस बंदोबस्तात तहसील कार्यालयात लावण्यात आला. यावेळी वडोद पोलीस ठाण्याचे स पो नि विलास मोरे पो हे कॉ जारवाल , पो कॉ जिवरग यांनी घटना स्थळी भेट दिली होती .आता या जेसीबी यंत्र मालकावर कार्यवाही होणार परंतु संबंधीत शेतकऱ्यावर आणि त्यांना मदत करणारे ट्रॅक्टरवर मालक - चालक यांच्यादर काय कारवाई होते ? याकडे सर्वांचे परिसरातील नागरीकांचे लक्ष लागून आहे . या पथकात तलाठी ए आर दाढे , तलाठी ए के पंडित , तलाठी लक्ष्मण हरणे, तलाठी ए एस बनसोडे , तलाठी अजित गावंडे , नायब तहसिलदार सुरक्षा रक्षक विजय धुमाळ , शिपाई नंदकुमार देवकर ( मामा ) यांचा समावेश होता . यांनी चपळतेने ही कार्यवाही पूर्ण केली. संबधित जेसीबी यंत्र चालकाने महसुली पथकाला कार्यवाही पासून रोखण्याचा अयशस्वी प्रयत्न केला या भागात ठिक - ठिकाणी या यंत्र चालकाने फोन खबरे असतांनाही महसुली पथकाची कार्यवाही कौतुकास्पद आहे मात्र पळून जाणारे ते दोन ट्रॅक्टर व संबधित अवैध मुरुम उपसा करणाऱ्या व शासकीच जमिन पोखरणाऱ्या शेतकऱ्याला अभय मिळणार असल्याने कार्यवाहीत काही दडले तर नाही ना ? अशी शंका व्यक्त होत आहे.





## गरीबाचा फ्रीज बाजारात दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** उन्हाळ्यात जीवाची लाहीलाही होत असताना माठातील थंड पाणी अमृताप्रमाणे गोड वाटते. गरीबाचा फ्रिज म्हणून पहिली पसंती माठाला असते. उन्हाच्या चटक्यामुळे जीव पाणी पाणी करतो. तेव्हा गार पाणी मिळून तहान दूर होईल काय, असे प्रत्येकालाच वाटत असे. यांत्रिक युगात फ्रिज असतानासुद्धा गोरगरीबांचा फ्रिज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माठातील पाण्याची चव काही वेगळीच असते. या पाण्याचा गोडवा सर्वांचीच तृष्णा दूर करते. परंतु माठ घडविणारा समाज आजही उपेक्षित आहे. कुंभारांनी आपल्या कला कौशल्याची वेगवेगळ्या आकारात व काळानुसार परिवर्तन घडवून आणले. रांजन, सुरई, मडके, माठ, गाडगे आदी छोटी मोठी आकाराचे मातीचे भांडे पैठण कित्येक पिढ्यानपिढ्या ग्रामदैवत असलेल्या सिध्देश्वर महादेव मंदिर परिसरात शिवरात्रीला मोठी यात्रा भरते या यातून शहरातील तसेच पंचक्रोशीतील नागरिक मातीचे माठ खरेदी करतात. पैठण येथील सिध्देश्वर महादेव मंदिर येथे शिवरात्री निमित्ताने दहा क्विंटल शाबुदाना खिचडीचे वाटप करण्यात आले,या ठिकाणी पहाटेपासून भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती, याठिकाणी शिवभक्त फोजदार कारभारी जाधव, आशिष लक्षमन पवार , दिनेश मालवे,कुणाल गुरव यांनी सहकार्य केले.



## शिंदे गटाला शिवसेनेचे नाव, धनुष्यबाण मिळाल्याने जिंतूरात जल्लोष..!

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेनेचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह मिळाल आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने याबाबतचा आदेश दिला आहे. शिंदे आणि ठाकरे गटाची केंद्रीय निवडणूक आयोगात सुनावणी झाल्यानंतर आता आयोगाने मोठ्या निर्णय दिला आहे. धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे यांना दिले असून हा ठाकरे गटाला मोठा धक्का मानला जात आहे. याचेच औचित्य साधून जिंतूरातील बाळासाहेबांची (शिवसेना) शिवसेना पक्षाच्या वतीने आज दि. १७ रोजी रात्री ८:२० वाजण्याच्या सुमारास फटाके वाजून जिंतूरात शिवसेना नेत्या अक्षता राजेश चक्कर पाटील यांच्या मार्गदर्शनात आनंद उत्सव करण्यात आला. यावेळी अंकुश भाऊ राठोड, राजेश चक्कर पाटील, गजानन गीते, लक्ष्मण महाराज चव्हाण, अशोक देशमुख, बापूराव चौरे, प्रल्हाद गीते, योगेश राठोड, राजू वाकळे, दशरथ महाराज, कार्तिक पिटे, लहू राठोड, मोतीराम चव्हाण, छत्रपती राठोड, सचिन राठोड, अभिषेक बनगर, निलेश चव्हाण अदीसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



# धर्माबादेत शिवसेनेचा फटाके फोडून मिठाई वाटून आनंदोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

बाबुराव गोणारकर

**धर्माबाद** : शिवसेना पक्षाचे नाव व धनुष्यबाण चिन्ह हे निवडणूक आयोगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदें यांना निकालाद्वारे जाहीर केले.या निकालाचा धर्माबाद शहरात पानसरे चौकात शिवसेनेच्या वतीने फटाके फोडून, मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या निकालाचा धर्माबाद शहरात पक्षाचे सह संपर्क प्रमुख आकाश रेडी येताळकर यांच्या नेतत्वाखालील फटाके फोडून, मिठाई वाटून जलोष करण्यात आला. यावेळी सतिश पाटील शिंदे, दिगबर पाटील जगदंबे, आणील कमलाकर, संतोष पाटील मोरे, वेंकट मूमोड, अमिर पठाण, मदन लिंगमपले, गंगाराम कॉलोड, साई मुदलोड, सुनील पाटील, गणेश जिभनवाड, विशंभर पाटील,लिंगण्णा मुतणवाड, पिराजी मुदलोड,भीमराव थोरमोटे आदी सह शिवसैनिक उपस्थित होते. हा निकाल म्हणजे सत्याचा विजय असून या निकालाने सर्वसामान्य शिवसैनिकाच्या भावनेचा आदर असून येणाऱ्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेत्रत्वाखाली सर्वांगीण विकासाचे प्रश्न मार्गी लागतील असे प्रतिपादन यावेळी बोलतांना करण्यात आले.



# सोयगाव येथे स्नेह संमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज


**सोयगाव :** येथे दि.१८/२/२३ रोजी कै. बाबुरावजी काळे मराठी शाळेत दि.१७ शुक्रवारी दहावे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात पार पडले. या स्नेहसंमेलनात इयत्ता ज्यु.केजी ते नववी पर्यंत च्या विद्यार्थ्यांनी देवा श्री गणेशा, गाडी घुंगराची, शिवाजी महाराज यांचा पोवाडा, देशभक्ती गीत, नाटीका, बेटी बचाव, बेटी पढाव, अशा सुंदर सप्त कला गुणांचा अविष्काराने उपस्थितांची मने जिंकली होती. धनश्री निकम व सहकाऱ्यांनी नदीच्या पल्लाड आईचा डोंगूर या गाण्यावर उत्कृष्ट नृत्य सादर केल्याने प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटाने चिमुकल्यांना दाद दिली. दरम्यान स्नेह संमेलनाचे उद्घाटन सोयगाव पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष सपोनि अनमोल केदार यांच्याहस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.शिरीष पवार तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस चे शहर अध्यक्ष रवींद्र काळे, कृष्णा पाटील यांची उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील अंजली कथलकर, शितल काटोले, योगेश काळे, मनिषा पाटिल, जयश्री श्रीवास्तव, शितल पवार आशा पंडित,प्रणय कुलकर्णी, विद्या पाटिल, नम्रता पाटिल, नलिनी पाटील, रोहिणी पाटील, प्रेरणा मोरे या शिक्षक व शिक्षिका यांनी परिश्रम घेतले. स्नेहसंमेलनाचे सुत्रसंचालन शितल पवार यांनी केले तर आभार प्रेरणा मोरे यांनी मानले. कार्यक्रमास पालक वर्ग व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कन्नड तहसीलवर संजना जाधव यांचा विविध मागण्यासाठी मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** सोयगाव तालुक्यातील शेतकरी, महिला बचत गट,



संजय गांधी स्वावलंबन आणि श्रावणबाळ योजनेतील प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्या संजना जाधव यांच्या नेतृत्व- खाली मंगळवारी (दि. २१) विविध मागण्यांसाठी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टी अनुदानाचे पैसे खात्यावर जमा करावे, शेतकऱ्यांचे वीजबिल सरसकट माफ करावे, उर्वरित गावांचा पोखरा योजनेत समावेश करावा, पी.एम. सन्मान निधीचा लाभ मिळावा, २०२१-२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सुमारे १५ कोल्हापुरी बंधारे वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले तरी त्यांची दुरुस्ती तत्काळ करण्यात यावी. कन्नड-सोयगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते दयनीय अवस्थेत आहे, त्यांची सुधारणा करावी, कापूस, ऊस, मका, सोयाबीन पिकांना योग्य भाव मिळावा या मागण्यांसाठी पिशोर नाक्यापासून तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात येणार असून शेतकरी, बचत गटाच्या महिलांनी उपास्थितीत राहण्याचे आवाहन संजना जाधव समर्थकांकडून करण्यात आले आहे.

# कृषी प्रदर्शनातून विकासाची नवी दिशा मिळते

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** जिल्ह्यातील वैजापूर ता,१८/२/२३ रोजी शेती जगली तर देश जगेल व देश जगला तर देशवाशी जगतील "यासाठी कृषी प्रदर्शनातून नवीन ज्ञान व नवीन तांत्रिक पध्दतीची माहिती घेऊन शेतकऱ्यानी आधुनिक पद्धतीची शेती करावी असे प्रतिपादन वैजापूर-गंगापूर चे आमदार प्रा. रमेश पा. बोरनारे यांनी जि.प.प्रशाला (मुलांची) येथे आयोजित कृषिसम्राट -२०२३चे उदघाटन शुक्रवार(ता,१७)रोजी केले त्या प्रसंगी ते बोलत होते,ते पुढे म्हणाले की ,ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन आधुनिक यंत्रे,व पद्धती जाणून अत्याधुनिक पध्दतीने शेती करावी असेही आवाहन केले,२२फेब्रुवारी,२०२३पर्यंत हे प्रदर्शन असणार आहे,कृषी आणि नर्सरी प्रदर्शन व विक्री या प्रदर्शनात आहे ,२००हुन अधिक कंपन्याचा समावेश या प्रदर्शनात आहे,तसेच २१प्रकारचे स्टॉल्स असून यात खते, पशुखाद्य,सिंचन, फलोत्पादन,कृषी अर्थसहाय्य, ट्रॅक्टर, शेती अवजारे,डेअरी,पॅकेजिंग,साठवणूक ,पाणी व्यवस्थापन इत्यादी बाबत अत्याधुनिक माहिती बळीराजाला मिळणार आहे ,याचा लाभ वैजापूर -गंगापूर तालुक्यातील शेतकरी वर्ग यांनी घेऊन शेती विकास करून समृद्ध जीवन जगावे असे आपल्या प्रास्ताविकात जेष्ठ नागरिक व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी म्हटले,आ,बोरनारे यांच्या संकल्पनेतून हे कृषी प्रदर्शन भरलेले आहे,या प्रसंगी खरेदी विक्री संघ चेअरमन साहेबराव पा,औताडे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे उप सभापती विष्णू जेजुरकर,उद्योजक भावलाल काका सोमासे,सीताराम पा ,वैद्य, तालुका कृषी अधिकारी एच,आर, आढाव,मंडळ कृषी अधिकारी मंगेश घोडके,अशोक बिनगे,रवी उराडे,उपस्थित होते यांचे स्वागत आयोजक राहुल दादा धुमाळ पाटील, अशोक गाढे पाटील,उमेश वैष्णव व बाबासाहेब धुमाळ यांनी केले, सूत्र संचलन डी,डी,ठाकूर यांनी केले.

# दिवाळीप्रमाणे शिवजयंती साजरी करावी -माजी सभापती धरमसिंग चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरात, तालुक्यात व सावळदबारा परिसरात येत्या १९ फेब्रुवारीला कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांसारखे महा- पुरुष सहजासहजी घडत नाहीत. काळाच्या क्षितिजावर निर्माण झालेल्या अंधकारमय सामाजिक, धार्मिक, राजकीय परिस्थितीतुनच शिवाजी नावाच्या सूर्याचा उदय होत असतो. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती औपचारिकता म्हणुन साजरी होऊ नये. ही जयंती सर्व शिवप्रेमींनी दसरा व दिवाळी सणासारखी साजरी करावी असे आवाहन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.शिवजयंतीदिनी महिलांनी सकाळी लवकर उठून रांगोळी काढाव्यात, सर्वांनी आपल्या घरावर भगवा ध्वज उभारावा, स्वयंपाकघरात गोड अन्नपदार्थ बनवावेत. महाराजांची मूर्ती अथवा प्रतिमा ठेवावी व त्यास सहकुटुंब हार किंवा पुष्प सुमनांजली अर्पण करावी. घरातील मुलामुलींना आणि तसेच मित्रसमूहाला शिवचरित्र भेट द्यावेत. सार्वजनिक वृक्षारोपन, स्वछता सारखे उपक्रम राबवावेत. घरी शिवजयंती साजरी करत असताना शिवरायांच्या प्रतिमेसमोर नारळ फोडणे, नैवेद्य दाखवणे, आरती म्हणणे, नवस बोलणे, उदबत्त्या - धुपारे लावणे असे तत्सम प्रकार टाळावेत.

# नगर परिषदेच्या वतीने भाविकांसाठी मोफत पार्किंग सुविधा

## बोगस पावत्या फाडणाऱ्या व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल करणार : मुख्याधिकारी अरविंद माळी

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** ही महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असून वर्षातून आषाढी कार्तिकी माघी चैत्री यासारख्या चार मोठ्या यात्रा व दरमहा येणाऱ्या एकादशी दिवशी तसेच चातुर्मासामध्ये संपूर्ण देशामधून व महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यामधून श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपूरमध्ये येत असतात या येणाऱ्या भाविकांना चांगल्या प्रकारची सेवा सुविधा मिळावी म्हणून नगरपरिषद वेळोवेळी प्रयत्न करत असते भाविक शहरांमध्ये दाखल झाल्यानंतर त्यांना पार्किंगची व्यवस्था व्हावी म्हणून शहरातील दहा ते अकरा ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे यापूर्वी नगर परिषदेच्या वतीने आरोग्य व्यवस्था व पार्किंग साठी कर आकारणी करण्यात येत होती परंतु येणाऱ्या भाविकांचे विचार करता नगर परिषदेने काही कालावधी करता आरोग्यव्यवस्था व पार्किंगची सुविधा मोफत पुरविण्याचा निर्णय माघी यात्रेपासून घेतला होता असे असतानाही यात्रा कालावधीमध्ये व इतर वेळेस शहरातील काही व्यक्ती या मोफत असलेल्या पार्किंगच्या ठिकाणी बोगस पावती देऊन पार्किंग कराची रक्कम भाविकांकडून वसूल करत असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आले आहे याबाबत शहर पोलीस स्टेशन यांच्याकडे नगर परिषदेच्या स्तरावरून तक्रारी नोंदविण्यात आलेल्या आहेत असे असून सुद्धा अजूनही काही व्यक्ती पार्किंगच्या बोगस पावत्या देत असल्याचे निदर्शनास येत आहेत तरी नगर परिषदेच्या वतीने सर्व भाविकांना जाहीर आवाहन करण्यात येत आहे की कोणत्याही बोगस पावती फाडणाऱ्या व्यक्तीस आरोग्य व्यवस्था पार्किंगची पावती चे पैसे देऊ नये असे बोगस पावती देत असल्याचे निदर्शनास आल्यास त्वरित नगर परिषदेकडे व पोलीस प्रशासनाकडे तक्रार दाखल करावी व अशा बोगस पावती देणाऱ्या व्यक्तीचा फोटो काढून ठेवावा जेणेकरून नगरपरिषद आपण दिलेल्या तक्रारीच्या व माहितीच्या आधारे सदर व्यक्तीवर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करेल असे आवाहन नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी केले आहे